अहवाल क्रमांक : १४५

# पंचायती राज समिती

## (२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

# तिसरा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१५

# पंचायती राज समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या हिंगोली जिल्हा परिषदेच्या
सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन
अहवालातील परिच्छेदाबाबत

## तिसरा अहवाल

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

७. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री.अमित झनक, वि.स.स.

१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री.विलास आठवले, उप सचिव

(३) श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा तिसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करीता समिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण अस (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे

कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशीलात जाऊन केला जातो  परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ  शकणार  नाही, तथापि, शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र  योजना  अस्तित्वात  आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा

गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा

प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठित झालेल्या समितीने हिंगोली जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेस दिनांक २४, २५ व २६ जून, २०१५ रोजी भेट देऊन श्री. राहूल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१५-२०१६ करिता गठित झालेल्या समितीने हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १८ व २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/ प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. स.भ.तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,डॉ. साधना तायडे,सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, श्री. मधुकर राजे अर्दड, मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली

व श्री.विलास जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली तसेच श्री.का.मा.विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या हिंगोली जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ साठी नव्याने गठित झालेल्या समितीने दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१५.

**संभाजी निलंगेकर-पाटील,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता, नाली बांधकामातील अनियमिततेबाबत | ३.५० | १ |
| (२) | दोन | बस्करपट्टी खरेदीतील अनियमिततेबाबत | ३.१३० | १२ |
| (३) | तीन | प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ५ वी तील मुलांसाठी शालेय पोषण आहार योजना खर्चातील अनियमिततेबाबत | ३.१३३ | २१ |
| (४) | चार | जिल्हा परिषद हिंगोली नवीन प्रशासकीय बांधकाम खर्चातील अनियमितता | ३.३०९ | २८ |
| (५) | पाच | विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २००८-२००९ अंतर्गत विविध कामांवर केलेल्या खर्चाबाबत | ३.३१३ ते ३.३१५ | ४० |
| (६) | सहा | देखभाल दुरुस्तीमधून हातपंप खरेदीवर केलेल्या खर्चाबाबत | ३.५६२ | ५१ |
| (७) | सात | १०० टक्के गुणवत्ता बाधीत स्त्रोत सुधारणे योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेवर केलेल्या खर्चाबाबत | ३.५६३ | ६१ |
| (८) | आठ | संवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणेसाठी औषधी साहित्य खरेदीतील अनियमिततेबाबत | ३.६३३ | ७३ |
| (९) | नऊ | ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जिल्हा परिषद उपकरातून योजना कडबा कटर खरेदी व पुरविणे मधील अनियमिततेबाबत | ३.८७९ | ८७ |

**अनुक्रमणिका**-चालू


| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१०) | दहा | मागासवर्गीय वसतिगृहांना परिपोषण अनुदानातील प्रदानातील अनियमिततेबाबत | ३.८८३ | ९७ |
| (११) | अकरा | जिल्हा परिषद उपकरातून प्लॅस्टीक मॅट खरेदीमधील अनियमिततेबाबत | ३.११७ | १०६ |
| (१२) | बारा | सिमेंट रस्ता व नाली बांधकाम मौ.वरखेडा, ता.सेंनगाव | ३.३१७ | ११४ |
| (१३) | तेरा | लिडच्या ठिकाणात फेरबदल केल्याने झालेल्या नुकसानीबाबत | ३.३२१ | १२३ |
| (१४) | चौदा | अस्कॅड योजनेअंतर्गत पशुधनासाठी लाळ खुरकत लस व हत्यारे, अवजारे, उपकरणे खरेदीमधील अनियमिततेबाबत | ३.७८६ | १३२ |

**परिशिष्ट "अ"**

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त १३९

प्रकरण एक

## जिल्हा परिषद हिंगोली

### यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता, नाली बांधकामातील अनियमिततेबाबत (परिच्छेद क्रमांक ३.५०/४२)(सन २००८-२००९)

पंचायत समिती वसमत ने सन २००८-२००९ मध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता व नाली, वाचनालय, ग्रामपंचायत कार्यालय बांधकामावर रु. ५, ५६,४४५/- खर्च केलेला आहे. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. मग्राही/२००९/प्र.क्र.९४/४२/६८४७ दिनांक २७/०८/२००२ व शासन निर्णय क्र. सग्रही/२००७/ प्र.क्र. ५४(५८/६८४७) दिनांक २१/०९/२००७ नुसार लोकवर्गणी वसूल करून पंचायत समितीकडे जमा केल्यावर ४०-४०-२० या प्रमाणात आवश्यक निधी ग्रामपंचायतींना वाटप करावयाचे आहे. परंतु लोकवर्गणीची रक्कम प्रत्यक्ष लोकांकडून जमा केली असल्याबाबत पंचायत समितीने खात्री पटवावी.

(२) वरील खर्चाच्या रक्कमेतून ५ टक्के कपात रक्कम ग्रामपंचायतीच्या निधीत जमा केल्याचे सामान्य पावती नं. ७ दर्शविण्यात आली नाही.

(३) ग्राम पंचायत आसेगांव येथील रस्ता व वाचनालय बांधकाम अंदाजपत्रकातील बाब क्र. ५ दबाई काम, बाब क्र. ८ आरसीसी पाईपचे, बाब क्र. ९ चे काम समाविष्ट असताना केले नाही. त्यामुळे सदर काम तांत्रिकदृष्ट्या बरोबर नाही.

(४) मौ. दगडगांव येथील नाली बांधकामाचे आदेश व करारनामा संचिकेत नाही.

(५) अर्धसमास पत्र क्र.१ दि. २९/१/२०१० व पत्र क्र.२ दिनांक २१/१/२०१० अन्वये मागणी करुनही ग्रामपंचायत एकरुखा व ग्रामपंचायत करंजीचे बांधकामाचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिले नाहीत.

(६) देयकातून कपात रॉयल्टीच्या रक्कमा शासन खाती भरणा केल्याच्या पोचपावत्या दर्शविल्या नाही.

(७)सदर खर्चातील कामासाठी वापरलेली वाळू व मुरुम साहित्याची प्रयोगशाळेकडून गुणवत्ता चाचणी केल्याचा अहवाल लेखा परीक्षणास दर्शविला नाही.

(८) मौ. आसेगांव व दगडगांव येथील सिमेंट रस्ता कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्र. ०५,०६ व ०७ च्या रुपये १,६७,३७३/- परिमाणापेक्षा जादा खर्च आहे. त्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११८(७) नुसार मान्यता घेतलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन निर्णय क्र.मग्राही/२००९/प्र.क्र.९४/४२/६८४७ दिनांक २७/०८/२००२ शासन निर्णयानुसार लोकवर्गणी ही ग्रामपंचायत स्तरावर जमा करुन घेण्यात आलेली आहे. सदरील ग्रामपंचायतच्या जमा केलेल्या लोकवर्गणीची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र. संग्रही/२००७/ प्र.क्र.५४ (५८/६८४७) दिनांक २१/९/२००७ नुसारच ग्रामपंचायतीला ४०:४०:२० या प्रमाणातच निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. सोबत गट विकास अधिकारी यांनी निधी वितरण केलेल्या संचिकेच्या छायांकित प्रती जोडण्यात येत आहे.

(२) देयकातुन ५ टक्के रक्कमेच्या रेखांकित धनादेश ग्रामपंचायतच्या नावाने देण्यात आलेला असून सदरील रक्कम ग्रामपंचायतच्या ग्रामनिधीत जमा करण्यात आलेली आहे. तसेच ग्रामपंचायत कडून नमुना नंबर ७ ची पावती घेण्यात आलेली असून सोबत छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.

(३) सदरील रस्त्याच्या कामासाठी अंदाजपत्रकात जरी दबाई व आरसीसी पाईप व इतर कामे समाविष्ट करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात काम करीत असताना त्याबाबतची आवश्यकता नसल्यामुळे इतर बाबीवर खर्च करून कामाचे अंतिमीकरण उपअभियंता बांधकाम यांनी कामाची प्रत्यक्षात पहाणी करूनच केले आहे व काम तांत्रिक दृष्ट्या योग्य असल्याचे उपअभियंता बांधकाम यांनी प्रमाणित केलेले आहे. सोबत अंतिमीकरणाच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

(४) मौ.दरडगांव येथील नाली बांधकामाचे कार्यारंभ आदेश उपलब्ध आहेत तसेच करारनामा करून घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(५)सदरील दोन्ही ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

(६)देयकातून रॉयल्टी (गौणखनिज) कपात करून धनादेशाव्दारे शासन खाती भरणा केलेला आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे (१) ग्राम पंचायत दगडगांव ध.क्र.०९१८५२ रु. २७०६/-(२) ग्रा.प.करंजी. ध.क्र.०९१८४७ रु.१९५०/- (३) ग्रा.प.एकरुखा ध.क्र . ०९१८५६ रु. २१७३/- व (४) ग्रा.प.आसेगाव ध.क्र.०९१८६१ रु.१८६५९/- भरणा केलेला आहे. तसेच सोबत कपात केलेल्या रोकडवही (Cash Book) च्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.

(७)सर्व कामांचे चाचणी अहवाल उपलब्ध आहेत.

(८) ग्रामपंचायत आसेगांव व दगडगांव येथील कामाच्या अंदाजपत्रकातील परिमाणापेक्षा जादा खर्च केलेला असला तरी अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च केलेला नाही. तसेच सक्षम अधिकारी उपअभियंता (बांध.) यांनी त्या कामास प्रमाणित करून अंतिमीकरण दिले आहे व कार्यकारी अभियंता (बांध.) यांनी त्यास मोजमाप पुस्तिकेची पडताळणी करून अंतिमीकरण दिलेले आहे. सोबत अंतिमीकरण प्रमाणपत्रे व मोजमापे पुस्तिकेच्या छायांकित प्रती जोडण्यात आलेल्या आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट रस्ता, नाली बांधकामातील अनियमितते- बाबत समितीने अशी विचारणा केली की, सदर योजनेकरिता ग्रामपंचायतींनी लोकवर्गणी गोळा केल्याची खात्री पंचायत समितीने कशी केली, योजनेच्या खर्चात बचत करून ५ टक्के रक्कम ग्रामनिधीत जमा केल्याबाबत नमुना नंबर ७ ची पावती का घेण्यात आली नाही आणि आसेगांव येथील रस्ता व वाचनालय बांधकामातील बाब क्र.५, ८ व ९ का कार्यान्वित केली नाही, ही कामे न करताही कामाचा दर्जा कसा राखला. समितीच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की,

नमुना नंबर ७ ची पावती जोडलेली नव्हती, ही किरकोळ बाब आहे. परंतु सदर पावती लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध आहे. सदरहू प्रकरणी लोकवर्गणी जमा करून घेण्यात आलेली आहे. सदरील ग्रामपंचायतीच्या जमा केलेल्या लोकवर्गणीच्या याद्या सोबत जोडण्यात आलेल्या आहेत, तसेच ४०:४०:२० या प्रमाणात निधी ग्रामपंचायतींना वाटप केलेला आहे. सोबत गट विकास अधिकारी यांनी निधी वितरण केलेल्या संचिकेच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. ज्या बाबींचा समावेश करण्याची आवश्यकता होती, त्या बाबींचा समावेश केलेला आहे. उपअभियंता यांनी कामाची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करून छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिका-यांनी पावती जोडलेली नव्हती ही किरकोळ बाब असल्याचे नमूद केल्यावर समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. कामाचे अंदाजपत्रक तयार करताना आवश्यकतेप्रमाणे सक्षम तांत्रिक अधिकारी त्यामध्ये बदल करून सुधारित मान्यता घेऊ शकतात. या कामामध्ये मोजमाप पुस्तिका, उपअभियंता यांनी प्रमाणित केलेली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले असता समितीने कामामध्ये बदल करण्याचे अधिकार उपअभियंत्यांना आहेत काय, रोडवर दबाई करायची की नाही याचा निर्णय घेण्याचे अधिकार कोणास आहेत, कामाला मंजुरी घेतल्यानंतर ते काम करायचे की नाही हे कोणी ठरविणे आवश्यक आहे, अंदाजपत्रकामध्ये रोलरचा समावेश का करण्यात आला असे प्रश्न समितीने विचारले तसेच रस्त्याची रुंदी कमी असल्यामुळे तेथे रोलर जाणार नसेल तर अशावेळी तेथे कॉंक्रीटचा रस्ता करायचा असतो. एकदा कामाला मंजुरी मिळाल्यानंतर त्यामध्ये उपअभियंत्यांना बदल करण्याचे अधिकार नाहीत असे मत समितीने व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रस्त्याची रुंदी कमी असल्यामुळे तेथे रोलर जात नव्हते म्हणून दबाई न करण्याचा निर्णय घ्यावा लागला असे उत्तर दिले. सकृतदर्शनी सदरहू प्रकरणी अनियमितता झाल्याचे समितीचे मत झाले. यावर या कामाची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करून एक महिन्यामध्ये कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यामध्ये सादर करावा असे समितीने निदेश दिले. तसेच ग्रामपंचायत, एकरूखा व करंजीच्या कामांचे अभिलेख जसे गुणवत्ता तपासणी अहवाल, रॉयल्टी भरणा पावत्या लेखापरीक्षणास का उपलब्ध केले नाहीत, त्यास कोण जबाबदार आहे, आसेगांव व दगडगांव सिमेंट रस्ता कामामध्ये

रूपये १,६७,३७३/- चे जादा परिमाण होण्याची कारणे काय आहेत, अंदाजपत्रक तयार करताना या बाबीचा विचार का केला गेला नाही, त्यास कोण जबाबदार आहे या बाबींचा चौकशी अहवालात समावेश करण्यात यावा असेही निदेश समितीने दिले.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

उक्त योजनेतील रु. १,६७,३७३/- इतक्या जादा रकमेचा खर्च होण्याची कारणे काय, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच लेखा-परीक्षणाच्या वेळी या लेखा आक्षेपासंबंधी कागदपत्रे लेखापरीक्षकांस न दाखविण्याची कारणे काय आहेत.

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करून समितीला अहवाल सादर केला आहे. सदरहू अहवालातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत. प्रस्तुत प्रकरणी ग्रामपंचायतीला रोलर न मिळाल्याने खडीची दबाई न करता काम केले असून ३०० मि.मी. व्यासाचे आर.सी.सी. पाईप बसविले नाहीत असे नमूद केले आहे. सदरहू प्रकरणी संबंधित शाखा अभियंता व उपअभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देऊन सक्त ताकीद देण्यात आली आहे व त्याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्यात आली आहे. तत्कालीन कार्यकारी अभियंता निवृत्त झाले असून त्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव मुख्य अभियंत्यांकडे पाठविण्यात आला आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

यशवंत ग्राम समृद्धी योजने अंतर्गत मौ. आसेगांव व दगडगांव येथील सिमेंट रस्ता कामामध्ये रु.१,६७,३७३/- जादा खर्च झाला असल्याचे लेखा आक्षेपात नमूद केलेले आहे. तथापि या संदर्भातील प्रत्यक्षात आसेगांव येथील सिमेंट रस्त्याच्या कामाचे अभिलेख्यांची तपासणी केली असता आसेगांव येथील सिमेंट रस्त्याच्या कामाचे अंदाजित किंमत रु.६,४९,२४७/- होती व झालेल्या कामांचे मूल्यांकन रु.६,५१,०१६/- इतका झालेला

आहे. या कामाच्या तुलनात्मक तक्त्याची तपासणी केली असता बाब क्रमांक ६ व ७ वर रु.४०,२१०/- जास्तीचे मुल्यांकन झाले आहे व बाब क्रमांक १ ते ५ व ८ ते ९ या बाबीवर रु.३८,४४३/- कमी मूल्यांकन झाले आहे. त्यामुळे एकंदरीत या कामावर रु.१,७६७/- म्हणजेच एकूण अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ०.२७% जास्तीचे मूल्यांकन झाले आहे. तथापि या कामामध्ये अंदाजपत्रकीय किंमती एवढाच म्हणजेच रु.६,४९,२४७/- खर्च झाला आहे. त्यामुळे जास्तीचा खर्च झाला नाही.

सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या चौकशीमध्ये आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. सदरचे काम ग्रामपंचायत मार्फत यशवंत ग्राम समृद्धी योजना सन २००५-२००६ मध्ये करण्यात आलेले आहे.

२. सदर काम दिनांक २०/०९/२००६ रोजी सुरू होऊन दिनांक २५/०३/२००९ रोजी पूर्ण झालेले आहे.

३. श्री.एम.ए.मुरक्या, शाखा अभियंता व श्री.पी.ए.डोबाडे, प्रभारी उपअभियंता या अभियंत्यांच्या अखत्यारित सदरचे काम होते.

४. अंदाजपत्रकानुसार सदरचे काम रु.६,४९,२४७/- इतक्या किंमतीचे होते. कामाचे मूल्यांकन रु.६,५१,०१६/- इतके झालेले आहे. या बाबतचा तपशील खालील-प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकाप्रमाणे | | प्रत्यक्ष झालेले काम | | कमी/अधिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | परिमाण | किंमत रु. | परिमाण | किंमत रु. | कमी मूल्यांकन रु. | अधिक मूल्यांकन रु. |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ६० मि.मी. खडी जमा करणे | ३५८.८७ घ.मी. | ८०,५९७ | २८०.०२ घ.मी. | ६२,८८७ | १७,७१० | - |
| २ | कठीण मुरुम जमा करणे | ११९.६२ घ.मी. | १०,६७१ | ९५.१६ घ.मी. | ८,४८९ | २,१८२ | - |
| ३ | खडी पसरविणे | ३५८.८१ घ.मी. | ४,६६५ | २८०.०२ घ.मी. | ३,६४० | १,०२५ | - |

**तपशील----**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कठीण मुरुम पसरविणे | ११९.६२ घ.मी. | ९५७ | ९५.१६ घ.मी. | ७६१ | १९६ | - |
| ५ | खाडीची दबाई | २३९२.५० घ.मी. | १३,१५९ | - | - | १३,१५९ | - |
| ६ | सि.सि.१:४:८ | २१७.५० घ.मी | २,५१,६६९ | २४०.७८ घ.मी. | २,७८,६०७ | - | २६,९३८ |
| ७ | सि.सि.१:२:४ | १६३.१२ घ.मी. | २,८३,३६० | १७३७.१३ घ.मी. | २,९६,६३२ | - | १३,२७२ |
| ८ | पाईप बसविणे | १०.०० मी. | २,४३० | - | - | २,४३० | - |
| ९ | माहिती फलक बसविणे | ०.२७ चौ.मी. | १,७४१ | - | - | १,७४१ | - |
| | | एकूण . . | ६,४९,२४७ | | ६,५१,०१६ | ३८,४४३ | ४०,२१० |

रस्त्याचे कामामध्ये आढळून आलेल्या बाबी खालीलप्रमाणे.

१. रस्ता वापरात व वर्दळीचा आहे.

२. सिमेंट रस्त्याचा वेअरिंग कोट हा गावातील वाहतूक वर्दळ व मोठ्या प्रमाणावर बैलगाडीच्या वाहतुकीमुळे काही प्रमाणात खराब झाला आहे.

श्री.एम.ए.मुरक्या, शाखा अभियंता व श्री.पी.ए.डोबाडे, उपअभियंता (तत्कालीन) यांनी केलेल्या खुलाशातील बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. अंदाजपत्रकात खडीची दबाई करणे ही बाब समाविष्ट होती. तथापि प्रत्यक्ष काम करताना संबंधित ग्रामपंचायतीला रोलर न मिळाल्यामुळे खडीची दबाई न करता काम केलेले आहे. परंतु खडीची दबाई ही पाणी टाकून धुम्मस करून हाताने मजुराच्या सहाय्याने केली असल्याचे नमूद आहे.

२. आर.सी.सी.पाईप ३०० मिमी व्यासाचे बसविणे ही बाब अंदाजपत्रकात समाविष्ट होती, परंतु प्रत्यक्ष काम ग्रामपंचायतीने पाईप न बसविले बाब संबंधित शाखा अभियंता व उपअभियंता यांचे खुलाशामध्ये नमूद आहे.

३. सद्य:स्थितीत संबंधित ग्रामपंचायतीने इतर योजनेतून पाईप बसविणेऐवजी आर.सी.सी.ढापे टाकण्याचे काम केल्याचे खुलाशात नमूद आहे.

वरील खुलाशाचे अवलोकन केले असता खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.---

१. प्रत्यक्ष काम करताना संबंधित ग्रामपंचायतीला रोलर न मिळाल्यामुळे खडीची दबाई न करता काम केलेले आहे.

२. आर.सी.सी.पाईप ३०० मिमी व्यासाचे बसविणे ही बाब अंदाजपत्रकात समाविष्ट होती. प्रत्यक्ष ग्राम पंचायतीने पाईप बसविले नाहीत.

यावरून असे निदर्शनास येते की, सदरील रस्त्याचे काम हे सन २००९ मध्ये पूर्ण झालेले आहे. त्यास जवळजवळ साडेसहा वर्षांचा कालावधी झालेला आहे. त्यामुळे सिमेंट रस्ता वेअरींग कोट हा गावातील वाहतुक वर्दळ व मोठ्या प्रमाणात बैलगाडीच्या वाहतुकीमुळे काही प्रमाणात खराब झाला आहे, असे खुलाशात नमूद केल्याचे योग्य वाटते. परंतु प्रत्यक्षात रस्त्याचा वेअरींग कोट काही प्रमाणात खराब झाल्याचे वगळता बाकी रस्ता चांगला आहे. सद्य:स्थितीमध्ये रस्ता वापरात आहे.

तसेच दगडगांव येथे सिमेंट रस्त्याचे काम नसून नालीचे काम मंजूर होते. या कामाची अंदाजीत रक्कम रु.२,९९,८६९/- होती. तसेच या कामामध्ये केवळ १ ते ४ बाबी समाविष्ट होत्या. या कामाचे एकूण मूल्यांकन रु.२,९७,९८६/- चे झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा रु.१,८७९/- कमी मूल्यांकन झाले आहे. त्यामुळे वरील दोन्ही कामांमध्ये मिळून १,१२१/- इतकी बचत झालेली आहे. या कामांवर जास्तीचा खर्च झालेला नाही. एकंदरीत दोन्ही कामांवर जास्तीचा खर्च झालेला नाही. त्यामुळे रु.१,६७,३७३/- वसूल करण्याची आवश्यकता नाही.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त कामांचे शाखा अभियंता, श्री.एम.ए.मुरक्या व तत्कालीन प्रभारी उपअभियंता, श्री.पी.ए.डोबाडे हे अंशतः दोषी आढळून आल्यामुळे त्यांची एक वर्षाची वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी या कार्यालयाचे पत्र जा. क्र.२३४५, दिनांक ०७-१०-२०१५ अन्वये थोपविण्यात आली आहे.

सन २००४-२००५ व सन २००५-२००६ मध्ये यशवंत ग्राम समृद्धी योजना राबविण्यात आली. या संबंधी स्थानिक निधी लेखापरीक्षण पथकाने सन २००८-२००९ मध्ये लेखापरीक्षण केले आहे. सदर योजने अंतर्गत ग्रामपंचायत, आसेगांव, ता.वसमत येथील कामाशी संबंधित अ.क्र.१ लोक वर्गणीचे अभिलेखे लेखापरीक्षणास न दर्शविणे. २. योजनेच्या खर्चात बचत करून ५% रक्कम ग्रामनिधीत जमा केल्याबाबत नमुना नं.७ ची पावती दर्शविण्यात आली नाही. असा आक्षेप नोंदविण्यात येऊन तो पंचायत राज समितीच्या लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करण्यात आला आहे.

वरीलप्रमाणे लेखापरीक्षणास अभिलेखे न दर्शविणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.---

१. श्री.एम.बी.नादरे, ग्रामसेवक, पं.स., वसमत (से.नि.दिनांक ३१-०१-२०१३)

२. श्री.एम.एम. जोध, ग्रामसेवक, पं.स., वसमत (से.नि.दिनांक ३१-०७-२०१३)

३. श्री.एम.एम.भोसले, ग्रामसेवक, पं.स., वसमत (कार्यरत)

लेखापरीक्षणास अभिलेखे न दर्शविल्याबाबत मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षण नियम, १९३० मधील तरतुदीप्रमाणे व शासन परिपत्रक क्र. लेखाप/२०१३ (७/१३), वित्त-८, दिनांक ११-०२-२०१३ नुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांवर रु.२५,००० दंडाची कारवाई करण्यात आली आहे. आदेश जा.क्र/जिपहिं/ग्रापंवि/ग्रामं ४/कावि/३७४/१५, दिनांक १३-१०-२०१५.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वंकश चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी योजनेतील १ लक्ष ६७ हजार ३७३ इतक्या जादा रकमेचा खर्च होण्याची कारणे काय, या प्रकरणी चौकशी केली आहे का, या चौकशीमध्ये काय आढळून आले, लेखापरीक्षणाच्या वेळी

कागदपत्रे लेखापरीक्षकांना न दाखविण्याची कारणे कोणती आहेत, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, यशवंत ग्राम समृध्दी योजनेंतर्गत आसेगाव, दगडगाव सिमेंट रस्त्याच्या कामाचा १ लाख ६७ हजार ३७३ जादा खर्च असल्याचे आक्षेपात नमूद केल्याच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे सर्व अभिलेखाची तपासणी केली असता, या रस्त्याच्या कामाची अंदाजित किंमत ६ लाख ४९ हजार २४७ होती. कामाचे मूल्यांकन ६ लाख ५१ हजार १६ रुपये आहे. यातील काही बाबींवर जास्तीचा खर्च झालेला आहे. बाब क्रमांक ६ व ७ वर ४० हजार २१० रुपये खर्च झालेला आहे आणि बाब क्रमांक १,५,८,९ वर ३८ हजार ४४३ रुपये हे कमी मूल्यांकन झालेले आहे. त्या अनुषंगाने सर्व अभिलेखे तपासले असता, फक्त १,७६७ रुपयाचा फरक आढळत आहे. सविस्तर माहिती चौकशी अहवालात दिलेली आहे.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, किरकोळ बाब असेल तर सचिव पातळीपर्यंत विषय येत नाही. यामधील आक्षेप लेखापरीक्षकांनी काढलेला आहे. त्यांचा मूळ आक्षेप असा आहे की, त्यांना कागदपत्रे दाखविली असती तर हा आक्षेप आला नसता. पुढील आक्षेप असा आहे की, लेखापरीक्षणाची कागदपत्र न दाखविण्याची कारणे काय, तुमच्याकडे अभिलेखे होते तर ते लेखापरीक्षकांना का दाखविले नाहीत. यामध्ये मोठी गफलत आहे किंवा काही घडले आहे असे दिसत नाही. कागदपत्रे दाखविली नाही तर आक्षेप येणार आहे. त्यांना पुरावा दाखववा लागतो. यातील ७०-८० टक्के आक्षेप हे कागदपत्रे न दाखविल्यामुळे निघाले आहेत. तीन वेळा संधी देऊनही कागदपत्रे दाखविले नाहीत म्हणून हे आक्षेप आलेले आहेत. हिंगोलीच्या बाबतीत असे आहे की, तीन-तीन वेळा संधी देऊनही कागदपत्रे त्यांना दाखविलेली नाहीत. समितीच्या दौऱ्याच्या वेळी कागदपत्रे दाखवून समाधान केले असते तरी हा मुद्दा आला नसता. आता मात्र सांगत आहेत की, कागदपत्रे आहेत पण त्यात काही झालेले नाही. प्रत्येक मुद्द्यात गैरप्रकार झालाच असेल असे नाही. परंतु गैरप्रकार झाल्यासारखे वर्तन करणे हे आक्षेप येण्याचे कारण आहे. यावर विभागीय सचिवांनी असे विशद केले की, ज्या ग्रामसेवकांनी अभिलेखे दाखविले नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे. श्री.नादरे, श्री.जोध, श्री.भोसले असे ते तीन ग्रामसेवक आहेत, या तिघांनी अभिलेखे न दाखविल्यामुळे शासन परिपत्रक दिनांक ११-२-२०१३ नुसार त्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये दंड आकारण्यात आलेला आहे.

त्यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी समितीस विदीत केले की, श्री.भोसले ग्रामसेवक यांनी २५ हजार भरले आहेत, दोघे जण सेवानिवृत्त आहेत. त्यांचे पेंशन चालू आहे, त्यातून दरमहा रुपये पाच हजार वसूल करण्याचे बीडीओ यांना आदेश दिलेले आहेत. श्री.नादरे यांचे पेन्शन प्रकरण अंतिम टप्प्यात असून त्यांची फाईल अर्थ विभागाकडे आहे. त्यांच्या पेंशनच्या मिळणाऱ्या पैशातून एकरकमी आम्ही २५ हजार वसूल करणार आहोत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २४ जून, २०१५ रोजी हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन "यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत सिमेंट, रस्ता, नाली बांधकामाबाबत अनियमितता" या लेखा परिक्षणात निघालेल्या आक्षेपावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीत समितीने या योजनेवर रु. १,६७,३७३ एवढ्या जादा रकमेचा खर्च होण्याची कारणे काय, याबाबत चौकशी केली आहे काय, याबाबत विचारणा केली असता जिल्हा परिषद, हिंगोली यांनी यासंदर्भात चौकशी अहवाल पाठविला आहे. सदरहू चौकशी अहवालात ग्रामपंचायतीला रोलर मिळाला नसल्यामुळे खडीची दबाई न करता काम केले असुन ३०० मि.मि. व्यासाचे आर.सी.सी. पाईप बसविले नसल्यामुळे **संबंधित शाखा अभियंता व उप अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देऊन सक्त ताकीद देऊन त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात आली असल्याचे त्यात नमूद केले आहे. तसेच सदरहू प्रकरणातील तत्कालीन कार्यकारी अभियंता यांची चौकशी केली आहे. तसेच या प्रकरणात शाखा अभियंता श्री.एम.ए.मुरक्या व तत्कालीन उप अभियंता श्री. पी.ए.दोबाडे हे अंशत: दोषी आढळल्याने त्यांची एक वर्षाची वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी थोपविण्यात आली. लेखा परिक्षणास अभिलेखे न दाखविल्याप्रकरणी श्री.एम.बी.नादरे,ग्रामसेवक, पं.स. वसमत (सेवानिवृत्त), श्री.एम.एम.जोध, ग्रामसेवक,पं.स.वसमत (सेवानिवृत्त), श्री.एम.एम.भोसले, ग्रामसेवक, पं.स.वसमत (कार्यरत), यांचेवर मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ अन्वये रु. २५,०००/- दंडाची कारवाई करण्यात आली असुन तसे आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत.**

**जिल्हा परिषदेने समितीच्या निदेशानुसार यथोचित कारवाई केल्यामुळे याबाबत समिती समाधान व्यक्त करते.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद हिंगोली

**बस्कर पट्टी खरेदीतील अनियमिततेबाबत (परिच्छेद क्रमांक ३.१३०) (सन २००८-२००९) :-**

जिल्हा परिषद हिंगोली सन २००८-०९ सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली आहे. योजनेवर रक्कम रुपये ३,९७,९५६/- इतका खर्च केला आहे. या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम १४६ नुसार पुरवठादाराकडून करारनामा करुन घेतला नाही. त्यामुळे शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे.

(२) संचिकेत प्रत्येक शाळांची मागणी नसतानाही बस्कर पट्ट्यांची संख्या कशी निर्धारित केली या बाबत खुलासा व्हावा.

(३) शालेय शिक्षण निर्णय क्र. पी आरई १०९४/७०४/०२, दि. १४ डिसेंबर, १९९४ सोबतच्या प्रपत्र ' ब ' नुसार बस्करपट्ट्या इयत्ता १ व २ च्या वर्गापुढील ज्या वर्गातील मुलांना बाक पुरविले नाहीत अशासाठी खरेदी करावयाची आहे. परंतु या बाबत अभिलेखे दर्शविलेले नाही. त्यामुळे नियमाप्रमाणे खरेदी केल्याची खात्री झाली नाही.

(४) पुरवठादारास दिलेल्या पुरवठा आदेशामध्ये गट शिक्षणाधिकारी निहाय संख्या नसतानांही पुरवठादाराने कशा आधारे पुरवठा केला आहे.

(५) गट शिक्षणाधिकारी वसमत यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ९१ नुसार नमुना ३३ मध्ये साठा नोंद वह्या ठेवल्या नाहीत.

(६) बस्कर पट्ट्या दिनांक १६-०१-२००९ ला प्राप्त असताना शाळेचे मुख्याध्यापकांना दि. ०३-०२-२००९ रोजी वाटप केले आहे. म्हणजे उशिराने पुरवठा केला आहे.

(७) गट शिक्षणाधिकारी पं.स. औढा ना. यांनी दिनांक १५-०१-२००९ रोजी बस्करपट्ट्या प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. परंतु डिलिव्हरी चलानानुसार दि. १७-०१-२००९ रोजी साहित्य पुरवठा झाल्याचे दिसते. साहित्य प्राप्त पूर्वीचे साठा नोंदविलेला आहे.

(८) गट शिक्षणाधिकारी पं.स.कळमनुरी यांनी केंद्रीय प्राथमिक शाळा वारंगा फाटा यांना ४१ बस्कर पट्टी वाटप केल्या परंतु प्राप्त झाल्याबाबत मुख्याध्यापकाची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर शाळेंना पट्ट्या वाटप केल्याची खात्री करता आली नाही.

(९) अर्ध समास पत्र क्र. ०२, दि. १६-०४-२०१०, पत्र क्र. ०३, दि. २२-०४-२०१० पत्र ०४, दि. २३-०४-२०१० व पत्र क्र. ०५, दि. २६-०४-२०१० अन्वये गट शिक्षणाधिकारी सेनगांव यांना साठा नोंदवही ची मागणी करुन लेखा परिक्षणास दर्शविली नाही. त्यामुळे शाळेंना बस्कर पट्टया वाटप केल्याची खात्री झाली नाही.

(१०) म.जि.प.व.पं.सं. लेखासहिता १९६८ चे नियम ९१ नुसार शिक्षणाधिकारी यांनी किमान सहा महिन्यांतून शिल्लक साठ्याची पडताळणी केलेली नाही.

(११) म.जि.प.व.पं.स. लेखासंहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार बिले विरुप करणे आवश्यक असताना केली नाही.

(१२) बस्करपट्ट्याची सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन तपासणी केली नाही त्यामुळे दर्जा बाबत खात्री होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.—**

(१)मा.बी.व्ही.राठोड, उद्योग सह संचालक (भा.ख) विकास आयुक्त यांचे परिपत्रक क्रमांक/भांखस/हातमाग कापड/दर निश्चिती/(२३)/२००८-०९/बी-२८६६०, दि.९-७-२००८ यांच्या दर करारातील आदेशानुसार खरेदी करण्यात आलेली असून सदरील दर करारामध्ये करारनामा करुन घेण्यात आलेला नाही. यापुढे या विषयी दक्षता घेण्यात येत आहे.

(२)म.जि.प.व.पं.स. लेखा संहिता १९६८ चे नियम ८२ प्रमाणे ग.शि.अ. यांच्या होणा-या मासिक बैठकातून बस्कर पट्टया बाबत चर्चा करुन प्रत्येक तालुक्यातील शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या विचारात घेवूनच मागणी निश्चित केलेली आहे व तसे लेखी पत्र गट शिक्षण अधिकारी यांचेकडून घेण्यात आलेले आहे.

(३)शालेय शिक्षण निर्णय क्र.पीआरई/१०९४/७०४/०२, दि. १४ डिसेंबर, १९९४ सोबतच्या प्रपत्र 'ब ' नुसार बस्करपट्ट्या इयत्ता १ व २ च्या वर्गापुढील वर्गातील मुलांना आजपर्यंत बाक खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार व विभागासप्राप्त होणा-या तरतुदीनुसार तसेच या आधी उपलब्ध असलेल्या पट्ट्यांची संख्या लक्षात घेऊनच बस्करपट्टी खरेदी करण्यात आलेली आहे सोबत अभिलेखे उपलब्ध आहेत.

(४) विभागाचे पत्र जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-२/११/२००९, दि. ०३-०१-२००९ अन्वये पुरवठा आदेश संचिकेस उपलब्ध आहे. मागणी घेऊन त्यांचे मागणीनुसार गट शिक्षणाधिकारी कार्यालयास पुरवठा करण्यात आला आहे. एकूण २५५१ नग खरेदी केलेल होते. ०५ पंचायत समितीना समान वाटप केले (१) हिंगोली ५११ (२) वसमत ५१० (३) कळमनूरी ५१० (४) सेनगाव ५१० (५) औढा.पा. ५१०.

(५) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती वसमत यांनी लेखा संहिता १९६८ चे नियम ९१ नुसार नमुद ३३ मध्ये ठेवलेली आहे. नोंदवही उपलब्ध आहे.

(६) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगोली डीलेव्हरी क्रमांक १८८१, दिनांक १६-०१-२००९ व डीलेव्हरी क्रमांक ३०२, दिनांक १६-०१-२००९, असा आहे. सदर बस्करपट्ट्या सर्व मुख्याध्यापकांना बोलावून प्रत्यक्षात वाटप करण्याच्या कामात १५ दिवस विलंब झालेला आहे.

(७) गट शिक्षणाधिकारी पं.स.औढा.ना.यांना डिलिव्हरी चालाननुसार दि. १५-०१-२००९ रोजी साहित्य प्राप्त झाले होते. व त्याची नोंद साठा नोंदवहीवर दि. १५-०१-२००९ रोजीच नोंद घेण्यात आली आहे.

(८) गट शिक्षणाधिकारी कळमनुरी यांनी के.प्रा.शा.वारंगा फाटा यांना ४१ बस्करपट्ट्या वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच संबंधित मुख्याध्यापक यांची साहित्य प्राप्त झालेल्याची स्वाक्षरी घेतलेली आहे. या प्रती उपलब्ध आहेत.

(९) गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती सेनगाव यांनी बस्करपट्ट्या केंद्रीय मुख्याध्यापक यांना वाटप केलेले आहे. साठ नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

(१०) केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी नियमित भेटीमध्ये साठा तपासणी करतात. या विषयी अधिक दक्षता घेण्यात येत आहे.

(११) म.जि.प.व पं.स. लेखासंहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार बिले विरुप करण्यात आलेली आहेत.

(१२) म.जि.प व पं.स लेखासंहिता, १९६८ चे नियम ८३(३) अन्वये सदरील बस्करपट्ट्या पुरवठा आदेश प्रमाणे योग्य व सुस्थितीत प्राप्त झाल्याचे शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी प्रमाणीत केलेले आहे. यापुढे सक्षम प्राधिका-याकडून तपासणी करुन घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १४६ नुसार पुरवठादाराकडून करारनामा करुन घेतला नाही. त्यामुळे शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे, असा आक्षेप लेखा परिक्षकांनी नोंदविला आहे. त्यास मा.बी.व्ही. राठोड, उद्योग सह संचालक (भां.ख.) विकास आयुक्त यांचे परिपत्रक क्रमांक/भांखस/हातमाग कापड/दरनिश्चिती/ (२३)/२००८-२००९/बी-२८६६०, दि.०९-०७-२००८ यांच्या दर करारातील आदेशानुसार खरेदी करण्यात आलेली असून सदरील दर करारामध्ये करारनामा करुन घेण्यात आलेला नाही. यापुढे या विषयी दक्षता घेण्यात येत आहे. असे स्पष्टीकरण जिल्हा परिषदेने दिलेले आहे. दक्षता घेण्यात येणे म्हणजे काय, यावर शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, दरकरारानुसार बस्कर पट्टी खरेदी करण्यात आलेली होती. परंतु दरकरारामध्ये त्यासंदर्भात नमूद नसल्यामुळे ही चूक झालेली आहे. तसेच या योजनेवर एकूण ३ लाख ९७ हजार ९५६ एकूण खर्च करण्यात आले आहेत.

समितीच्या मते करारनाम्यानुसार ठरलेल्या मुदतीत पुरवठा करण्यात आला नसेल तर पुरवठा दारावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. परंतु सदरील दर करारामध्ये करारनामा करुन घेण्यात आलेला नाही. करारनामा करीत असताना संबंधित वस्तुचा दर्जा पहावा लागतो. पुरवठादाराने चांगल्या दर्जाचा पुरवठा केला नसेल, तर त्याच्यावर कारवाई करणे आवश्यक होते. समितीने या प्रकरणामध्ये शासनाचे मुद्रांक शुल्काचे नुकसान किती झाले आहे व करारनाम्यामध्ये विशिष्ट अटी संदर्भात नमूद

केलेले असते. हा करारनामाच केला नाही, त्यामुळे संबंधित वस्तुंचा पुरवठा वेळेवर मिळाला काय तसेच वस्तुंचा दर्जा कसा होता प्रश्नावर पुरवठा वेळेवर झालेला असुन दर्जाची पहाणी केली असल्याचे उत्तर देण्यात आले.

एका बस्करपट्टीची किंमत किती या प्रश्नाचे उत्तर शिक्षणाधिकारी यांना देता आले नाही यावर समितीने नाराजी व्यक्त केली. समितीच्या मते सदरहू प्रकरणी प्रत्यक्ष पुरवठा केला नसतानाही कागदोपत्री पुरवठा करण्यात आला आहे. साहित्य प्राप्त झाल्याची खोटी नोंद करण्यात आली आहे. शाळांची मागणी नसतानाही बस्करपट्ट्यांची खरेदी केली आहे.

ज्या विद्यार्थ्यांना बाके मिळाली नाहीत त्यांची संख्या आपण निश्चित केली आहे काय, तसेच गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आली होती काय तसेच शिक्षणाधिकाऱ्यांनी बस्करपट्ट्यांची संख्या कशी ठरविली या समितीच्या प्रश्नावर शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, शिक्षणाधिकारी यांचेकडील मागणीनुसार ५ पंचायत समित्यांना बस्करपट्ट्यांचे समान वाटप केले आहे. हिंगोली-५११, वसमत-५१०, कळमनुरी-५१०, सेनगाव-५१० आणि औंढा नागनाथ-५१० असे वाटप केले आहे. शाळांची एकत्रित मागणी होती म्हणून बस्करपट्ट्या एकत्रित खरेदी केलेल्या आहेत.

समितीने बैठकीस उपस्थित ग्राम विकास विभागाचे सह सचिव यांच्याकडून कर दरार निश्चित झाला असेल तर शासन निर्णयानुसार आपल्याला करारनामा करणे बंधनकारक आहे की नाही, यासंबंधी खुलासा विचारला त्यावर त्यांनी खुलासा केला की, मागणी नोंदविताना गरज किती आहे, त्यानुसार वस्तुंची मागणी केली पाहिजे. जो दर करार आहे, त्यानुसार वस्तुंचा सप्लॉय किती दिवसात करावा, या बाबींचा दर करारात उल्लेख असणे आवश्यक आहे.

ग्रामविकास विभागाच्या सचिवांचा खुलासा लक्षात घेता सदरहू प्रकरणात अनियमितता झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या प्रकरणाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करुन एक महिन्याच्या आत यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश समितीने दिले.

**समितीने भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.---**

बस्करपट्टी खरेदी प्रकरणी दरकरार करण्यात आला होता काय, व त्यानुसार खरेदी करण्यात आली होती काय, इत्यादीबाबत समितीने चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते त्यानुसार चौकशी केली आहे काय व उक्त चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली.

**चौकशी अहवाल**

समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीचा अहवाल समितीस सादर करण्यात आला. सदर प्रकरणी खरेदीमध्ये अनियमितता झालेली नसल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले आहे. तेव्हा सदर प्रकरणी कोणीही दोषी नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधीतावर कारवाई करण्यात आलेली नाही.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील लेखी माहिती प्राप्त झाली.---**

- बस्करपट्टी खरेदी करण्यासाठी शासनस्तरावर दरकरार करण्यात आला होता.
- व त्या दरकरानुसारच खरेदी करण्यात आलेली आहे.
- त्याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे.
- बस्करपट्टी खरेदीमध्ये अनियमितता झालेली नाही. तथापि पुरवठा आदेश देताना संबंधित एजन्सीकडून करारनामा केला नसल्यामुळे सद्य:स्थितीमध्ये एजन्सीकडून रु.१००/- मुद्रांक शुल्क प्राप्त केले आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून समितीस खालील लेखी माहिती प्राप्त झाली.---**

शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी ज्ञापन दि.१६-७-२००८ अन्वये ४ टक्के सादील अनुदानासाठी रु. ३९.८० लक्ष एवढी तरतूद ठेवण्यात आली होती. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आसन व्यवस्थेकरिता सन २००८-०९ मध्ये दरकरारानुसार बस्करपट्टी खरेदी करण्यात आली.

गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून सन २००८-०९ करिता विद्यार्थी संख्या निश्चित करुन घेण्यात आल्यानंतर मागणीनुसार उपलब्ध तरतुदीतून २५५१ नग प्रती नग १५६ रु.

दराने महाराष्ट्र स्टेट हॅन्डलुम कॉरपोरेशन लि. नागपूर यांना विभागीय उपसंचालकाच्या दि. ४-१२-२००८ अन्वये पुरवठा आदेश देवून खरेदी करण्यात आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांनी त्यांच्या दि. ३-१२-२००८ च्या आदेशान्वये रु.३,९८,०००/- इतक्या रक्कमेच्या बस्कर पट्टी खरेदीकरिता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली आहे. उद्योग सह संचालक उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन परिपत्रक दि. १९-७-२००८ अन्वये करण्यात आलेल्या दरकरारानुसार बस्कर पट्टीचा दर रुपये ११२.४० प्रती चौ.मी. आहे. त्यानुसार १.३९ मी, X११२.४० नुसार प्रती नग रु. १५६ प्रमाणे खरेदी करण्यात आली. दरकरारानुसार मागणपत्र मिळाल्यापासुन ६ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक होते. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), हिंगोली यांनी त्यांच्या दि.०३-०१-२००९ च्या पत्रान्वये व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांना बस्कर पट्टी पुरवण्याबाबत आदेश दिले. त्यानुसार विहित कालावधीत सदर बस्करपट्ट्या गट शिक्षणाधिकारी हिंगोली ५११ (दि. १६-०१-०९) वसमत ५१० (दि.१७-०१-०९) कळमनुरी ५१० (दि.१६-०१-०९), औंढा नागनाथ ५१० (दि.१५-०१-०९) सेनगाव ५१० (दि. १७-०१-०९) यांना संबंधित एजन्सीने पुरवठा केलेला आहे.

प्राप्त बस्करपट्ट्यांची गट शिक्षणाधिकारी कार्यालयात ठेवण्यात आलेला साठा नोंद घेवून केंद्रीय प्राथमिक शाळांना वाटप केल्याची खात्री करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे छायांकित अभिलेखे पडताळणीकरीता उपलब्ध आहेत. सदर बस्करपट्टी खरेदी प्रकरणी करारनामा करण्यात आलेला नसला तरी पुरवठा आदेशानुसार विहित कालमर्यादेत बस्करपट्ट्या पुरविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

### विभागीय सचिवांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी बस्कर पट्टी खरेदी प्रकरणी दर करार करण्यात आला होता काय, त्यानुसार खरेदी करण्यात आली काय, इत्यादि बाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार चौकशी अहवाल उक्त चौकशीत काय निष्पन्न

झाले, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यामध्ये ४ डिसेंबर २००८ रोजी बस्कर पट्टीचे आदेश रेट कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे देण्यात आले. दिनांक ३ जानेवारी २००९ रोजी कोणत्या तालुक्यामध्ये किती बस्कर पट्टी पुरवायची याबाबत पुरवठादाराला स्पष्टता देण्यात आली आणि ४ ब्लॉकमध्ये पुरवठा करण्यात आला. शेवटची तारीख १७ जानेवारी, २००९ ला होती. म्हणजे ओरिजनल ऑर्डरच्या दिड महिन्याच्या आत पुरवठा झालेला आहे. शासनाचा जो दर करारामध्ये आदेश होता त्यानुसार ६ आठवड्यात पुरवठा व्हायला पाहिजे तो पुर्ण झालेला आहे. सबसेंटीव्ह इश्युमध्ये कुठे अडचण नाही. परंतु त्याच्या सोबत दर करार ऑर्डर देताना एक एमओयू करायचा होता. जेणे करुन पुरवठा करताना उशीर झाला असता तर पेनल्टी रिकव्हर करता आली असती. एमओयू केला गेला नाही ही खरी परिस्थिती आहे. परंतु सगळे काही योग्य पध्दतीने झालेले आहे. त्यामुळे तांत्रिक अडचण आहे. त्यामुळे शासनाचा कोणताही तोटा झालेला नाही अशी परिस्थिती या प्रकरणामध्ये दिसते. एक असा मुद्दा दिसू शकतो, स्टॅम्प डयूटीचा १०० रुपयांचा कंत्राटदाराला खर्च आला असता तो झाला नाही. पण नंतर त्यांना शेवटी १०० रुपयांचा बॉन्ड पेपर घ्यायला लावलेला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

बस्करपट्टी खरेदी संदर्भात मागणी नसताना बस्करपट्टी संख्या कशी निर्धारीत केली, पुरवठा आदेशामध्ये गट शिक्षण अधिकारी निहाय संख्या नसतानाही पूरवठा कशाच्या आधारे केला, केंद्रिय प्राथमिक शाळा, वारंगाफाटा यांना ४१ बस्करपट्ट्या वाटप केल्या परंतू त्या प्राप्त झाल्याबाबत मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी नसणे, लेखा परिक्षणास कागदपत्र न दाखवणे, बस्करपट्ट्याची तपासणी सक्षम प्राधिकाऱ्याकडून न करणे, खरेदी करारनामा न करणे, इ. बाबत समितीने विचारणा केली होती. जिल्हा परिषदेकडून समितीस असे सांगितले की, मासिक बैठकातुन चर्चा करुन शाळा व विद्यार्थी संख्या पाहून बस्करपट्ट्यांची मागणी निश्चित केली. सदर बस्करपट्ट्या सर्व मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष बोलावून समक्ष वाटप करण्यात आल्या आहेत. या वाटपात १५ दिवसाचा विलंब झाला आहे. ज्या मुख्याध्यापकांनी ४१ बस्करपट्टी प्राप्त झाल्याची स्वाक्षरी केली नव्हती त्यांचेकडून मागावुन स्वाक्षरी घेण्यात आली आहे. सर्व संबंधीत कागदपत्र लेखा परिक्षणासाठी उपलब्ध केले आहे. सदरील बस्करपट्ट्या पुरवठा आदेशाप्रमाणे योग्य व सुस्थितीत प्राप्त झाल्याचे

शिक्षण अधिकारी (प्रा.) यांनी प्रमाणित केले आहे. यापुढे सक्षम प्राधिकारी यांचेकडून तपासणी करुन घेण्याची दक्षता घेण्यात येईल. खरेदी दराबरोबर करारनामा करण्याची दक्षता घेण्यात येईल असे समितीस चौकशी अहवालाव्दारे कळविण्यात आले.

समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन सदरचा चौकशी अहवाल समितीस पाठविला आहे. उक्त चौकशी अहवालातील निष्कर्षास व केलेल्या कार्यवाहीस शासनाने सहमती दर्शविली आहे. उक्त चौकशी अहवालात बस्करपट्टी खरेदी प्रकरणी गैरव्यवहार झाला नसल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले असुन यात कोणीही दोषी असल्याचे आढळून आले नसल्यामुळे कोणावरही कारवाई केली नाही असे नमूद केले आहे. **तथापि, लेखापरिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकास कागदपत्रे का उपलब्ध केली नाही याची माहिती चौकशी अहवालात नमूद केलेली नाही त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० चे कलम ७ अन्वये उक्त सर्व सबंधित दोषी अधिकाऱ्यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद हिंगोली

### प्राथमिक शाळांतील इ.१ ली ते ५ वी तील मुलांसाठी शालेय पोषण आहार योजना खर्चातील अनियमितेबाबत जिल्हा परिषद, हिंगोली सन २००८-०९ (परिच्छेद क्र. ३.१३३)

शालेय पोषण आहार योजनेवर पंचायत समिती कळमनुरीने रक्कम रु. ३,८०,६८९ खर्च केला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.---

(१) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्र. शापोआ १००२/१२७५/०२ प्रा.शि.४, दि. १६ मे २००२ नुसार सदर योजनेची अंमलबजावणी ग्राम शिक्षण समितीकडे आहे. शालेय पोषण आहाराचे रेखांकित धनादेश अध्यक्ष सचिव ग्राम शिक्षण समितीच्या नावे देणे ऐवजी ते मुख्याध्यापकाच्या नांवे देण्यात आले आहे.

(२) उक्त शासन निर्णयानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत संबंधित शाळांना शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत. परंतू सदर शाळांनी शिधापत्रिका न दर्शविल्यामुळे प्रत्यक्षात किती तांदुळ प्राप्त झाल्याची खात्री झाली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्र. शापोअ १००२/१२७५/ ०२/प्रा.शि. ४, दि. १६ मे २००२ नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इ. १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना वर्षातून किमान २०० दिवस आहार पुरवठा केलेला आहे या बाबत खुलासा व्हावा.

(४) संचालक प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. १४९ दि.१९-०९-२००६ नुसार विद्यार्थ्यांना ४५९ कॅलरीत १२ ग्रॅम प्रोटीन्स देण्याचे आदेश आहेत. परंतु प्रोटीनयुक्त आहार पुरविल्याची खात्री करावी.

(५) मुळ अर्धसमास पत्र क्र. १ दि. २४.१०.२००९ पत्रक्र. २ दि. २४-११-२००९ पप्रक्र.३ दि. १५-१२-२००९ तसेच पत्रक ४ दि. ३१-१२-२००९ अन्वये प्रा.श. मोरवड, सालवाडी, डिग्गी, मुंढळ, शेनोडी, गारोळ्याची वाडी, खडकद खु. यांना पोषण आहार संदर्भातील लेखे व अभिलेख्याची मागणी करुन दर्शविले नाही.

(६) शाळेने हजेरी पट लेखा परिक्षणात दर्शविले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.—**

(१) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्र. शापोअ १००२/१२७५/०२/प्रा.शि. ४ दि. १६ मे २००२ शापोआ योजनेची अंमजबजावणी ग्राम शिक्षण समितीकडे असल्याने शालेय पोषण आहाराचे रेखांकित धनादेश अध्यक्ष व सचिव यांचे नावे देणे आवश्यक आहे. याबाबत संबंधित गट विकास अधिकारी यांना दिनांक ३०-१२-२०१३ रोजी देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. परंतु खुलासा न मिळाल्याने सक्त ताकीद देण्यात येत आहे. सदर प्रकरणी कोणतीही आर्थिक अनियमितता झालेली नाही.

(२) सर्व के.प्रा.शा व अंतर्गत प्राथमिक शाळेची शालेय पोषण आहाराची शिधापत्रिका प्रती लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

(३) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्र. शापोआ. १००२/१२७५/०२/प्रा.शि. ४, दि. १६ मे २००२ नुसार शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इ. १ ते ५ वी विद्यार्थ्यांना वर्षातून २०० दिवस आहार पुरवठा करणे बंधनकारक असले तरी आक्षेपात नमूद शाळेतील मुख्याध्यापक यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या आहारानुसार विद्यार्थ्यांना आहार पुरवठा केलेला आला आहे. त्यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकाची काहीच चुक नाही.

(४) मुख्याध्यापकांच्या अभिलेख्याची पाहणी केली असता प्रोट्रीन युक्त आहार विद्यार्थ्यांना देण्यात आल्याचे दिसून येते. कागदपत्रे व बीले उपलब्ध आहेत.

(५) सर्व के.प्रा.शा व अंतर्गत प्राथमिक शाळेची शालेय पोषण आहाराची अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत. या कार्यालयातील कर्मचाऱ्यांमार्फत अभिलेख्याची पाहणी करण्यात आलेली आहे. त्याची सत्यप्रत उपलब्ध आहे.

(६) विद्यार्थी संख्या योग्य असल्याबाबत संबंधित शाळेचे विद्यार्थी उपस्थितीपट विद्यार्थी संख्या योग्य असल्याबाबत खात्री करण्यासाठी उपलब्ध आहेत.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहार योजनेवर पंचायत समिती,कळमनुरीने रूपये ३,८०,६८९.०० इतका निधी खर्च केला आहे. त्यासंबंधात लेखा आक्षेप काढला असून पोषण आहाराचे धनादेश मुख्याध्यापकांच्या नावे कोणत्या प्राधिकारान्वये देण्यात आले आहेत, पोषण आहार पुरवठा केलेल्या शाळांच्या शिधापत्रिका लेखापरीक्षणास का दर्शविण्यात आलेल्या नाहीत याचा खुलासा करण्यात यावा त्यावर शिक्षणाधिकारी यांनी उत्तर दिले की, या प्रकरणी संबंधित गट शिक्षण अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. शाळांनी शिधापत्रिका दर्शविल्या नाहीत असा आक्षेप लेख्यामध्ये नोंदविण्यात आला आहे. तथापि, प्राथमिक शाळेची शालेय पोषण आहाराची शिधापत्रिका प्रती आता लेखा परीक्षणासाठी उपलब्ध आहे. तसेच, ज्या गट शिक्षण अधिकाऱ्यांना ताकीद देण्यात आली आहे, त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने संबंधितांचे सेवापुस्तक अवलोकनार्थ मागितल्यानंतर ते समितीस उपलब्ध करून देण्यात आले नाही. समितीने साक्षीच्या वेळी जाणूनबुजून खोटी साक्ष देणे, सत्य लपविणे, समितीची दिशाभूल करणे ही बाब गांभीर्याने घेतल्याचे व याबाबतीत विधानमंडळाचा हक्कभंग होतो हे स्पष्ट केले असता शिक्षणाधिकारी यांनी समितीसमोर आपली चूक कबुल करून क्षमायाचना केली असता समितीने शिक्षणाधिकारी श्री. पवार यांना सक्त ताकीद देऊन त्यांच्यावर कारवाई करावी असे निदेश दिले.

समितीने शिधापत्रिका उपलब्ध नसताना वाटप कसे केले, धान्य प्राप्त झाले याची शिधापत्रिका नसताना नोंद कशी ठेवली तसेच शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता मुख्याध्यापकांनी धनादेश काढण्याचे कारण काय असे प्रश्न विचारले असता शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, काही शिधापत्रिका उपलब्ध होत्या, तर काही उपलब्ध नव्हत्या. स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून धान्य वाटप करण्यात आले होते. सध्या शिधापत्रिकेच्या प्रती लेखा परीक्षणासाठी उपलब्ध आहेत. शालेय शिक्षण पोषण आहार योजनेची अंमलबजावणी ग्राम शिक्षण समितीकडे आहे. जी रक्कम मुख्याध्यापकांना वाटायला दिली होती ती त्यांनी वाटलेली आहे. ती सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत. वाटपामध्ये कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

समितीच्या मते अध्यक्ष आणि सचिव यांच्या सह्या असल्याशिवाय धनादेश वटू शकत नाही. परंतु धनादेशावर केवळ मुख्याध्यापकांची सही आहे, असे निदर्शनास आले. सदरहू बाब गंभीर स्वरुपाची आहे. या विषयासंदर्भात सखोल चौकशी करण्यात यावी. याबाबत मुंबई येथे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश समितीने दिले.

**समितीने भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.**

१. शालेय पोषण आहार योजने अंतर्गत अध्यक्ष व सचिव यांच्या नावाने धनादेश काढणे आवश्यक असूनही तो मुख्याध्यापकाच्या नावाने काढण्यात आला?

२. तसेच शिधापत्रिका उपलब्ध नसताना स्वस्त धान्याचे वाटप करण्यात आले या प्रकरणाची चौकशी केली काय?

३. असल्यास तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली.

४. नसल्यास, विलंबाची कारणे काय?

५. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेऊन सक्त ताकीद देण्यात आली आहे काय?

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद हिंगोली यांनी चौकशी करून अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात असे नमूद आहे की, प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शिजवलेल्या अन्नाचे देयकावर रक्कम प्रदान करण्याबाबत अध्यक्ष व सचिव यांचे नावे देण्यात यावे असे नमूद न करता केंद्रीय मुख्याध्यापक यांचे नावे धनादेश देण्यात यावे असे नमूद केले आहे. याबाबत त्यांना सक्त ताकीद देऊन त्याबाबतची नोंद संबंधिताच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन निर्णय क्र.शापोआ-१००२/१२७१/०२ प्राथमिक शिक्षण-०४, दिनांक १६-०५-२००२ अन्वये शालेय पोषण आहार योजना अंतर्गत अध्यक्ष व सचिव यांच्या नावाने धनादेश देण्यासाठी शासनाचे निर्देश आहेत. परंतू संबंधित गट शिक्षण अधिकारी यांनी मुख्याध्यापकांच्या नावे धनादेश दिलेले आहेत, ही बाब सत्य आहे. सदर प्रकरणी या कार्यालयाचे पत्र क्र.३५२/२०१५, दिनांक ५/०९/२०१५ अन्वये क्षमापनासाठीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे.

याबाबत चौकशी करण्यात आली आहे. चौकशी मध्ये ज्या शाळांना शिधापत्रिका देण्यात आल्या नव्हत्या त्या शाळांना संबंधित गावातील रेशन दुकानदारांना तहसील मार्फत परमिट देऊन शाळांना आहार पुरवठा करण्यात आलेला आहे.

या कालावधीत गट शिक्षणाधिकारी (१) श्री.कदम एस, बि. हे दिनांक ३०-०६-२००९, (२) श्री.मुकाडे एम.आर. हे दिनांक ३०-६-२०१२ व (३) श्री.के.डी.वाठोडे हे दिनांक २८-०२-२०१० रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यामुळे सध्या कार्यरत गट शिक्षणाधिकारी यांना सदर प्रकार पुन्हा भविष्यात असे होऊ नये या बाबत या कार्यालयाचे पत्र क्र.११४०/२०१५ दिनांक ३०-१२-२०१३ अन्वये कळविण्यात आलेले आहे. याबाबत विलंब झालेला नाही. या कालावधीतील गट शिक्षणाधिकारी यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे. तसेच पंचायत राज समितीस खोटी माहिती दिल्याबद्दल श्री.पवार एस.इ.तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा) यांच्या मूळ सेवापुस्तिकेत पान क्र.७७ वर ताकीद देवून नोंद घेण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दिनांक १६/०५/२००२ च्या शासन निर्णयान्वये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त निधी जमा करण्यासाठी ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव (मुख्याध्यापक) यांच्या नावाने संयुक्त खाते उघडण्याचे निर्देश दिलेले आहेत. तालुकास्तरावरुन योजनेसाठीचा निधी ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त नांवे देणे आवश्यक होते. तथापि, गट शिक्षणाधिकारी यांनी सदर धनादेश केंद्र शाळेच्या मुख्याध्यापक यांच्या नांवे

दिले. केंद्र शाळेच्या मुख्याध्यापकांनी सदर निधी संबधित मुख्याध्यापकांना वाटप करून मुख्याध्यापकांमार्फत अन्न शिजवणाऱ्या या यंत्रणांना निधी देण्यात आलेला आहे. तथापि, तत्कालीन गट शिक्षणाधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेले नाही. सदर गट शिक्षणाधिकारी दिनांक २८/२/२०११ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.

सन २००८-२००९ मध्ये काही शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध होत्या. तर काही शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध नव्हत्या. ज्या शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध नाहीत, अशा शाळांकरीता तत्कालीन तहसीलदार यांनी त्या गावातील रेशन दुकानदारांना परमिट दिलेले होते. त्या परमिटनुसार शाळांना तांदुळ पुरवठा करण्यात आलेला आहे.

पंचायत राज समितीने दिनांक २४,२५ व २६ जून, २०१५ रोजी हिंगोली जिल्हा परिषदेस भेट देऊन घेतलेल्या साक्षीवेळी समितीस चुकीची माहिती दिल्याबाबत तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री.पवार यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी केंद्र पातळीवर शिक्षकाच्या नावाने त्या केंद्रामध्ये सर्व शाळांचे शालेय पोषण आहाराचे पैसे देण्यात आले. ते नियमानुसार त्या-त्या शाळांना द्यायला पाहिजे होते. परंतु नंतर त्या केंद्र शाळेच्या शिक्षकांनी प्रत्येक शाळेला पैसे दिले व ते योग्य पध्दतीने खर्च झालेले आहेत. त्यामुळे तिथेपण सबसेन्टीव्ह इश्यूमध्ये कुठे अडचण नाही. हा तांत्रिक मुद्दा आहे. त्यावेळी तशाप्रकारची सिस्टीम होती. त्यावेळी तालुका, केंद्र शाळेचे शिक्षक वैगरे आता तशी सिस्टीम नाही. सध्या पैसे डायरेक्टली बँक अकाऊंटमध्ये जमा होतात. तो मुद्दा सिस्टीम इम्प्रुव्हमेंटच्यादृष्टीने बघायचे झाले तर सिस्टीम इम्प्रुव्ह करण्यात आलेली आहे. त्यावेळी ती तांत्रिक चूक झाली. त्यामध्येही सबसेन्टीव्ह इश्यू नाही हा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा प्रत्येक शाळेला शिधापत्रिका असायला पाहिजे. त्यानुसार तांदुळ दिले पाहिजे याबाबत आधीपासूनच आदेश आहेत. तेथे तहसिलदारांनी प्रत्येक शाळेला परमिट दिले. त्याप्रमाणे तांदुळ दिले. सध्या अशी पध्दत नाही. प्रत्येक शाळेच्या शिधापत्रिकेनुसार तांदुळ दिले जातात अशी व्यवस्था आहे.

त्यामध्ये तो सबसेन्टीव्ह नाही तांत्रिक आहे. त्यामुळे त्यावेळच्या अधिकाऱ्यांवर चौकशी, कारवाई करावी असे समितीने मत दिले होते. परंतु तेथे श्री.मुकाडे नावाचे पी.ओ. होते ते दि.३० जून २०१२ साली सेवानिवृत्त झालेले आहेत. परंतु शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी साक्षीच्या वेळी उत्तर देताना काही चुका केल्या, त्यांनी योग्य पध्दतीने माहिती दिली नाही . त्यामुळे त्या शिक्षणाधिकाऱ्याला नोटीस बजावण्यात आली. त्यांना ताकीद देण्यात आली आणि त्यांच्या सेवापुस्तकात दि.१९ ऑक्टोबर, २०१५ रोजी नोंद घेण्यात आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याप्रकरणी सखोल चौकशी करून विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी अहवाल पाठविण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार "दिनांक १६-०५-२००२ च्या शासन निर्णयान्वये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त निधी जमा करण्यासाठी ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव (मुख्याध्यापक) यांच्या नावाने संयुक्त खाते उघडण्याचे निर्देश दिलेले आहेत. तालुकास्तरावरून योजनेसाठीचा निधी ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त नांवे देणे आवश्यक होते. तथापि, गट शिक्षणाधिकारी यांनी सदर धनादेश केंद्र शाळेच्या मुख्याध्यापक यांच्या नांवे दिले. केंद्र शाळेच्या मुख्याध्यापकांनी सदर निधी संबंधित मुख्याध्यापकांना वाटप करुन मुख्याध्यापकांमार्फत अन्न शिजवणाऱ्या या यंत्रणांना निधी देण्यात आलेला आहे. तथापि, तत्कालीन गट शिक्षणाधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली नाही. सदर गट शिक्षणाधिकारी दिनांक २८-२-२०११ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. सन २००८-२००९ मध्ये काही शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध होत्या. तर काही शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध नव्हत्या. ज्या शाळांमध्ये शिधापत्रिका उपलब्ध नाहीत, अशा शाळांकरीता तत्कालीन तहसीलदार यांनी त्या गावातील रेशन दुकानदारांना परमिट दिलेले होते. **त्या परमिटनूसार शाळांना तांदुळ पुरवठा करण्यात आलेला आहे" समितीने निदेश दिल्यानुसार जिल्हा परिषदेने कार्यवाही केली असल्याने तसेच उक्त कार्यवाहीस शासनाने सहमती दर्शविली आहे. त्याचप्रमाणे हिंगोली जिल्हा परिषदेच्या साक्षीच्या वेळी शिक्षण अधिकारी (प्रा.) यांनी समितीची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांचेवरही शासनाने कार्यवाही केली असल्यामुळे समिती याप्रकरणी समाधान व्यक्त करते.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, हिंगोली

### जिल्हा परिषद, हिंगोली नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील अनियमितते-बाबत (परिच्छेद क्रमांक ३.३०९)(सन २००८-२००९)

जिल्हा परिषद, हिंगोली च्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.एसीडी/१०९९/सीआर/२७३/२६, दिनांक १८/७/२००० द्वारे रुपये ४८१.९८ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम यांनी वेगवेगळ्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केली आहे. अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंध, सहकारी संस्था, हिंगोली यांच्या शिफारशी नुसार विविध मजूर सहकारी संस्थेला कामे देऊन सदरील कामावर रुपये १५,२७,५७५/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र. झेडपीए २०००/ प्र.क्र. ४०२३/३३, दिनांक १२ जानेवारी २००१ मधील टीप-१ नुसार सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेची व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती विषय समितीच्या पुढील अवलोकनार्थ सादर केलेली नाही.

मजूर सहकारी संस्थेला काम देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांना लिहिलेले पत्र संचिकेत नाही, खुलासा होणे आवश्यक (प्रमाणक क्र. ५७,७२३,१३८).

निविदेतील जोडपत्र १ मधील अट क्र. १ (अ) व महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए २००८/प्रक्र.४२८/वित्त ९, दि. २१-७-०७ नुसार कोऱ्या निविदा संचाची रक्कम वसूल केल्याबाबत चलन दर्शवून खात्री पटविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. एमपीबी/१०६६/२५०१७४/ एम-१७, दि.१७/१२/१९७२ नुसार सुरक्षा अनामत रकमेच्या ३ टक्के च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. कमी रकमेच्या मुद्रांकावर करारनामा केल्यामुळे शासनाने रु.२६०२/- नुकसान झाले आहे रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

विमा संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. प्रविदी/ १८९१/ सिडीआर/जिल्हा परिषद संकीर्ण दिनांक ३०/७/२००२ तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. जिल्हा परिषद २०००/प्र.क्र.८३७/ प.रा. ८(३५), दिनांक १५ सप्टेंबर २००३ नुसार ठेकेदाराने कामावर नेमलेल्या मजुराचा विमा काम सुरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक आहे. तसेच कनिष्ठ तांत्रिक अधिकारी, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्र.वि.नि.२३०५ कार एवल्युसी XXXVII यादी४/फ-२ दिनांक २७ जानेवारी, २००६ अन्वये जे कंत्राटदार कार्यादेशाच्या तारखेपासून २ महिन्याच्या आत विमा हप्ता भरणार नाही अशा कंत्राटदारांच्या कंत्राटी कामाच्या पहिल्या देयकातून १ टक्के एवढी रक्कम कपात करावयाची असताना त्याप्रमाणे कपात न करता रक्कम रुपये १५,०१५ कमी कपात केलेली आहे. कमी कपात केलेली रक्कम रुपये १५,०१५ वसूल होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र. जीआर३४/का-४/५१६२, दिनांक २ जानेवारी १९८७ व क्र.एसटीआर१०९७ /प्र.क.०६, दिनांक ९/२/१९९८ नुसार साहित्याची तपासणी शासकीय प्रयोगशाळा किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून करुन घेतलेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १६९ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.झेडपीए २०००/ प्र.क्र.४४/३३, दिनांक २/१२/२००० नुसार कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तिकेत नमूद केलेल्या नाहीत.

जिल्हा परिषद नवीन प्रशासकीय इमारत परिसरात बाग-बगिचा तयार करणे हे काम ठेकेदाराने विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही. तसेच मुदतवाढ मागितलेली नाही. काम आहे त्या स्थितीत अंतिम केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे (प्रमाणक क्र. १३८)निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट २४ मधील नियम १३ व १५ नुसार मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने तिरकी रेष मारलेली नाही.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा संहिता, १९६८ चे नियम ४ प्रमाणे जिल्हा परिषदेअंतर्गत कामाच्या प्रशासकीय व निविदा मंजुरीची केलेली कार्यवाहीची माहिती पुढील स्थायी समिती/विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र. २६२६, दि. २३-१२-२००८ व जाक्र. १२०, दि. १६-११-२००९ अन्वये काम वाटपाबाबत पत्र दिलेले असून त्याप्रमाणे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांनी काम वाटप करून यादी दिलेली आहे.

कोऱ्या निविदा संचाची रकम चलनाद्वारे परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकशाखा हिंगोली येथे भरणा करून घेऊनच निविदा पुस्तिका विक्री केली आहे. चलनाची छायांकित प्रत उपलब्ध आहे.

करारनाम्यातील कमी रकमेचे रुपये २७००/- चे मुद्रांक खरेदी करून क्रॉस करून संबंधितांकडून वसूल करण्यात आलेली आहे.

सदर कामाच्या धावते व अंतिम देयकातून अंदाजित रक्कमेवर १% प्रमाणे विमा रक्कम कपात करण्यात आली असून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. रक्कम भरल्याची पावती उपलब्ध आहे.

दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद, जिल्हा प्रयोग शाळा, परभणी यांचा चाचणी अहवाल घेण्यात आला आहे. चाचणी अहवालाची प्रत उपलब्ध आहे.संबंधित शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत दिनांक नमूद केलेला आहे. सर्व मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहेत.

जिल्हा परिषद प्रशासकीय व निवासी इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून सन २०००-२००१ मध्ये मंजुरी प्राप्त झालेली होती. सदर प्राप्त मंजुरीनुसार प्रशासकीय इमारतीत बागबगीचा तयार करणे हे काम हाती घेण्यात आले होते. संबंधित कामाचे कंत्राटदार यांनी काम पूर्ण न केल्यामुळे संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. व आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आलेले आहे.

यापुढे निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता (बांध) यांची स्वाक्षरी घेणे बाबत दक्षता घेण्यात येत आहे.

मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने दोन तिरकी रेषा मारल्या आहेत. तसेच यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्र. झेडपीए २०००/प्रक्र ४०२३/३३, दिनांक १२ जानेवारी २००१ मधील टीप-१ नुसार सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेची व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती विषय समितीच्या पुढील अवलोकनार्थ सादर केलेली नाही. तसेच मजूर सहकारी संस्थेला काम देण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांना लिहिलेले पत्र संचिकेत नाही, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. यासंदर्भात आपण लेखी उत्तरामध्ये सांगितले आहे की, लेखा संहिता, १९६८ चे नियम ४ प्रमाणे जिल्हा परिषदेअंतर्गत कामाच्या प्रशासकीय व निविदा मंजुरीची केलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील स्थायी समिती/विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व विषय समितीसमोर का सादर केली नाही, कमी रकमेचे मुद्रांक पेपर घेण्यास कोण जबाबदार आहे,कंत्राटदाराकडून विमा रक्कम का कपात केली नाही, या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासणी का करण्यात आली नाही, मोजमाप पुस्तिकेत दिनांकित नोंदी का घेण्यात आल्या नाहीत, काम अपूर्ण अवस्थेत अंतिम करण्यात आले आहे, ही कार्यवाही कोणत्या प्राधिकाराान्वये केली, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पहिल्या प्रश्नाबाबत खुलासा केला की, प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व विषय समितीसमोर सादर केली नसल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत दक्षता घेण्यात येईल.

समितीने सदरहू माहिती समितीपुढे ठेवणे बंधनकारक असतानाही माहिती ठेवण्यात आलेली नाही. याला जबाबदार कोण आहे, ही बाब २००८ पर्यंत विषय समिती पुढे ठेवली होती काय, असा प्रश्न विचारला त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या-त्या समितीसमोर निविदेची मान्यता आणि दर मान्यतेसाठी ठेवण्यात येत नाही. परंतु सर्व समित्यांचे प्रशासकीय ठराव घेतलेले आहेत. विभाग प्रमुखांकडून प्रशासकीय मान्यता घेऊन प्रत्यक्ष खरेदीची कार्यवाही झाल्यानंतर केलेल्या खरेदीचा दर आणि निविदा याबाबतची माहिती समितीपुढे ठेवली जाते. परंतु, ही माहिती मिळविण्याकरिता त्या ठरावाचा संदर्भ देऊन प्रत्यक्ष झालेला खर्च त्या समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. जवळपास सर्व विभागाकरिता अशी कार्यवाही झाल्याचे आपल्याला दिसून येईल असे उत्तर दिले.

समितीच्या मते ही बाब गंभीर होती तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मते ही बाब प्रत्यक्ष समिती समोर ठेवली नाही. परंतु, खर्च दाखवून अप्रत्यक्षपणे समितीसमोर ठेवण्यात आलेली आहे.

अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांच्या शिफारशीनुसार विविध मजूर सहकारी संस्थेला कामे देऊन सदरील कामावर रुपये १५ लाख २७ हजार ५७५ रुपये खर्च नोंदविला आहे. तसेच, जिल्हा परिषद, हिंगोली नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चासाठी ४ कोटी ८१ लाख ९८ हजार रुपयांच्या रकमेस प्रशासनाने मान्यता दिलेली असून आतापर्यंत १५ लाख रुपये खर्च केले आहेत. जिल्हा परिषद, हिंगोली येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे काम अर्धवट असतानासुध्दा जिल्हा परिषदेने ४ कोटी ८१ लाख ही पूर्ण रक्कम देण्याचे कारण काय आहे, नवीन प्रशासकीय इमारतीची सध्याची स्थिती काय आहे, याबाबत समितीने संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा मागीतला. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट उत्तर न देता आता संबंधित ठेकेदारास धावते बिल ४ कोटी ८१ लाख रुपये दिले आहेत. पूर्वी १५ लाख २७ हजार रुपया संबंधीचा लेखा परीक्षणाचा आक्षेप होता असे समितीस सांगितले. समितीने इमारतीचे बांधकाम, साहित्य, गुणवत्ता याची तपासणी केली आहे काय असे विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी इमारतीच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी केली असून सन २००९ चा लेखी रिपोर्ट उपलब्ध असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट २४ मधील नियम १३ व १५ नुसार मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने तिरकी रेष मारलेली नाही, हे खरे आहे काय, या प्रश्नावर हे चुकीचे झालेले आहे हे मला मान्य आहे, असे कार्यकारी अभियंता यांनी कबूल केले.

समितीने इमारत बांधकामाच्या निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच, मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने तिरकी रेष मारलेली नाही. या प्रकरणी अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा दिसून येतो. या प्रकरणाची तपासणी करावी व संबंधित अधिकाऱ्यावर कडक कारवाई करावी आणि त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी असे निदेश दिले.

समितीच्या जिल्हा परिषद, हिंगोली येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी ४ कोटी ८१ लाख रुपये खर्च आला. या रकमेपेक्षा जास्त खर्च झाला आहे काय या प्रश्नावर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला सध्या ही माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले असता समितीने त्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सदरहू कामावर एकूण खर्च रूपये १४.३४ कोटी इतका झाला आहे. जिल्हा परिषद, प्रशासकीय इमारतीला सन २००० मध्ये मंजुरी मिळाली होती. सन २००१ ते २०१२ पर्यंत निधी मिळाला. सन २०१३ मध्ये ४ कोटी रूपये मुख्य इमारतीसाठी मिळाले, अशी माहिती समितीला मिळाल्यावर समितीने सन २००१ ते २०१२-१३ या कालावधीत इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे या इमारतीची किंमत देखील वाढली हे मान्य करुन या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेतली आहे काय, असल्यास, त्यास कोणी मंजुरी दिली आहे, विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदारावर कारवाई केली होती काय, किती वर्षात हे काम पूर्ण करावयाचे होते व कंत्राटदारांनी किती वर्षामध्ये हे काम पूर्ण केले आहे. याबाबत माहिती विचारली. परंतु या प्रश्नांवर समितीस उत्तरे प्राप्त झाली नाहीत. त्यामुळे सदरहू प्रश्नावर अभ्यास करून उत्तर देण्याकरिता समितीने बैठक एक तास स्थगित केली.

श्री. शाम किवळेकर (तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली) यांच्या कार्यकाळात इमारतीचे काम पूर्ण झाले होते. इमारतीकरिता १४.३५ कोटी रुपये आवश्यक होते. त्यापैकी गोदाम बांधकाम, बैठक हॉल,

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान, वर्ग-२, वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारत इत्यादींवर १४.२९ कोटी रुपये खर्च झालेला असून ६ हजार रुपये जमा असल्याची माहिती समितीस देण्यात आली.

समितीने या कामाकरिता मुदत वाढ मागण्यात आली होती काय, असे विचारले असता तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी यासंदर्भातील माहिती संध्याकाळपर्यंत उपलब्ध करून देतो, असे समितीस सांगितले.

समितीच्या मते जिल्हा परिषद नवीन प्रशासकीय इमारत परिसरात बाग बगीचा तयार करणे हे काम ठेकेदाराने विहित मुदतीत पूर्ण केलेले नाही. तसेच कामास मुदत वाढ मागितलेली नाही. काम आहे त्या स्थितीत अंतिम केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. सदरहू काम अपूर्ण असतानादेखील पूर्ण कामाचे पैसे देण्यात आले. संबंधित ठेकेदाराला काम पूर्ण केले नसल्यामुळे काळ्या यादीत टाकण्यात आले, असे स्पष्टीकरणामध्ये दिलेले आहे. ही कारवाई योग्य आहे. परंतु, आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आलेले आहे, याचा अर्थ काय होतो, आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आले म्हणजे काय, या सर्व आरोपावर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही. लेखापरीक्षकांना दिलेला अनुपालन अहवाल पंचायती राज समितीलादेखील दिला असून समितीने विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे अहवालामध्ये जे स्पष्टीकरण अथवा उत्तर दिले आहे, तेच सांगितले गेले आहे. ठेकेदाराने काम केले काय, त्यांना काळ्या यादीत टाकले का, याचे उत्तर होय दिले. परंतु, आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आल्यामुळे संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले.

कॉन्ट्रक्टदाराने सब कॉन्ट्रॅक्टदाराकडून काम करून घेतले आहे, हेही खरे आहे काय, असल्यास, त्यास परवानगी घेतली होती काय, असल्यास, सदरहू परवानगी कोणी दिली. सदरहू ठेकेदाराने विहित मुदतीत काम पूर्ण केले नसल्यामुळे त्याच्यावर दिवसाला ५-१० हजार रुपये दंडात्मक स्वरुपाची कारवाई केली होती काय, नसल्यास, आर्थिक स्वरुपाची कारवाई न करणाऱ्या कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्यात आली काय, या प्रश्नावर देखील समितीस उत्तर प्राप्त झाली नाहीत.

समितीने अधिकाऱ्यांकडून योग्य उत्तर मिळत नाही. त्यांना अधिक नियम माहित असतात. त्यांनी दिलेले उत्तर पटण्यासारखे व योग्य नाही. हे बरोबर नाही असे मत नोंदवून प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

**समितीने भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत अधिक माहिती मागविली.**

प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व विषय समितीसमोर का सादर केली नाही. तसेच, संबंधित कंत्राटदाराने वेळेत कामे न करता विलंब लावला असल्यामुळे उक्त कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई न करण्याचे कारण काय ? या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय ? उक्त चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यात कोण कोण दोषी आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली ?

**चौकशी अहवाल**

समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीचा अहवाल समितीस सादर करण्यात आला. सदर प्रकरणी प्रशासकीय मान्यतेची व निविदा मंजुरीची माहिती विषय समिती, स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही व निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत यावरुन तत्कालीन कार्यकारी अभियंता हे अंशतः दोषी दिसून येतात.

जिल्हा परिषद, प्रशासकीय इमारती मधील बागबगीचा तयार करणे या कामाबाबत संबंधित ठेकेदार यांनी विहित कालावधीत सदरचे काम पूर्ण केले नसल्यामुळे संबंधित ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकण्यात आले असून त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती स्थायी समिती व विषय समितीसमोर सादर करण्यात आली नाही.

२. अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली

यांना या कार्यालयाचे पत्र जा. क्र.२६२६, दिनांक २३-०२-२००८ व जा. क्र/१२०, दिनांक १६-०१-२००९ अन्वये काम वाटपाबाबत पत्र दिलेले असून त्याप्रमाणे जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांनी काम वाटप करून यादी दिलेली आहे.

३. कोऱ्या निविदा संचाची रक्कम चलनाद्वारे परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा हिंगोली येथे भरणा करून घेवूनच निविदा पुस्तिका विक्री केली आहे. चलनाची छायांकित प्रत उपलब्ध आहे.

४. करारनाम्यातील कमी रकमेचे रु. २७००/-चे मुद्रांक खरेदी करून क्रॉस करून संबंधीताकडून वसूली करण्यात आली आहे.

५. सदर कामाच्या धावते व अंतिम देयकातून अंदाजित रकमेवर १% रक्कम विमा रक्कम कपाती करण्यात आली असून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. रक्कम भरल्याची पावती उपलब्ध आहे.

६. दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद, जिल्हा प्रयोग शाळा, परभणी व नांदेड यांचा चाचणी अहवाल घेण्यात आला आहे. चाचणी अहवालाची प्रत उपलब्ध आहे.

७. संबंधित शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत दिनांक नमूद केलेला आहे. सर्व मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहेत.

८. जिल्हा परिषद शासकीय इमारतीमधील बागबगीचा तयार करणे या कामाबाबत संबधित ठेकेदार यांनी विहित कालावधीत सदरचे काम पूर्ण न केल्यामुळे चेअरमन जलेश्वर मजूर सहकारी संस्था, हिंगोली यांना सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण ०५-०६-प्र क्र ५३-इमा २, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक २८-०२-२००६ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार सक्षम अधिकारी यांना संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याचे अधिकार असल्याने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र क्र. १५६९, दिनांक २०-०६-२०१५ अन्वये काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदरचे काम आहे त्या स्थितीत अंतिमिकरण करुन दिनांक ३०-०९-२००९ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

म.जि.प.व.प.स.लेखा सहिंता, १९६८ चे नियम १४८ नुसार व निविदेतील ब १ कराराच्या शर्त क्र.०२ नुसार कामास विलंब झाल्यास ०१ ते १०% दंड आकारण्यात येतो. मोजमाप पुस्तिका क्र. ५९७, पान क्र.९ वर पहिले धावते देयकाचे तपासणी केली असता सदरहू कंत्राटदारास दिनांक ३१-०३-२००९ पर्यंत मुदतवाढ १% दंड आकारुन मंजूर करण्यात आलेली आहे. दंडाची रक्कम रु.३४०१/- वसूल करण्यात आलेली आहे. तसेच वरील मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे आता दंडात्मक कार्यवाही म्हणून संबंधिताची सुरक्षा अनामत रक्कम रु.१६,८०३, दिनांक २४-०९-२०१५ रोजी जप्त करून परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक, हिंगोली शाखेच्या सदरील कामाच्या लेखा-शिर्षात जमा करण्यात आली आहे. असा एकूण दंड रु.२०,२०४/- म्हणजेच एकूण निविदा रक्कम रु. ९,७५,९४६/- च्या २.०७% एवढा वसूल करण्यात आलेला आहे. चलन प्रत उपलब्ध आहे.

९. निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

१०. मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने दोन तिरक्या रेषा मारलेल्या आहेत.

**केलेली कार्यवाही**

प्रशासकीय मान्यतेची निविदा मंजुरीची माहिती विषय समिती, स्थायी समितीच्या पुढील बैठकीस अवलोकनार्थ सादर केलेली नाही व निविदाच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या नाहीत. या अनियमिततेसाठी तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. श्याम किवळेकर यांचेवर म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम, १९७९ प्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.२५१७, दिनांक ३०-१०-२०१५ अन्वये सादर करण्यात आला आहे.

तसेच प्रशासकीय इमारतीतील बागबगीचा तयार करणे हे काम वेळेत पूर्ण न केल्यामुळे कंत्राटदार दोषी आढळून आल्यामुळे संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात आले असून त्यांचेवर रु. २०,२०४ एवढे रुपये वसूल करून दंडात्मक कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी संबंधित कंत्राटदाराने विलंब लावला असल्यामुळे उक्त कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, चौकशीमध्ये कोण दोषी आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली, यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विशद केले की, जिल्हा परिषद, हिंगोली येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम खर्चातील प्रशासकीय खर्चाबाबत चौकशी करण्यात आली. चौकशीत असे आढळून आले की, प्रशासकीय मान्यतेसाठी हा प्रस्ताव स्थायी समिती व संबंधित विषय समितीसमोर सादर करण्यात आला नव्हता. तसेच मुद्रांक शुल्क भरुन घ्यावयास हवे होते ते भरण्यात आले नव्हते. विम्याची १% रक्कम घेण्यात आली नव्हती. संबंधित सोसायटीने काम पूर्ण न केल्यामुळे ते दोषी आढळून आले आहेत. सदर संस्थेला काळ्या यादीमध्ये समाविष्ट केले असून जी रक्कम कमी भरली व मान्यता घेण्यात आली नव्हती, त्या संदर्भात तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. किवळेकर यांच्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम .विभाग, प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांच्याकडे प्रशासकीय शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव दि. २९-१०-२०१५ रोजी सादर करण्यात आला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन हिंगोली जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग निर्णय क्र.एसीडी-१०९९-सीआर-२७३-२६, दिनांक १८-७-२००० द्वारे रुपये ४८१.९८ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम यांनी वेगवेगळ्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान केली आहे. अध्यक्ष, काम वाटप समिती तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांच्या शिफारशी नुसार विविध मंजूर सहकारी संस्थेच्या कामे देऊन सदरील कामावर रुपये १५,२७,५७५/- एवढा खर्च नोंदविलेला असल्याप्रकरणी लेखा परिक्षकांनी नोंदविलेल्या आक्षेपावर जिल्हा परिषद, हिंगोली यांनी लेखा संहिता, १९६८ चे कलम (४) अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत कामाचे प्रशासकीय व निविदा प्रक्रिया कार्यवाहीची माहिती स्थायी समिती व विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे समितीस विदित केले.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली तथा कामवाटप समिती यांनी काम वाटप करुन कामाची यादी दिलेली आहे. कोऱ्या निविदा संचाची रक्कम चलनाव्दारे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा हिंगोली येथे भरणा करुन घेऊनच निविदा पुस्तिका विक्री केली आहे. करारनाम्यातील कमी रक्कमेचे रुपये २७००/-चे मुद्रांक खरेदी करुन क्रॉस करुन घेऊन संबंधितांकडून वसूली करण्यात आलेली आहे. धावते व अंतिम देयकातून १ % रक्कमेवर विमा रक्कम शासन खाती जमा केली आहे. दक्षता व गुणनियंत्रक मंडळ, औरंगाबाद, जिल्हा प्रयोग शाळा, परभणी यांचा चाचणी अहवाल घेण्यात आला आहे. मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहेत. यापुढे निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी घेण्याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. कंत्राटदाराने काम पूर्ण केले नसल्यामुळे काळ्या यादीत टाकण्यात आले. आहे त्या स्थितीत कामाचे अंतिमीकरण करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने दोन तिरक्या रेषा मारल्या असून यापुढे दक्षता घेण्यात येत आहे.

सदरहू प्रकरणी संबंधीत कर्मचाऱ्यांची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल समितीस सादर केला. उक्त चौकशी अहवालात सदरहू प्रकरणी प्रशासकीय मान्यता व निविदा मंजुरीची माहिती विषय समिती, स्थायी समितीच्या पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर केलेली नाही. निविदेच्या प्रत्येक पानावर कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या नाहीत. याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता हे अंशत: दोषी आढळून आले व त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अन्वये प्रशासकीय कारवाई करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या कारवाईस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहमती दर्शविली आहे. तसेच प्रशासकीय इमारतीमधील बागबगीचा तयार करण्याच्या बाबतीत तो विहित मुदतीत पूर्ण केला नसल्यामुळे संबंधित दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात येऊन त्याचेवर रु.२०२०४/- दंड वसूल करण्यात आला.

**समिती, जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे. या प्रकरणी तत्कालीन कार्यकारी अभियंत्याच्या विरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी तीन महिन्यात निकाली काढून कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, हिंगोली

### विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २००८-०९ अंतर्गत विविध कामावर केलेल्या खर्चाबाबत (परिच्छेद क्रमांक ३.३१३)(सन २००८-२००९)

कार्यकारी अभियंता, बांधकाम ,जिल्हा परिषद, हिंगोली यांनी आदेश क्र. २५, दिनांक १७/१/२००९ द्वारे ६४ कामांना व आदेश क्र. २६, दिनांक १९/१/२००९ द्वारे २८ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली. बांधकाम विभागाने दिनांक २७/१/२००९ द्वारे निविदा प्रसिध्द करुन कामाचे आदेश देऊन विविध दुरुस्ती कामावर रु. १,०६,८३,३६४/- एवढा खर्च नोंदवला आहे. याप्रमाणे खालील अभिप्राय आहेत.

(१)सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजुर केलेल्या कार्यक्रमात मंजूर केले होते की, मंजूर किंमतीच्या ८५ ते ९० टक्के एवढ्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी द्यावी परंतू बांधकाम विभागाने सदरील सुचनांचे पालन केले नाही.

(२)तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यापुर्वीच कामाची निविदा प्रसिध्द कशी केली, खुलासा करावा.

(३)महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता अधिनियम, १९६८ चे नियम ४ खालील परिशिष्ट २ व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए २०००/प्रकल्प ४०२३/३३/ दिनांक १२ जानेवारी २००१ मधील टीप १ नुसार कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी दिलेल्या निविदेच्या मंजुरीची माहिती स्थायी समिती, विषय समितीच्या अवलोकनार्थ सादर केलेली नाही.

(४)महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता अधिनियम, १९६८ चे नियम १३७ (१) नुसार मंजूर सहकारी संस्थांना काम देण्यापुर्वी लेखा संहिता नियम, १३७ (१) च्या परंतुकातील अट क्र. २,३,४ ची पुर्तता सदरील संस्था करत असल्याबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी खात्री करणे आवश्यक आहे.

(५)जोड रस्ता तरोडा-खापरखेडा-असोला, तालुका कळमनुरी, माळहिवरा-सिरसम, तालुका हिंगोली, डिग्रसवाणी-सावरगाव बंगला, तालुका हिंगोली-माळहिवरा- सिरसम-डिग्रसवाणी, तालुका हिंगोली, पिंपरी बु., तालुका कळमनुरी ही कामे विहित मुदत पूर्ण होवूनसुध्दा अपूर्ण आहेत. सदरील कामास मुदतवाढ मंजूर केलेली नाही.

(६) आडगांव-भिंगी-लिंबाळा पुल दुरुस्ती कामाचे आदेश १८/२/०९ चे असतांना मोजमापे मोजणीचा दिनांक ०५/०२/२००९ नमूद केलेला आहे.

(७) माळ हिवरा-गोरेगांव, केंद्र वरखेडा कामामध्ये लिड चार्ज पोटी रुपये ९९४/- चे जादा प्रदान झाले आहे. कामाचे जादा प्रदान रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(८) माळ हिवरा-सिरसम रस्ता या कामामध्ये अंदाज पत्रकातील दरापेक्षा जादा दराने केल्यामुळे रुपये २५३/- चे जादा प्रदान झाले आहे.

(९) पान कन्हेरगांव-सावरखेडा-कहाकर या कामामध्ये लिड चार्ज पोटी रुपये १०२१/- जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(१०) कनका-राजुरा रस्ता व हत्ता-सावंगी रस्ता व कामामध्ये लिड चार्ज पोटी रुपये १०७६+९३३=२००९ जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

(११) जोड रस्ता आरळ, तालुका वसमत या कामाच्या अंदाजपत्रकात बाब क्र. २ चा दर डिएसआर पेक्षा जादा दर्शविला आहे. त्यामुळे रुपये २२९०/- चे जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) विशेष दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत सन २००८-०९ या वर्षात आदेश २५, दिनांक १७/१/२००९ व आदेश क्र. २६, दिनांक २६/१/२००९ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे व सर्व कामे प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच पूर्ण करण्यात आलेली आहेत. सबब या सूचनेच्या मुळ उद्देशाचे पालन झाले आहे.

२) शासनाच्या मंजूर यादीप्रमाणे सदरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकास ढोबळ तांत्रिक मान्यता देऊन निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. तद्नंतर तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही दरम्यानच्या काळात चालू असल्याने व विहित मुदतीत खर्च १००% व्हावा यासाठी कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर कामास

दि. २९/०१/२००९ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात येऊन निविदा प्रसिध्दी दि. २७/०१/२००९ रोजी करण्यात आलेली आहे. यापुढे सदर बाबीची दक्षता घेण्यात येईल.

३) जिल्हा परिषदे अंतर्गत कामाची निवड स्थायी समिती/ विषय समिती मध्ये चर्चा करुनच पुढील कार्यवाही करण्यात येते. ईत:पर केलेल्या कार्यवाहीची माहिती पुढील स्थायी समिती/ विषय समितीच्या बैठकीमध्ये अवलोकनार्थ सादर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १३७ (१) चे परंतुक २,३ व ४ ची खात्री कार्यकारी अभियंता यांनी करुनच निविदा स्विकृत केलेली आहे.

५) सदरची कामे विहित मुदतीत पुर्ण झाली आहेत.

६) मोजमाप पुस्तीका क्र. ८४९, पेज क्र. १ वर दिनांक २५.२.२००९ नोंदवली आहे. सदर कामाची तारीख कार्यारंभ आदेशाची दिनांक १८.२.२००९ आहे. सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत.

७) माळ हिवरा-गोरेगाव, केंद्र वरखेडा कामाच्या अंदाजपत्रकात देण्यात आलेली लिड योग्य असून जादा प्रदान झालेले नाही.

८) माळ हिवरा-सिरसम रस्ता या कामामध्ये अंदाज पत्रकातील देण्यात आलेले दर योग्य असून जादा प्रदान झालेले नाही.

९) पान कन्हेरगाव-सावरखेडा-कहाकर या कामामध्ये अंदाजपत्रकात देण्यात आलेली लिड योग्य असून जादा प्रदान झालेले नाही.

१०) कनका-राजुरा रस्ता व हत्ता-सावंगी रस्ता या कामामध्ये अंदाजपत्रकात देण्यात आलेली लिड योग्य असून जादा प्रदान झालेले नाही.

११) हिंगोली जिल्हा दरसुची ६७८ पेज क्र. ११९ वर specification वर सदर कामामध्ये WBM च्या Surface वर Carpet केली असल्याने व दरसूचीमध्ये तरतुदीप्रमाणे दर १२० आहे जो बरोबर आहे. सबब वसुली करण्याची आवश्यकता नाही.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अहवाल परिच्छेद क्रमांक ३.३१३- विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २००८-२००९ अंतर्गत विविध कामांवर केलेल्या खर्चाबाबत, अहवाल परिच्छेद क्र. ३.३१४- प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुंदा अंतर्गत रस्ता व नालीच्या कामाबाबत, अहवाल परिच्छेद क्रमांक ३.३१५ - जिल्हा परिषद, हिंगोली कर्मचारी निवासस्थान विद्युतीकरण खर्चातील अनियमिततेबाबत, या सर्व कामांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करुन यामध्ये जे दोषी असतील त्यांचेवर कडक कारवाई करावी आणि एक महिन्याच्या आत समितीला अहवाल पाठवावा. विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल त्यावेळेस ही माहिती देण्यात यावी, असे निदेश समितीने दिले.

अहवाल परिच्छेद क्रमांक ३.३११ ते ३.३१५ यामधील गुणवत्ता तपासणी अहवाल आता उपलब्ध आहे. समितीची परवानगी असेल तर तो सभागृहासमोर ठेवू इच्छितो असे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्यानंतर प्रत्येक प्रश्नावर अशी उत्तरे येत असून ही बाब योग्य नसल्याचे समितीचे मत झाले.

जिल्हा परिषदेची इमारत बांधण्यासाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहिरात देणे आवश्यक होते परंतू स्थानिक स्तरावरील वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली. अधिकाऱ्यांनी आपल्यासमोर असलेली कागदपत्रे प्रमाण मानून उत्तर देणे आवश्यक आहे. समितीला उत्तरामध्ये तफावत जाणवत असल्यामुळे संबंधितांवर त्वरित कारवाई करावी, असे आदेश देखील समिती देऊ शकते. समितीला कोणावरही कारवाई करावयाची नाही. यात अनियमितता झाली आहे हे स्पष्ट दिसते. त्यामुळे याची चौकशी करून त्याचा अहवाल समितीला सादर करावा. तो अहवाल आल्यानंतर समिती त्यावर विचारविनिमय करेल त्यामुळे जे चुकीचे असेल त्यात सुधारणा करावी. सदरहू मुद्दा विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता घेण्यात येईल, असे निदेश समितीने दिले.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, कुरुंदा अंतर्गत रस्ते व नालीच्या कामाबाबत आणि जिल्हा परिषद, हिंगोली कर्मचारी निवासस्थान विद्युतीकरण खर्चातील अनियमिततेबाबत समितीने चौकशी करुन आपला अहवाल समितीला पाठविण्यासंदर्भात आदेशित केले होते. उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय ? त्यात काय आढळून आले, तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे.

**चौकशी समितीचा अहवाल**

प्रस्तूत प्रकरणी अंदाजपत्रकात स्टील चा दर DSR सन २००८-०९ च्या दरापेक्षा जादा दर दर्शविल्यामुळे स्टील या बाबीमध्ये रु.२१६४/- जादा प्रदान झाले असल्यामुळे संबंधित शाखा अभियंता श्री. डी. एन.तुंगणेवार हे अंशतः दोषी आढळून आले आहे. त्याचे उत्तर सदर जादा प्रदानाची रक्कम रु.२१६४/- वसुली करुन दिनांक ०८/०९/ २०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आली आहे. तसेच श्री. डी. एन.तुंगणेवार यांच्यावर म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९६४ चे नियम ४ खंड (२) अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून ठेऊन त्याची सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे.

तसेच प्रस्तूत प्रकरणी या कामाचे कंत्राटदार मे. शिवाजी मजूर सहकारी संस्थेकडे विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र नसताना ४ टक्के करण्याऐवजी २ टक्के विक्रीकर कपात केलेली असल्यामुळे संबंधित वरिष्ठ सहाय्यक (लेखा) श्री. मुळे, ए. एन हे अंशतः दोषी आढळून आले आहेत.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र. दिनांक ०६.०१.२००९ मधील सूचनानुसार विशेष दुरूस्ती मंजूर कार्यक्रमाअंतर्गत शक्यतो मंजूर किंमतीच्या ८५% व ९०% एवढ्याच रकमेच्या अंदाज पत्रकात तांत्रिक मंजुरी देण्यात यावी

अशा सूचना आहे. परंतू मंजूर किमतीच्या १००% नियोजन केल्याचे दिसून येते. सदर सूचनेचा उद्देश हा जर अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये वाढ झाल्यास अंतिम खर्च हा मंजूर रक्कमेच्या मर्यादित व्हावा असे आहे. परंतू केलेल्या कामाची तपासणी केली असता जसे मंजूर रकमेच्या १००% नियोजन केले असले तरी खर्चसुद्धा मंजूर रकमेच्या मर्यादेत झालेला असल्याने पत्रातील सूचनांचा उद्देश सफल झाल्याचे दिसून येते.

२. सदर तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यापूर्वीच निवीदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

३. सदरील मुद्या संदर्भात अभिलेखाची तपासणी केली असता पुढील प्रमाणे स्थिती आहे. लेखा आक्षेपाअंतर्गत कामाच्या निवीदांच्या मंजुरीची माहिती स्थायी समितीचे विषय समितीच्या अवलोकनार्थ सादर केलेली नसल्याचे दिसून येते.

४. लेखा आक्षेपाअंतर्गत खालीलप्रमाणे कामे मजूर सहकारी संस्थाना निवीदेवर देण्यात आलेली आहेत.

१. रामा २०४ ते येलकी बेलथर रस्ता दुरुस्ती, ता. कळमनूरी.

२. खांडेगाव-रांजोणा रस्ता दुरुस्ती, ता.वसमत उपरोक्त दोन कामे मजूर सहकारी संस्थाना निवीदेवर देण्यात आलेली असून सदर मजूर सहकारी संस्थाची नोंदणी कंत्राटदार म्हणून जिल्हा परिषद, हिंगोली बांधकाम विभागाकडे परंतूकातील अट क्र. २,३,४ ची पूर्तता सदरील संस्था करत असल्याबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी खात्री करुनच नोंदणी करण्यात आलेली आहे.

५. जोड रस्ता तरोडा-खापरखेडा-असोला, तालूका कळमनूरी, माळहिवरा-सिरसम, तालूका हिंगोली, डिग्रसवाणी-सावरगाव बंगला, तालुका हिंगोली, माळहिवरा-सिरसम-डिग्रसवानी, तालुका हिंगोली, पिंपरी बु. तालुका कळमनूरी ही कामे विहीत मुदत पूर्ण होवुनसुद्धा अपूर्ण आहेत. सदरील कामास मुदतवाढ मंजूर केली नाही. सदरील लेखा आक्षेपाअंतर्गत सर्व एकूण ५ कामाचे विहीत मुदतीत अंतिमीकीकरण करण्यात आलेली असल्याने मुदत वाढ देणे अपेक्षित नाही.

तसेच सहावे काम डिग्रसवाणी-सावरगाव बंगला, ता हिंगोली हे काम रस्ते व पूल विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २००८-२००९ मध्ये मंजूर नसल्याने सदरील काम हाती घेण्यात आलेले नाही.

६. आडगाव-भिंगी-लिंबाळा पूल दुरुस्ती कामाचे आदेश १८/२/२००९ चे असताना मोजमापे मोजणीचा दिनांक ०५.०२.२००९ नमूद केलेला आहे.

७. परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे लिड चार्ट पोटी रक्कम रु.६५६७/- जादा अदा करण्यात आल्याचे दिसून येते.

**केलेली कार्यवाही**

सदर मुद्यातील आक्षेप क्रमांक २, ३, ६ व ७ मधील अनियमीतता जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

परिच्छेदात दर्शविलेली लिड चार्ट पोटी जादा प्रदानाची नमूद रक्कम रु.६५६७ संबंधीतांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. सदर जादा लिड प्रदाना संबंधीत शाखा अभियंता हे अंशतः दोषी आढळून आल्याने म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम, १९६४ चे नियम ४ चा खंड २ अन्वये श्री.एस.जी.पद्मणे व श्री.ए.आर.पडोळे व श्री.व्ही.के.गव्हाणे यांची पुढील एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्याचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत व त्याप्रमाणे संबधीताच्या मूळ सेवा पुस्तीकेत नोंदी घेण्यात आलेल्या आहेत व श्री.शाम किवळेकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता हे दिनांक ३०.६.२०१५ रोजी सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.२५१७, दिनांक ३०.१०.२०१५ अन्वये सादर करण्यात आला आहे.

**चौकशीचे निष्कर्ष**

१. सदर कामास जिल्हा परिषद आरोग्य समिती सभा दिनांक १९.१२.२००८ ठराव क्र.१११ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान केली असून आदेश प्रारुप सदस्य सचिव, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी काढले आहेत. वरील कागदपत्रे उपलब्ध आहेत.

२. म.जि.प.व प.स.लेखा संहिता, १९६८ चे नियम १३७(१) अन्वये उपरोक्त काम मजूर सहकारी संस्थाना नोंदणी कंत्राटदार म्हणून जिल्हा परिषद, हिंगोली बांधकाम विभागाकडे परंतुकातील अट क्र.२,३,४ ची पूर्तता सदरील संस्था करत असल्याबाबत कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी खात्री करुनच नोंदणी करण्यात आलेली आहे.

३. अंदाज पत्रकात स्टिलचा डी.एस.आर. सन २००८-२००९ च्या दरापेक्षा जादा दर दर्शविल्यामुळे स्टील या बाबीमध्ये रु. २१६४/- चे जादा प्रदान झालेले आहे. ज्यादा प्रदानाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

४. शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.२००६-प-क-३४५-वित्त-९, दिनांक २५.०६.२००६ नुसार ज्या संस्थांनी विक्रीकर विभागाकडून नोंदणी घेतलेली नसेल तर ४ टक्के कपात करावयास पाहिजे. सदरील संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र नसताना ०४ टक्के कराऐवजी २ टक्के विक्रीकर कपात केली आहे. त्यामुळे रक्कम रु. ९५४०/- कमी कपात झालेली आहे. कमी कपात केलेली रक्कम रु.९५४०/- वसूल करुन शासन खाती भरणे आवश्यक आहे.

## केलेली कार्यवाही

संबंधितांकडून परिच्छेदात दर्शविलेली स्टीलच्या बाबतीतील जादा दराबाबत जादा प्रदानाची रक्कम रु.२१६४/-वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

तसेच संबंधीत शाखा अभियंता श्री.डी.एन तुगेनवार यांची पुढील एक वार्षिक वेतन वाढ एका वर्षासाठी रोखून धरण्याचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत व त्या प्रमाणे संबंधीताच्या सेवा पुस्तीकेत नोंद घेण्यात आलेली आहे.

संबंधीताकडून परिच्छेदात दर्शविलेली विक्रीकर कमी कपात रक्कम रु.९५४०/- वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित वरिष्ठ सहायक लेखा यांचे वर शिस्त भंगाची कार्यवाही प्रस्तावीत केली आहे.

## चौकशीचे निष्कर्ष

१. सदर कामाची प्रशासकीय मान्यता व निवीदा मान्यतेची माहिती विषय समिती/ स्थायी समिती यांचे समक्ष सादर केलेली नाही.

२. संचिकेत असलेली निविदेची पाकीटे सिलबंद नसून ती उघडलेली आहे.

३. सदर निवासस्थानाच्या एका इमारतीच्या एका मजल्यावर चार ब्लॉक असल्यामुळे मजला निहाय स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन विद्युतीकरण कामे हाती घेण्यात आलेली आहेत. सर्वच अंदाजपत्रकामधील मंजूर दर सारखेच आहेत. परंतू सदरील कामे वेगवेगळ्या तीन कंत्राटदारानी भरलेली असल्याने निविदा भरतेवेळी कंत्राटदारचे दर कमी/अधिक दराने भरलेली आहेत. वसूलपात्र रक्कम ३५४/- वसूल करणे आवश्यक आहे.

४. सदर विद्युतीकरणाच्या कामात वापरण्यात आलेले साहित्य हे ISI मार्कचे असल्याबाबत उप अभियंता यांनी प्रमाणीत केली आहे. तसेच ISI मार्कचे मानांकनानुसार असल्यास उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ०२.०१.१९९२ मधील परिच्छेद क्र.८.४ नुसार त्रयस्थ संस्थाकडून तपासणी करण्याची आवश्यकता नाही.

५. परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता केलेला खर्च रु.२४०९६/- नियम बाह्य आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११८ नुसार जादा कामासाठी रक्कम कमाल रु.५०००/- किंवा एका बाबीच्या २५% या पैकी जी जास्त असेल ती, सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे आवश्यक आहे. सदर कामामध्ये कमाल रु.५०००/- किंवा एका बाबीच्या २५% पेक्षा जास्तीचा खर्च झालेला नाही. सदर कामामध्ये झालेल्या कमी अधिक खर्चास कार्यकारी अभियंता यांची तुलनात्मक तक्त्यावर मंजुरी घेतलेली आहे. तुलनात्मक तक्ता व मोजमाप पुस्तीकेची पाहणी केली असता लेखासंहितेचा भंग झाल्याचे दिसून येत नाही.

६. संबंधित शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेल्या आहेत. तसेच उप अभियंता यांनी मोजमापाची तपासणी करुन दिनांकीत स्वाक्षरी केलेली आहे.

७. मोजमाप पुस्तिकेवर अंतिम देयकाच्या वेळी paid and cancel चा शिक्का असून लाल शाईने तिरकी रेष मारण्यात आलेली आहे.

## केलेली कार्यवाही

सदर बाबीस जबाबदार असणारे तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.शाम किवळेकर यांचेवर शिस्त व अपिल नियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

वसूल पात्र रक्कम रु.३५४/- संबंधीतांकडून वसूल करुन शासन खाती दिनांक २३-६-२०१५ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात आली.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्र कोंदगाव रस्ता व नालीच्या कामाबाबत व जिल्हा परिषद हिंगोली कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या अनियमित खर्चाबाबत चौकशी करुन आपला अहवाल सादर केला आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यातील दोषींवर कोणती कारवाई केली, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, या कामांतर्गत करण्यात आलेल्या चौकशीत काही बाबी पुढे आलेल्या आहेत. यामध्ये टेक्नीकल सँक्शन होण्यापूर्वी निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नव्हती. आदेश देण्यापूर्वी मोजमाप घेतल्याचे लक्षात येत आहे. लीड पोटी ६५६७ रुपये जास्तीचे अदा झाल्याचे चौकशीत निष्पन्न होत आहे. केलेल्या चौकशी प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीत ६५६७ रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. या विषयासंबंधी तीन ज्युनियर इंजिनियर जबाबदार आढळलेले आहेत. त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता रोखण्यात आलेली आहे. सेवापुस्तिकेत तशा प्रकारच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. ज्या कार्यकारी अभियंता यांचे स्लॅक सुपरव्हिजन आहे, जे कसूर आहेत, त्यांच्यासंबंधी दिनांक २९-१०-२०१५ रोजी त्यांच्याविरुध्द विभागीय चौक शी करण्याबाबत चार्जेस पाठविण्यात आलेले आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी कार्यकारी अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, हिंगोली यांनी आदेश क्रमांक २५, दिनांक १७-१-२००९ द्वारे ६४ कामांना व आदेश क्रमांक २६, दिनांक १९-१-२००९ द्वारे २८ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने दिनांक २७-१-२००९ द्वारे निविदा प्रसिध्द करुन कामाचे आदेश देऊन दुरुस्ती कामांवर रु.१०६८३३६४/- एवढा खर्च नोंदविला आहे. या संदर्भात मंजूर किंमतीच्या ८५ ते ९०% एवढ्या किंमतीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्याबाबत बांधकाम विभागाने सूचनांचे पालन केले नाही. तांत्रिक मान्यता प्राप्त होण्यापूर्वीच कामाची निविदा प्रसिध्द केली, कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या निविदेची माहिती स्थायी समिती/ विषय समितीच्या अवलोकनार्थ सादर केलेली नाही. इत्यादी बाबत लेखापरीक्षकांनी आक्षेपित केल्यानंतर समितीने याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना चौकशी करण्याबाबत निदेश दिले होते. उक्त निदेशानुसार चौकशी केली असून सदरचा चौकशी अहवाल समितीला पाठविला आहे. या चौकशी अहवालात प्रस्तुत प्रकरणी अंदाजपत्रकात स्टील चा दर DSR सन २००८-०९ च्या दरापेक्षा जादा दर्शविल्यामुळे स्टील या बाबीमध्ये रु.२१६४/- जादा प्रदान झाले असल्यामुळे संबंधित शाखा अभियंता श्री.डी.एन.तुगेनवार हे अंशतः दोषी आढळून आले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम रु.२१६४ वसुली करुन दिनांक ८-९-२०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आली आहे. तसेच श्री.डी.एन.तुगेनवार यांच्यावर म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ खंड (२) अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून ठेऊन त्याची सेवा पुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे या कामाचे कंत्राटदार शिवाजी मजूर सहकारी संस्थेकडे विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र नसताना ४ टक्के करण्याऐवजी २ टक्के विक्रीकर कपात केलेली असल्यामुळे संबंधित वरिष्ठ सहाय्यक (लेखा) श्री.ए.एन. मुळे हे अंशतः दोषी आढळून आले आहेत.

**जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीने समाधान व्यक्त केले असून या प्रकरणी प्रस्तावित केलेली चौकशी तीन महिन्यात निकाली काढून दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद हिंगोली

### देखभाल दुरुस्ती मधून हातपंप खरेदीवर केलेल्या खर्चाबाबत

### (परिच्छेद क्रमांक ३.५६२) (सन २००८-२००९)

जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. हिंगोली सन २००८-०९ या वित्तीय वर्षात देखभाल दुरुस्ती मधून हातपंप खरेदीवर रुपये २९,७८,२९०/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक पत्र क्र झेडपीई /२००१/प्र.क्र. १३२/ प.रा. ०७ (२६), दिनांक ५ सप्टेंबर, २००२ नुसार दर करार अस्तित्वात नसताना निविदा बोलवण्यापूर्वी उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून दर करार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरुपात खात्री करण्याची कार्यवाही केलेली नाही.

(२) खरेदीपूर्वी वार्षिक गरज लक्षात घेवून वार्षिक एकत्रित खरेदीसाठी निविदाप्रसिध्द न करता रुपये ९,९२,८८०/- च्या खरेदीसाठी निविदा प्रसिध्द करुन दर मागविले व त्याच दरावर पुन्हा खरेदी आदेश देऊन रुपये १९,८५,५६०/- ची खरेदी केलेली आहे. वार्षिक एकत्रित खरेदीसाठी निविदा मागवल्या असत्या तर जिल्हा परिषदेला स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला असता परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

(३) सदरील हातपंप हे टंचाई अंतर्गत खोदलेल्या विंधन विहिरी बसविण्यासाठी घेतले आहेत व देयकातून हातपंपाचे रक्कम कपात करुन देखभाल दुरुस्ती निधीत जमा दर्शविले आहेत. परंतु देखभाल दुरुस्ती मधून सदरील खर्च करण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांची मंजूर घेतलेली नाही.

(४) टंचाई अंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांनी १९४ विंधन विहिरी मान्यता दिली, परंतु हातपंप खरेदी २१६ केली आहे. मान्यता व खरेदीमध्ये विसंगती आहे.

(५) टंचाई अंतर्गत किती विंधन विहिरीचे प्रत्यक्ष कामे झाली, त्यापैकी किती ड्राय गेल्या, किती विंधन विहिरी हातपंप बसविले या बाबतची माहिती लेखा परिक्षणात

उपलब्ध झाली नाही. तसेच ३१-३-२००९ अखेर ३१ हातपंप शिल्लक आढळून आले यावरुन आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदीबाबत खात्री पटवावी.

(६) हातपंप खरेदी पोटी देखभाल दुरुस्ती निधीतून खर्च केलेली संपूर्ण रक्कम देखभाल दुरुस्ती निधीत जमा झाल्याबाबत खात्री पटवावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) डी.जी.एस.अॅन्ड डी च्या संकेतस्थळावर दर करार नसल्याची खात्री करुनच निविदा मागवून खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. शिवाय खरेदी ही निविदा प्रक्रियाने केलेली आहे. सबब शासनाचे नुकसान झालेले नाही.

२) रु ९,९२,८८०/- ची खरेदी ही सन २००८ च्या टंचाईसाठी निविदा मागवून करण्यात आलेली आहे. सदरील दर हे एक वर्षापर्यंत वैध असल्यामुळे उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भाखस-१०८८/(२५१२)/उद्योग ६, मंत्रालय मुंबई दि. २ जानेवारी, १९९२ परि.७ मधील ५ नुसार मुळ आदेशातील संख्या आणि किंमत यापेक्षा पुनर्प्रत्ययी आदेश २०० % पर्यंत मर्यादित असावा असे आदेश असल्यामुळे सदर आदेशाच्या मर्यादेत रु. १९,८५,५६०/- ची हातपंप संच खरेदी करणेत आलेली आहे.

३) टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या विंधन विहीरीवर हातपंप बसविण्यासाठी देखभाल दुरुस्ती निधीमधून हातपंप संच खरेदी करण्यासाठी टिप्पणी परिच्छेद ७ दिनांक ११/१२/२००८ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे. टिप्पणीची प्रत सोबत जोडली आहे.

४) सन २००८ च्या टंचाईसाठी ७२ हातपंप संच खरेदी करण्यात आले होते. त्यापैकी ५१ हातपंप संच शिल्लक होते. सन २००९ च्या टंचाई मध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक १८/१२/२००८ अन्वये १९४ विंधन विहीरी घेण्यास मान्यता देण्यात आल्यामुळे शिल्लक हातपंप विचारात घेवून सन २००९ च्या टंचाईसाठी १४४ हातपंपसंच खरेदी करण्यात आले आहेत. त्यामुळे मान्यता व खरेदी मध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही.

५) मा.जिल्हाधिकारी यांना टंचाई अंतर्गत मान्यता दिलेल्या १९४ विंधन विहीरी पैकी ३१ मार्च,२००९ अखेर १५३ विंधन विहीरीचे खोदकाम करण्यात आले. १५३ यशस्वी विंधन विहीरीवर हातपंप बसविण्यात आले. शिल्लक राहिलेल्या ४२ हातपंप संचाचा विनियोग पुढील वर्षाच्या टंचाईमध्ये करण्यात आलेला आहे.

६) हातपंप खरेदी पोटी देखभाल दुरुस्ती निधी मधून खर्च केलेली रक्कम देखभाल दुरुस्ती निधीमध्ये जमा केलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी हातपंप दुरूस्तीवर रूपये २९,७८,२९०.०० इतका निधी खर्च केला आहे. सदर निधी खर्च करताना मूळ निविदेमध्ये समाविष्ट साहित्यापेक्षा जादा साहित्य खरेदी केले आहे. या जादा साहित्याची आवश्यकता होती काय, जादा साहित्याची आवश्यकता होती तर त्याचा विचार/समावेश निविदा काढतानाच का केला नाही, एकूण साहित्याची गरज कोणी व कशी निश्चित केली, यावर कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी समितीस असे सांगीतले की, सन २००८ मध्ये उद्‌भवलेल्या टंचाईसाठी निविदा मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. सदर दर हे एक वर्षापर्यंत वैध असल्यामुळे उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ मधील ५ नुसार पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्क्यांपर्यंत मर्यादित असावा असे नमूद केले असल्यामुळे हातपंप संच खरेदी करण्यात आले आहेत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, दोन वेळा निधी खर्च केलेला आहे. सुरूवातीला रूपये ९,९२,८८०.०० इतका खर्च हातपंप खरेदीवर केला आहे व पुन्हा रूपये १९,८५,५६०.०० इतक्या रकमेची खरेदी केलेली आहे. टंचाई अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली होती. तथापि, २१६ हातपंप खरेदी केले आहेत. दुसरे असे की हातपंप शिल्लक असताना देखील आवश्यकते पेक्षा जास्त हातपंप खरेदी केलेले आहेत. मागील वर्षाचे ५१ हातपंप शिल्लक असताना मंजूर विंधन विहिरी पेक्षा जास्तीचे हातपंप खरेदी करण्याचे प्रयोजन काय होते, हा जो अनावश्यक जादा

खर्च झाला आहे त्यास कोण जबाबदार आहे, शासनाने दिनांक १०.१०.२००८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्याप्रमाणे रिपीट ऑर्डर देता येत नाही. पूर्णपणे नियमबाह्य खरेदी केलेली आहे. शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हा शासन निर्णय निर्गमित केला आहे. यावर कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी उत्तर दिले की, शासन निर्णयानुसार संख्या आणि किंमत यापेक्षा पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्कांपर्यंत असावा असे नमूद केले असल्यामुळे खरेदी करण्यात आलेली आहे.

समितीच्या मते प्रस्तुत प्रकरणी नियमबाह्य खरेदी झाली आहे व समितीच्या मताशी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा सहमत झाल्यामुळे समितीने तत्कालीन अधिकाऱ्यांस चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करावी व त्या संबंधीचा अहवाल समितीस सादर करावा असे निदेश दिले.

तसेच जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीने जिल्हा परिषद देखभाल दुरूस्ती अंतर्गत कृती आराखडा वेळेवर सादर करून देखील आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला मंजुरी घेऊन त्याची अंमलबजावणी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.यंबडवार यांनी केलेली नाही, अशी सभापती, शिक्षण यांनी समितीकडे तक्रार केलेली असल्याचे नमूद केल्यावर कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी खुलासा केला की, ग्रामीण पाणी-पुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय दिनांक १७.१०.२०१४ रोजी निर्गमित झाला आहे. सर्व जिल्ह्यातील नळ योजना बंद होत्या. त्यामुळे त्यांची देखभाल दुरूस्ती करणे आवश्यक होते म्हणून त्याचा आराखडा तयार करण्यात आला व तो दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी जल व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या देखभाल दुरूस्तीकरिता अवलंबवावयाची कार्यपद्धती दिनांक १७ ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयात नमूद केली असून त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्दयांबाबत समितीने माहिती मागवली.**

हातपंप खरेदी संदर्भात टंचाई निधीअंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली होती. तथापि, २१६ हातपंप खरेदी केले आहेत. शिवाय मागील वर्षात ५१ हातपंप शिल्लक असताना मंजूर विहिरींचे जास्तीचे हातपंप खरेदी करण्याचे

प्रयोजन काय आहे, तसेच एवढा अनावश्यक व जादा खर्च करण्यास जबाबदार कोण आहे. तसेच सदरची खरेदी ही नियमबाह्य झाली असल्याचे समितीला साक्षीच्या वेळी सांगण्यात आले होते त्यामुळे सदर नियमबाह्य खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली.

**चौकशी समितीचा अहवाल**

समितीच्या निदेशानुसार समितीस चौकशी अहवाल सादर झाला असून सदरहू चौकशी अहवालाप्रमाणे प्रस्तूत प्रकरणी कुणीही दोषी आढळून आल्याचे दिसून आले नाही तथापि, परिच्छेदात दर्शविण्यात आलेली रक्कम रु.३५४/- संबंधिताकडून वसूल करुन रु.३५४/- दिनांक २३/६/२०१५ रोजी शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. चलन प्रत उपलब्ध आहे.

तथापि, संबंधित शाखा अभियंता श्री. एस. जी. पदमणे याचे खुलाशे अंशतः समाधानकारक असल्यामुळे त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी थोपविण्यात आलेली आहे.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी टंचाई कार्यक्रमांतर्गत मंजूर विंधन विहीर व हातपंप या बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टंचाई वर्ष | मंजुरविंधन विहीरी | | मागील शिल्लक हातपंप | खरेदी करण्यात आलेले हातपंप | एकुण उपलब्ध हातपंप | वापरण्यात आलेले हातपंप | शिल्लक हातपंप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | संख्या | | | | | |
| १ | २००८ | २८-०१-२००८ | २५३ | ० | ७२ | ७२ | २१ | ५१ |
| २ | २००९ | १८-१२-२००८ | १९४ | ५१ | १४४ | १९५ | १५३ | ४२ |

(१) सन २००८ करीता टंचाई कार्यक्रम अंतर्गत मा.जिल्हाधिकारी हिंगोली यांचे पत्र क्र.२००८/पाणी टंचाई/कावि/४० दिनांक २८-०१-२००८ अन्वये एकूण २५३ विंधन विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे टंचाई अंतर्गत घेण्यात आलेले विंधन विहिरीवर हातपंप बसविण्यासाठी देखभाल दुरुस्ती निधीमध्ये शिल्लक रक्कमेतून ७२ हातपंप संच खरेदी करण्यासाठी रु.९,९२,८८० ला मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली यांचे आदेश क्र.जिपहिं/ग्रापापू/कावि/१२७४/२००८ दिनांक ०९-०५-२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. DGS & D च्या संकेतस्थळावर हातपंप संचाचा दर करार उपलब्ध आहे किंवा नाही याची खात्री केली असता हात पंप संचाचा दर करार उपलब्ध नव्हता. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ०५-०२-२००८ नुसार दिनांक १२-०५-२००८ ते दिनांक २६-०५-२००८ या कालावधीत वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन हातपंप संचाचे दर प्रति नग रु.१३,७९० निश्चित करुन सन २००८ च्या टंचाई साठी विंधन विहिर घेण्याकरिता ग्राम पंचायतीस १०% लोकवाटाची अट असल्यामुळे सन २००८ च्या टंचाईमध्ये फक्त २१ विंधन विहिर घेण्यात आल्या असून त्यावर २१ हातपंप बसविण्यात आले आहे. आणि ५१ हातपंप शिल्लक राहिले आहेत.

(२) सन २००९ च्या टंचाईसाठी मा.जिल्हाधिकारी हिंगोली यांनी दिनांक १८-१२-२००८ अन्वये १९४ विंधन विहिरी घेण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. २००९ च्या टंचाईसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे देखभाल दुरूस्ती अंतर्गत पूर्वीचे ५१ हातपंप विचारात घेऊन १४४ हातपंप खरेदीकरण्यासाठी रु.१९,८५,७६० ला मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली यांची दिनांक १५-१२-२००८ प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सन २००८ च्या टंचाईसाठी हातपंप संचाचे दर वर्तमान पत्रात जाहिर निविदा देऊन निश्चित करण्यात आले होते सदरील दर एक वर्षासाठी म्हणजेच दिनांक ३१-०५-२००९ पर्यंत वैध असल्यामुळे सन २००९ च्या टंचाईसाठी त्याच दराने १४४ हातपंप संच खरेदी करण्यात आले आहे.

(३) सन २००८ च्या टंचाईसाठी ७२ व सन २००९ च्या टंचाईसाठी १४४ असे एकूण २१६ हातपंप संच दोन वर्षाच्या टंचाईसाठी खरेदी करण्यात आले आहे. सन २००९ च्या टंचाईसाठी ह्या एकाच वर्षासाठी २१६ हातपंप संच खरेदी करण्यात आलेले नाहीत.

त्यामुळे हातपंप संच खरेदीवर जास्तीचा खर्च झालेला नाही आणि हातपंप संच खरेदीमध्ये अनियमितता झालेली नाही. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून जिल्हा परिषद हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाहीस व यांच्या अभिप्रायास सहमती दिली.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

१) सन २००८ करीता टंचाई कार्यक्रम अंतर्गत जिल्हाधिकारी, हिंगोली यांचे पत्र क्र.२००८/पाणी टंचाई/कावि-४० दि.२८-०१-२००८ अन्वये एकूण २५३ विंधन विहिरींना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती. टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे टंचाई अंतर्गत घेण्यात आलेल्या विधन विहिरींवर, हातपंप बसविण्यासाठी देखभाल दुरुस्ती निधी मध्ये शिल्लक रक्कमेतून ७२ हातपंप संच खरेदी करण्यासाठी रु.९,९२,८८० इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र.जिपहिं/ प्रापापु/ कावि/ १२४७/ २००८ दि.९-०५-२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

२) केंद्र शासनाच्या DGS & D च्या संकेत स्थळावर हातपंप संचाचा दर करार उपलब्ध आहे किंवा नाही याची खात्री केली असता हातपंप संचाचा दर करार उपलब्ध नव्हता. त्यामुळे शासन निर्णय दि.५-२-२००८ नुसार दि.१२-०५-२००८ ते दि.२६-०५-२००८ या कालावधीत वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करुन हातपंप संचाचे दर प्रति नग रु.१३,७९० असा निश्चित करुन सन २००८ च्या टंचाईसाठी रु.९,९२,८८० किंमतीचे ७२ हातपंप संच खरेदी करण्यात आलेले होते. २००८ च्या टंचाईसाठी विंधन विहिरी घेण्यात आल्या असून त्यावर २१ हातपंप बसविण्यात आले आहेत आणि ५१ हातपंप शिल्लक राहिले होते.

३) सन २००९ च्या टंचाईसाठी जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दि.१८-१२-२००८ अन्वये १९४ विंधन विहिरी घेण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. २००९ च्या टंचाईसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे देखभाल दुरस्ती अंतर्गत पूर्वीचे ५१ हातपंप विचारात घेवून १४४ हातपंप संच खरेदी करण्यासाठी रु.१९,८५,७६० इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दि.१५-१२-२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २००८ च्या टंचाईसाठी खरेदी केलेले ७२ व सन २००९ च्या

१४४ असे दोन्ही वर्ष मिळून एकुण २१६ हातपंप दोन वर्षाच्या टंचाईसाठी खरेदी करण्यात आले आहेत. सन २००९ च्या टंचाईसाठी २१६ हातपंप खरेदी करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे हातपंप संच खरेदीवर जास्तीचा खर्च झालेला नाही आणि हातपंप खरेदी मध्ये अनियमितता झालेली नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तथापि, पंचायत राज समिती समोर साक्ष देताना तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.जी.एस. यंबडवार यांनी दिलेली साक्ष वस्तुस्थितीस धरुन नव्हती.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी सचिवांनी प्रस्तुत प्रकरणी समितीस विदीत केले की, १९४ विंधन विहिरींना मान्यता देण्यात आली होती. २१६ हात पंप खरेदी केलेले आहेत. शिल्लक असतांनाही जास्तीचे हात पंप खरेदी करण्याचे प्रयोजन काय आहे, यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की, २१६ हात पंप खरेदी एका वर्षात नाही, तर ते दोन वर्षात खरेदी करण्यात आलेले आहे. ज्यावेळी १९४ विंधन विहीरींची जिल्हाधिका-यांनी मान्यता दिलेली होती. त्यावेळी शिल्लक ५१ हात पंप लक्षात घेवूनच पुढची १४४ पंपाची खरेदी केली होती. म्हणून त्यावर्षी एकूण तपासणीच्या वेळी २१६ असा आकडा आलेला आहे. यामध्ये कुठलीही अनियमितता किंवा त्यांनी जास्तीची खरेदी न करता, जेवढी मान्यता तेवढीच खरेदी केलेली आहे.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, समितीला जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी सदरची खरेदी नियमबाह्य झाली असल्याचे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले. समितीने हा आक्षेप काढलेला नाही. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद अधिकाऱ्यांनी २१६ त्यावर्षीचे सांगितले. एकूण २१६ हात पंप खरेदी केली पण ते दोन वर्षामध्ये सन २००८ आणि सन २००९ मध्ये मिळून २१६ आहेत. यावर समितीने आक्षेप घेतला की सदरहू बाब विभागाच्या लेखी अभिप्रायामध्ये हे यायला पाहिजे. त्यावर विभागीय सचिव समितीला समाधान कारक उत्तर देवू शकले नाहीत.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प. हिंगोली सन २००८-०९ या वित्तीय वर्षात देखभाल दुरुस्तीमधून हातपंप खरेदीवर रुपये २९,७८,२९०/- खर्च केलेला आहे. या प्रकरणी दर करार नसताना निविदा बोलवण्यापूर्वी उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून दर करार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरुपात खात्री करण्याची कार्यवाही न करणे, स्पर्धक निविदा न मागविणे, देखभाल दुरुस्तीमधून खर्च करण्यास सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी न घेणे, जिल्हाधिकारी यांनी १९४ विंधन विहिरींना मान्यता दिली असताना केवळ २१६ हात पंपाची खरेदी केल्यामुळे मान्यता व खरेदीमध्ये विसंगती असून लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणे इत्यादीबाबत लेखा परिक्षणात आक्षेप आले होते व त्याबाबतचा खुलासा करताना जिल्हा परिषदेने या प्रकरणी शासनाचे नुकसान झालेले नाही अशी माहिती समितीला पाठविली.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेत असताना निधी खर्च करताना मूळ निविदेमध्ये समाविष्ट साहित्यापेक्षा जादा साहित्य खरेदी केले आहे. सदरच्या जादा साहित्याची आवश्यकता होती काय आणि त्यानुसार निविदा काढताना त्याचा समावेश का केला नाही, याबाबत कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, सन २००८ मध्ये उद्भवलेल्या पाणी टंचाईसाठी निविदा मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. सदर दर हे एक वर्षांपर्यंत वैध असल्यामुळे उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ मधील ५ नुसार पुनर्प्रत्ययी आदेश २०० टक्क्यांपर्यंत मर्यादित असावा असे नमूद केले असल्यामुळे हातपंप संच खरेदी करण्यात आले आहेत. समितीने या प्रकरणी सर्वंकष चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक कार्यवाही अहवाल समितीला सादर करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले होते. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल समितीला पाठविला असता उक्त चौकशी अहवालात कोणीही दोषी आढळून आल्याचे दिसून आले नाही. तथापि, परिच्छेदात दर्शविण्यात आलेली रक्कम रु.३५४ संबंधितांकडून दिनांक २३.६.२०१५ रोजी वसूल करुन शासनखाती चलनाद्वारे भरण्यात आलेली आहे. तथापि, संबंधित शाखा अभियंता, श्री.एस.जी.पदमणे यांचा खुलासा अंशतः समाधानकारक असल्यामुळे त्यांची वेतनवाढ एक वर्षासाठी थोपविण्यात आलेली आहे. तसेच शासनाने केलेल्या कार्यवाहीत या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या तत्कालीन कार्यकारी अभियंता,

श्री.श्याम किवळेकर यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमान्वये प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे असे नमूद आहे. सदर चौकशी अहवालास शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सहमती दर्शविली आहे.

समितीला लेखी स्वरुपात चौकशी अहवालात पाठविलेल्या माहितीत एकीकडे या प्रकरणात कोणीही दोषी आढळून आले नाही असा अभिप्राय व्यक्त करणे आणि दुसरीकडे अधिकाऱ्यांवर कार्यवाही प्रस्तावित करणे ही बाब समितीला निर्णय घेण्यास अडचणीची ठरत आहे. समिती कोणत्याही निरपराध व्यक्तीवर कार्यवाही व्हावी यासाठी आग्रही नाही. तथापि, दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर मात्र कार्यवाही होणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत आहे. **त्यामुळे या प्रकरणी सर्व संबंधित अधिकारी खरोखरच दोषी आहेत किंवा नाही याची पुन्हा चौकशी करुन निश्चित स्वरुपाची कार्यवाही करुन संबंधित अधिकारी दोषी असल्यास त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात यावी आणि या प्रकरणी काहीही अनियमितता आढळली नसेल तर नाहक कार्यवाही न करता तसे स्पष्टपणे चौकशीत नमूद करावे आणि खरोखर दोषी किंवा निर्दोषत्व यापैकी एक निर्णय घेऊन संबंधितांवर कार्यवाही करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद हिंगोली

**१०० टक्के गुणवत्ता बाधीत स्त्रोत सुधारणे योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेवर केलेल्या खर्चाबाबत : (परिच्छेद क्रमांक ३.५६३)(सन २००८-२००९)**

ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद हिंगोलीने १००% गुणवत्ता बाधीत स्त्रोत सुधारणे योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेसाठी सन २००८-२००९ मध्ये ग्रामीण पाणीपुरवठा स्वच्छता समितीला रुपये १,०५,६४,२००/- एवढे प्रदान केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत

१) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००२/प्र.क्र.५३२/पापु ०७/दिनांक २३/३/२००२ नुसार पाणी पुरवठा योजनांच्या प्राधान्य क्रम ठरविण्यासाठी चालू योजना संभाव्य उपलब्ध निधीचा विचार करुन वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या अर्जाची एकत्रीत तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांनी करुन ठरवलेल्या निकषानुसार प्राधान्य यादी करावी व त्यानुसार पाणीपुरवठा योजना हाती घ्याव्यात परंतु अशी प्राधान्य यादी तयार केलेली नाही.

२) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.७४(१) पापु ०७/दिनांक ३०/०४/२००५ नुसार प्राप्त होणा-या निधीसाठी ग्रापापु व स्वच्छता समितीच्या नावाने स्वतंत्र खाते उघडून खाते चालविण्याचा अधिकार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या किमान दोन सदस्यांना द्यावा व त्यातील किमान एक सदस्य महिला असणे आवश्यक आहे. असे असतांना पाणी- पुरवठा व स्वच्छता समिती, गढाळा,हिंगनी,वरुड समद, वरुड(काझी) बँक खाते चालविण्यासाठी महिला सदस्याची नेमणूक केलेली नाही.

३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/१०९९/प्र.क्र.२०८९(२) ३५ दिनांक १२/०१/२००९ व महाराष्ट्र शासन पाणी-पुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक ग्रापापु १००१/प्र.क्र.१९०/पापु ०७/ दिनांक ३/९/२००१ नुसार २५ लाखापर्यंत तांत्रिक मान्यतेचे अधिकार आहेत व

त्यापुढील रक्कमेची तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव अधिकारानुरुप म.जी.प्रा. संबंधीत अधिक्षक अभियंता, मुख्य अभियंता यांचे मान्यतेसाठी सादर होणे आवश्यक आहे परंतु पाणीपुरवठा योजना हिंगणी,बेलथर, कडोळी या नळ पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक रुपये २५.०० लाखापेक्षा जास्त असतांनाही कार्यकारी अभियंता यांनी नियमबाहय मंजुरी दिली आहे.

४) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००५/प्र.क्र.७४(२)पापु०७/दिनांक २/०५/२००५ भाग ८ मध्ये योजनेच्या प्रस्तावाची पडताळणी प्रमाणपत्रावर पाणीपुरवठा योजना कृष्णापुर तर्फे शेवळा,राजापुर, खैरखेडा, वरुड, समद,आडोळ,बोरखडी, केलथर, माझोड, आठरवाडी, कडोळी या कामाच्या प्रस्तावाच्या भाग ८ प्रमाणपत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

५) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र.ग्रापापु ११०८/प्र.क्र.३२/पापु ०७/दिनांक १८/३/२००८ नुसार विहीरीची बांधकाम १ मे च्या आत सुरु करुन १५ जून पर्यंत विहीरीचे खोदकाम बांधकामासह पूर्ण करावे व सप्टेंबर, ऑक्टोबर मध्ये पाईप लाईनचे काम पूर्ण करावयाचे आहे परंतु पाणीपुरवठा योजना कृष्णापुर तर्फे शेवाळा, राजापुर, खैरखेडा, आठरवाडी,कडोळी ही कामे वेळा पत्रकानुसार पूर्ण नाहीत.

६) पाणीपुरवठा योजना देऊळगांव(ज) Rising Main च्या अंदाजपत्रकात बाब क्र.६ 90mm 6 kg पी.व्ही.सी.पाईप पुरवठा १००० मी.प्रस्तावीत परंतू प्रत्यक्ष कामामध्ये १९९२ मी.पाईप दर्शवून प्रदान केले आहे ज्यामुळे ९९२X९२= ९१२६४/- रुपये जादा खर्च केला आहे. प्रदानास मान्यता नाही संबंधीतावर जबाबदारी निश्चित करावी.

७) नळ पाणीपुरवठा योजना हिंगणी सदर नळ पाणीपुरवठा योजनेच्या खोदकामामध्ये ०.३ मी. खोदकाम मोजमाप पुस्तिका क्र.४४३ पेज क्र.४०३ व ४०४ मध्ये जादा परिणाम नमूद केल्यामुळे ०.७८५X(११.५०)२=३१.१४ घ.मी.परिमानाचे रुपये ३८०/- दराने रुपये ११८३३/- चे जादा प्रदान केले आहे सदर रक्कम संबंधीताकडून वसूल करुन शासन पाणी भरणा करणे आवश्यक आहे.

८) नळ पाणीपुरवठा खुदनापूर च्या अंदाजपत्राकात विंधन विहिरचे काम प्रस्तावित नसताना विंधन विहिर खोदकाम ६० मी दर्शवून रुपये २२०/- च्या दराने १३२००/- खर्च दर्शविला आहे म.जि.प.स.लेखा संहिता नियम १९६८ चे नियम १५५ नुसार अतिरिक्त जादा बाबतीत सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेतली नसल्यामुळे सदरचा खर्च संबंधीताकडून वसूल होणे आवश्यक आहे.

१) विहिरीच्या हार्ड मटेरीयल मध्ये खोदकाम दर रुपये २७०/- असताना रुपये ३५०/- या दराने प्रदान केल्यामुळे परिणाम ८.५० घ.मी.रुपये ८०/- प्रमाणे रुपये ६,८०८/- जादा प्रदान केले आहे रक्कम वसूल करुन भरणा करावे.

२) अंदाजपत्रकात डिवाटरींग साठी रुपये ५२५००/- तरतूद असतांना रुपये ६३०००/- प्रदान करुन रुपये १०५००/- जादा खर्च केला आहे जादा खर्च रुपये १०५००/- वसूल करणे आवश्यक आहे.

९) म.शा.ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीए २००६/प्र.क्र.३४६ दिनांक ९ जुलै, २००६ नुसार ४ टक्के व्हॅट कपात केलेली नाही. सबब ४ टक्के विलीकरणाची रुपये ४,२२,५६८/-वसूल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परिक्षण अहवालात नमूद केल्याप्रमाणे अनुपालन खालीलप्रमाणे करण्यात येते.

१) महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००२/प्र.क्र.५३२/पापु ०७ दिनांक २३/०३/२००२ नुसार पाणीपुरवठा योजनेचा प्राधान्यक्रम यादी तयार करण्यात आली आहे.

२) शासन निर्णय दिनांक ३ सप्टेंबर, २००१ मधील परि.क्र.५ (ड) नुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे नावे वेगळे बँक खाते उघडून ते खाते चालविण्याचा अधिकार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे किमान दोन सदस्यांना देण्यात यावा असे नमूद असल्यामुळे सदरील खाते चालविण्याचा अधिकार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने दोन सदस्यांना देण्यात आलेला

आहे. नवीन योजनेसाठी शासन निर्णय दिनांक ३०/०४/२००५ नुसार कार्यवाही करण्यासाठी समितीच्या अध्यक्ष/सचिवांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३) सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे परिपत्रक क्रमांक १२४ दिनांक १७/०३/२००८ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना प्रदान केले आहेत. सदर अधिकारानुसार हिंगणी, बेलथर,कडोळी या कामाच्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

४) शासन परिपत्रक दिनांक २५/०५/२००५ नुसार भाग ८ मध्ये योजनेच्या प्रस्तावाच्या पडताळणी प्रमाणपत्रावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे व घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

५) वेळापत्रकाप्रमाणे योजनेचे कामे पुर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

६) नळ पाणीपुरवठा योजना देऊळगांव (जं) च्या अंदाजपत्रकातील बाब क्र.६ उध्दरण वाहिनीच्या वाढीव परिमाणास (१९९२) लेखा संहिता नियम १९६८ चे नियम १५५ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांची सुधारीत मान्यता घेण्यात आली आहे. त्यामुळे सदरील बाबीवर जादा प्रदान झाले नाही.

७) समितीच्या देय असलेल्या शासन सहभागाच्या अंतिम देयकातून मोजमाप पुस्तिका क्र. ४४३ प्रा.क्र.८८५३४ मध्ये परिमाण (१५५.७२-१२४.५७)= ३१.१४ घ.मी. कमी करुन जादा प्रदानाची रक्कम रु.११,८३३/-समायोजित करण्यात आली आहे.

८) सुधारीत अंदाजपत्रकात सदरील बाबीचा समावेश करुन लेखा संहिता नियम १९६८ चे नियम १५५ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांची मंजुरी घेण्यात आली आहे.

१) समितीला शासन सहभागाचा तिसरा हप्ता वितरीत करताना विहिरीच्या हार्ड मटेरीयल मध्ये खोदकामाचा दर ३५०/- ऐवजी २७०/- ने प्रदान केले आहे. त्यामुळे समितीस जादा रक्कमेचे प्रदान झाले नाही.

२) प्रत्यक्ष झालेल्या कामाप्रमाणेच डिवाटरींगचे परिणाम देऊन प्रदान केले आहे वाढीव परिमाणास लेखा संहिता नियम १५५ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांची मान्यता घेण्यात आली आहे.

९) शासन निर्णय दिनांक १७.३.२०१० नुसार प.पा.पु योजनेची कामे १०% लोकसहभाग भरुन ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करावयाचे आहेत आणि शासन सहभागाची ९०% रक्कम ३०%, ३०%, ३०% व १०% या प्रमाणात वितरित करावयाची आहे. सदर देयकातून विक्रीकर, आयकर,विमा,निधी, कामगार कल्याण निधी इत्यादि कपाती करण्याबाबत शासनाचे कोणतेच निर्देश नाहीत व तसेच भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा दि.३१.३.२००८ रोजी संपलेल्या वर्षाचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेखा परीक्षण अहवालात परिच्छेद ३.९.६.१ नुसार ग्राम पंचायती कडून विभागातूनच कार्यान्वीत केलेल्या कामाच्या बाबतीत हप्ते देताना ग्रामपंचायतीच्या कामाच्या बिलातून प्राप्ती कर, विक्रीकर, विमा निधी, कामगार कल्याण निधी व ठेवी इत्यादि वजावटीची आवश्यकता नाही. अशी तरतूद असल्यामुळे समितीने स्वतः केलेल्या कामाच्या देयकातून उपरोक्त वजावटी करण्यात आलेल्या नाहीत. सध्या पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या निविदा काढून ठेकेदारामार्फत कामे करुन घेत असल्यामुळे ठेकेदाराच्या देयकातून नियमानुसार सर्व वजावटी वसूल करुन शासन खाती भरणा करतात.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पाणीपुरवठा योजनांकरिता तयार केलेली प्राधान्य यादी त्याचवेळी लेखा परीक्षणास का दर्शविण्यात आली नाही, शासन निर्णय ३० एप्रिल, २००५ मध्ये स्पष्ट सूचना असतानाही पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर महिला सदस्यांची नेमणूक का करण्यात आली नाही, याबाबतच्या आवश्यक सूचना केव्हा देण्यात आल्या, तांत्रिक मान्यतेबाबतच्या शासन सूचना डावलून कार्यकारी अभियंता यांनी रूपये २५.०० लाखांच्या वरील अंदाजपत्रकास कोणत्या प्राधिकारान्वये मान्यता दिली आहे. त्यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस खुलासा केला की, शासन निर्णय दिनांक ३ सप्टेंबर, २००१ मधील परिच्छेद क्र.५ (ड) नुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या नावाने वेगळे बँक खाते उघडून ते खाते चालविण्याचा अधिकार ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या किमान दोन सदस्यांना देण्यात यावा असे नमूद केले असल्यामुळे सदर खाते चालविण्याचा अधिकार ग्रामीण

पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने दोन सदस्यांना देण्यात आला आहे. नविन योजनेसाठी शासन निर्णय दिनांक ३० एप्रिल, २००५ नुसार कार्यवाही करण्यासाठी समितीच्या अध्यक्ष/सचिवांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, शासन निर्णयानुसार नळ पाणीपुरवठा योजनेचे रूपये २५.०० लाखा पर्यंतचे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषदेला असताना त्यांनी रूपये २५.०० लाखापेक्षा जास्त रकमेच्या अंदाजपत्रकास नियमबाह्य मंजुरी दिली आहे. सदर अंदाजपत्रकास त्यांनी कशी काय मंजुरी दिली आहे. त्यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १७ मार्च, २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे.

समितीने आणखी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक सोयी नुसार वापरता येते काय, यावर समितीस अशी माहिती देण्यात आली की, यासंबंधात ग्रामविकास विभागाने स्वतंत्र आदेश निर्गमित केले असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक जिल्हा परिषदेला लागू होत नाही. यावर पुढे समितीने अशी विचारणा केली की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व नियम जिल्हा परिषदेसाठी लागू आहेत काय, सदर योजनेवर आपण जो निधी खर्च केला आहे त्यास ग्रामविकास विभागाची मान्यता आहे काय, आपण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००८ च्या परिपत्रकाचा उल्लेख करीत असला तरी देखील त्या अगोदर देखील ग्रामविकास विभागाने परिपत्रके निर्गमित केली आहेत. यावर कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी समितीकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या परिपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी थोडा वेळ मागुन घेतला. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामविकास विभागाचे दिनांक १२.०१.२००१ आणि दिनांक १५.०७.२००८ च्या आदेशानुसार कार्यकारी अभियंता यांना रु. २५ लाखापर्यंतचे तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहे. त्यापुढील आदेश द्यायचे असल्यास मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांची मान्यता घ्यावी लागते.

हे आदेश डावलून आपण तांत्रिक मान्यता कशी दिली, हे स्पष्ट करावे. परंतु समितीला सदरहू प्रश्नाबाबत काहीही उत्तर मिळाले नाही.

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, सदरहू योजना २००७-२००८ मध्ये मंजूर झाली होती. कार्यकारी अभियंता यांना २५ लाखाच्या वरील कामांना मान्यता देण्याचे अधिकार नसताना देखील संबंधित कार्यकारी अभियंता यांनी २५ लाखाच्या वरील कामास मान्यता दिली होती. सदरहू मान्यता देणारे संबंधित अधिकारी कोण होते, असा प्रश्न समितीने विचारला असता समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, संबंधित अधिकाऱ्यांना बोलविण्यात आलेले आहे. परंतु श्री. वसुकर कार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या काळात मान्यता दिलेली नाही.

२००८-२००९ मध्ये श्री. वसुकर हे हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत होते. त्यांनी २५ लाखाच्या वरील कामांना मान्यता दिली होती काय, श्री. वसुकर यांनी तशी मान्यता दिली असल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी आणि मान्यता दिली नसेल तर श्री. वसुकर यांना नाहक बैठकीला बोलावून समितीची दिशाभूल केल्यामुळे त्यांना बोलाविणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले. प्रभारी कार्यकारी अभियंता श्री. यंबडवार यांनी समितीकडे थोडा वेळ मागीतला यासंदर्भातील माहिती तत्काळ बघून सांगण्याचे आश्वासन समितीला दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्रशासकीय मान्यतेबाबतच्या दिनांक १५/०८/२००८, दिनांक १.११.२००७, २६.०१.२००८, २३.०८.२००७ आणि दिनांक १०.०४.२००८ च्या ठरावानुसार कायद्यात दिल्याप्रमाणे कारवाई करावी लागेल. २५ लाखापेक्षा जास्त रकमेची २ कामे दिली असल्याचे दिसून येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांनी समितीला अशी माहिती दिली की, श्री. वसुकर हे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, या पदावर कार्यरत होते. त्यांचा कालावधी दिनांक २९ मे, २००६ ते दिनांक ३० ऑगस्ट, २००९ पर्यंतचा आहे. त्या कालावधीतील कामे आहेत काय, असे समितीने विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होय असे उत्तर दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, नळ पाणीपुरवठा योजना, हिंगणी, तालुका हिंगोली या कामास २६ लाखाची प्रशासकीय मान्यता असून २५ लाख ४४ हजार रुपयांची तांत्रिक मान्यता दिलेली आहे. देवधर, ता.कळमनुरी येथील नळ पाणी पुरवठा योजनेस ३९ लाख ४५ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता असून ३७ लाख १७ हजार रुपयांची तांत्रिक मान्यता आहे. हिंगोली येथील नळ पाणी पुरवठा योजनेस ३६ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता आहे व ३२ लाख १३ हजार ८५५ रुपयांची तांत्रिक मान्यता आहे. या योजनेकरिता तांत्रिक मान्यता दिल्या आहेत किंवा कसे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे यासंदर्भातील नस्त्या असतील. जिल्हा परिषदेने २५ लाखाच्या वरील दिलेली प्रशासकीय मान्यता कोणत्या वर्षी दिली आणि किती कामांना दिली आहे. जिल्हा परिषदेने २५ लाखाच्या वरील योजनांना दिलेली मान्यता कोणत्या वर्षी दिलेली आहे. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांनी समितीला त्या संदर्भात २००८ चा शासन निर्णय आहे अशी माहिती दिली.

यावर समितीने असे निदेश दिले की, शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेला २५ लाखापर्यंतच्या पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार आहे. शासन निर्णयाचे उल्लंघन करुन संबंधित अधिकाऱ्यांनी तीन कामांना मान्यता दिलेली आहे. त्यामुळे त्यांनी चुकीचा निर्णय घेतलेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून यासंदर्भातील लेखी अहवाल मागविण्यात यावा. तसेच या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाल्यास त्यांना सेवेतून निलंबित करण्यात यावे. तसेच समितीला यासंदर्भातील अहवाल सादर करण्यात यावा.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्दयांबाबत समितीने माहिती मागवली.**

शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेला २५ लक्ष पर्यंतच्या पाणीपुरवठा योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. या प्रकरणी अधिकाऱ्यांनी उक्त शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचे समितीला प्रथमदर्शनी दिसून आले आहे. उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय? चौकशीत दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली, केली नसल्यास विलंबाची कारणे काय,

तसेच पाणीपुरवठा विभागाच्या २५ लाखांच्या पेक्षा जास्त रकमेच्या कामाला तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला आहेत काय?

## चौकशी समितीचा अहवाल

सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात प्रस्तुत प्रकरणी पंचायत राज समितीच्या दिनांक २४, २५ व २६ जुन, २०१५ च्या जिल्हा परिषद हिंगोलीच्या दौऱ्याच्या वेळेस श्री.जि.एस.यंबडवार यांचेकडे कार्यकारी अभियंता या पदाचा कार्यभार होता त्याचा कालावधी दिनांक ११/१२/२०१२ ते ०२/०८/२०१३ व २४/०९/२०१३ ते ११/८/२०१५ एवढा आहे. मी.कि.म.संद्री, उप अभियंता म्हणून जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कळमनुरी येथे कार्यरत असून श्री.जि.एस.यंबडवार यांची जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग कंधार जिल्हा नांदेड येथे बदली झाल्यानंतर दिनांक ११/०८/२०१५ पासुन माझ्याकडे कार्यभार आहे. दिनांक २४/०६/२०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी समिती प्रमुखांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने रु. २५.०० लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या कामास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जि.प.च्या पाणी पुरवठा विभागास आहेत काय याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.एच.डि.वसुरकर यांचा दिनांक १५/०९/२०१५ रोजी नोटिस देवून खुलासा मागविण्यात आला होता सदर खुलाश्याच्या आधारे सदर प्रकरणाची चौकशी केली असता महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा विभाग परिपत्रक क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र.-८५/पापु-०७ दिनांक ०९/०५/२००७ यामध्ये तांत्रिक तपासणी हा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/पापु-०७ दि. ०४/०२/२००७ अन्वये तांत्रिक तपासणी ऐवजी तांत्रिक मान्यता हा शब्द प्रयोग वापरण्यात यावा व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश आहेत अशा प्रकारे शासनाने तांत्रिक मान्यतेचे अधिकार २५.०० लक्ष ऐवजी ७५.०० लक्ष आहेत ह्यास दुजोरा दिला आहे. सबब तत्कालीन अधिकारी यांनी चुकिचा निर्णय घेतलेला नाही व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले नाही त्यामुळे निलंबनाची कार्यवाही करणे ही बाब अभिलेख्याची, शासन निर्णयाची पडताळणी केली असता वस्तुस्थितीशी विसंगत आहे.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पाणी पुरवठा योजनेच्या कामांना रु.२५ लक्ष पेक्षा जास्त रक्कमेस तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जि.प.च्या पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना आहेत किंवा नाहीत याची चौकशी केली आहे. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शा.नि.क्र.ग्रापापू १००५/प्र.क्र.८५/पापू-०७ दिनांक ०९.०५.२००५ अन्वये शासनाने सदर शासन निर्णयात तांत्रिक तपासणी हा शब्द प्रयोग वापरला होता. त्या ऐवजी शा.नि.क्र.ग्रापापू-१००७/प्र.क्र.-२४३/पापू-७ दिनांक ०४.०२.२००८ अन्वये तांत्रिक मान्यता हा शब्द प्रयोग वापरण्यात यावा असे शासनाने स्पष्ट केले आहेत. उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रकानुसार पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना ७५ लक्ष पर्यंतच्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. उक्त प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले नाही. दिनांक ०४.०२.२००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ०९.०५.२००५ पासून कार्यकारी अभियंता यांना ७५ लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत हे स्पष्ट होते. सबब सदर प्रकरणी अधिकारी दोषी नसल्यामुळे कार्यवाही केली नाही.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून जिल्हा परिषद हिंगोली यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात आली.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने दिनांक २४ जून, २०१५ रोजी हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. उक्त साक्षीत लेखा परि. क्र.३.५६३ "१०० टक्के गुणवत्ता बाधीत स्त्रोत सुधारणे" योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेवर केलेल्या खर्चाबाबत शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेला २५ लक्षपर्यंतच्या पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत काय, या प्रकरणी अधिकाऱ्यांनी उक्त शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याबाबत चौकशी केली आहे काय, तसेच पाणी पुरवठा विभागाच्या २५ लाखांपेक्षा जास्त रकमेच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाला आहेत काय इत्यादीबाबत विचारणा केली असता, जिल्हा परिषदेने समितीला लेखी स्वरुपात माहिती पाठविली की, पाणी पुरवठा योजनेच्या

कामांना रु. २५ लाखांपेक्षा जास्त रकमेस तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना आहेत किंवा नाहीत याची चौकशी केली आहे. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक ग्रापापु/१००५/प्र.क्र.८५/पापु ०७दिनांक ९.५.२००५ अन्वये शासनाने सदर शासन निर्णयात "तांत्रिक तपासणी" हा शब्द प्रयोग वापरला होता, त्याऐवजी शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००७/प्र.क्र.२४३/पापु ७ दिनांक ४.२.२००८ अन्वये "तांत्रिक मान्यता" हा शब्दप्रयोग वापरण्यात यावा असे शासनाने स्पष्ट केले आहे. उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांना ७५ लक्ष पर्यंतच्या रकमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत. उक्त प्रकरणी शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले नसून दिनांक ४.२.२००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ९.५.२००५ पासून कार्यकारी अभियंता यांना ७५ लक्ष रुपयांपर्यंच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत हे स्पष्ट होते. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी शासनाने सदरहू प्रकरणी समितीने निदेश दिल्याप्रमाणे चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. हिंगोली जिल्हा परिषदेच्या दौऱ्याच्या वेळेस श्री.जी.एस.यंबडवार यांचेकडे कार्यकारी अभियंता या पदाचा कार्यभार होता. त्याचा कालावधी दिनांक ११/१२/२०१२ ते ०२/०८/२०१३ व २४/०९/२०१३ ते ११/८/२०१५ एवढा आहे. मी कि.म.संद्री, उप अभियंता म्हणून जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कळमनुरी येथे कार्यरत असून श्री.जी.एस.यंबडवार यांची जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग कंधार जिल्हा नांदेड येथे बदली झाल्यानंतर दिनांक ११/०८/२०१५ पासून कार्यभार आहे. दिनांक २४/०६/२०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी समिती प्रमुखांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने रु. २५.०० लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या कामास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जि.प.च्या पाणी पुरवठा विभागास आहेत काय याबाबत तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.एच.डी.वसुकर यांचा दिनांक १५/०९/२०१५ रोजी नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. सदर खुलाशाच्या आधारे सदर प्रकरणाची चौकशी केली असता महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा विभाग परिपत्रक क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र.-८५/पापु-०७ दिनांक ०९/०५/२००७ यामध्ये तांत्रिक तपासणी हा शब्द प्रयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/पापु-०७ दि. ०४/०२/२००७ अन्वये "तांत्रिक तपासणी" ऐवजी "तांत्रिक मान्यता" हा शब्द प्रयोग वापरण्यात यावा व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश आहेत. अशा प्रकारे शासनाने तांत्रिक मान्यतेचे

अधिकार २५.०० लक्ष ऐवजी ७५.०० लक्ष आहेत यास दुजोरा दिला आहे. सबब, तत्कालीन अधिकारी यांनी चुकीचा निर्णय घेतलेला नाही व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले नाही. त्यामुळे निलंबनाची कार्यवाही करणे ही बाब अभिलेख्याची, शासन निर्णयाची पडताळणी केली असता वस्तुस्थितीशी विसंगत आहे.

उपरोक्त चौकशी अहवालास शासनाच्या पाणीपुरवठा विभागाने संमती दर्शविली असून शासन निर्णयाप्रमाणे तांत्रिक मान्यतेचे अधिकार २५ लक्षऐवजी ७५ लक्ष असल्याच्या बाबीस दुजोरा दिलेला आहे. तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी नियमानुसार काम केले असल्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. **समिती या प्रकरणी अत्यंत दक्ष असून भेटीच्या वेळी जे मुद्दे उपस्थित झाले त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने सर्वंकष चौकशी करुन अहवाल समितीला पाठविलेला असून या प्रकरणातील सत्य समितीसमोर उजेडात आले आहे. त्यामुळे कोणत्याही निरपराध अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कार्यवाही होऊ नये या नैसर्गिक न्यायतत्वाला अनुसरुन समिती जिल्हा परिषदेने केलेल्या चौकशी अहवाल प्रकरणी समाधान व्यक्त करते.**

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद हिंगोली

### संवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणेसाठी औषधी साहित्य खरेदीतील अनियमितता बाबत (परिच्छेद क्रमांक ३.६३३)(सन २००८-२००९)

संवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविण्यासाठी औषधी व साहित्य सामग्री खरेदीवर रक्कम रु. १९,१३,६६७/- पुरवठा खर्च केला आहे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन वैद्यकीय व औषधी द्रव्ये विभाग निर्णय क्रमांक डिपीआर १०८६/१५१५/सीआर २३०/८८ एमईडी(अ) दिनांक ३१.३.१९९० मधील परिच्छेद ३२ अन्वये माल प्राप्तीनंतर बिलापोटी ८० टक्के रक्कम दर्जात्मक तपासणी केल्यानंतर २० टक्के रक्कम अदा करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र दिनांक २१.११.२००८ अन्वये ओटीएसपी उपयोजनेसाठी औषधी व साहित्य सामुग्री खरेदीसाठी रुपये ६३.५७ लक्ष अनुदानातून खर्च करण्यास मंजुरी दिली परंतु मा. सहसंचालक यांनी सदर योजनेचा लाभ केवळ हिंगोली जिल्हयातील बिगर आदिवासी भागातील आदिवासी लाभार्थी यांना देण्यात यावा असे आहे परंतू विभागाने वरीलप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविले नाहीत व अहवाल संचालकास पाठविणे आवश्यक होते ते दर्शविले नाहीत.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग जीपीआर/१०८८/सीआर ८९६/३० दिनांक २६.१०.१९८९ नुसार ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली त्याच वित्तीय वर्षात तिचा विनियोग करणे आवश्यक आहे. तथापि वाटपा अभावी ३१ मार्च अखेर शिल्लक आहेत. अनावश्यक खरेदीची रक्कम वसूलपात्र ठरते.

(४) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.एच.बी.पी. १०८९/१६०/एमडी दिनांक २०/४/१९९० मधील उपपरिच्छेद ८ नुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एका महिन्यात औषधाची मागणी करणे आवश्यक असताना ही विभागाने मागणी माहे जानेवारी २००९ मध्ये केली.

(५) औषधी सिबॉयसिस फार्मास्युटीकल्स सांगली यांचे कडून खरेदी केली. परंतू देयकासोबत टॅक्स इन्व्हॉईस न जोडता प्रोफॉर्मा इन्व्हॉईस जोडलेले आहे. त्यामुळे वित्त विभागाने देयक कसे पारीत केले व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे उपविभाग (२) मधील नियम २०(अ) चे पालन न केल्यामुळे संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन रक्कम रुपये १५६५१०/-वसूल करणे बाबत कार्यवाही व्हावी. प्रमाणक क्रमांक ४३४ दिनांक २६.०३.२००९ रुपये १५६५१०/-

(६) दोशी मेडीकल सर्व्हीसेस, मुंबई यांना औषधी पुरवठाबाबत प्राधिकृत केल्याचे हिमालया ड्रग्ज यांचे संचिकेत पत्र नाही त्यामुळे पुरवठाधारक अधिकृत असल्याची खात्री पटवावी. तसेच दोशी मेडीकल सर्व्हीसेस, मुंबई यांनी दिलेली बिले पक्की नसताना पुरवठादारास रक्कम रुपये २,६४,६४०/- अदा करण्यात आलेली आहे.

(७) औषधी साहित्य सामुग्री पुरवठा केलेले डिलेव्हरी चलन नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासन वैद्यकीय व औषधी द्रव्ये विभाग निर्णय क्रमांक ङि.पी.आर१०८०/ १५१५ सी.आर.२३०/८८ एम.ई.डी (अ) दिनांक ३१.०८.९० मधील परिच्छेद क्रमांक ३२ मध्ये पुरवठा धारकांना पुरविण्यात आलेल्या मालाबाबत रक्कम अदाई करण्याबाबत दिलेली अट क्र. १ व २ ची पूर्तता एकत्रित व एकाचवेळी झालेली असल्यामुळे म.जि.प.व.पं.स.लेखा संहिता १९६८ चे नियम ८३(३) चे देयकावर प्रमाणपत्र नोंदवून मालाची दर्जात्मक व संख्यात्मक तपासणी झाल्यानंतरच ८०%+ २०%= १००% अशी एकूण रक्कम अदाई करण्यात आली आहे.

३० पैकी २३ औषधीचे दर्जात्मक तपासणी अहवाल व साठा नोंद वहीच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच वित्त विभागाच्या कॅशबुकवरुन दर्जात्मक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधितास रक्कम प्राप्त झाल्याची खात्री करण्यात आलेली आहे. सोबत वित्त विभागाच्या कॅशबुकची छायांकित प्रत जोडली आहे.

सध्या सदरील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

आरोग्य सेवा संचालनालयामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बैठकामध्ये विभागास मंजूर सर्व योजनांचा प्राप्त अनुदान व झालेला खर्च याबाबत नियमित आढावा घेण्यात येतो.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग जीपीआर/१०८८/सीआर ८९६/३० दिनांक २६.१०.१९८९ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु औषधी वर्षाच्या शेवटी प्राप्त झाल्याने औषधीचे वाटप पुढील वर्षात करण्यात आलेले आहे.

दरवर्षी विभागास अनुदान प्राप्त होण्यास व अनुदान प्राप्त झाल्यानंतर औषधी खरेदीच्या योजनेस आरोग्य सेवा संचालनालय स्तरावरुन तसेच जिल्हा परिषद स्तरावर सर्व प्रकारच्या मान्यता प्राप्त करुन घेण्यास साधारणतः वर्षाचे सुरवातीचा ४ ते ५ महिन्यांचा कालावधी जातो. या कालावधीमध्ये जिल्ह्यात साथरोग उद्रेकासारखी परिस्थिती उद्‌भवल्यास विभागाकडे औषधीचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे आवश्यक असते.

तसेच औषधीची सर्वसाधारणतः मुदतबाह्य दिनांक २ ते ४ वर्षात असल्यामुळे शासनाचे नुकसान झाले नाही. याप्रमाणेच मागील वर्ष सन २००७-०८ चा औषधीसाठा सन २००८-०९ मध्ये वापरला असल्यामुळे आरोग्य सेवेवर कोणताही परिणाम झालेला नाही. सबब हा आक्षेप क्षमापित करावा.

महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक २० एप्रिल, १९९० उपपरिच्छेद (८) मधील तरतुदीनुसार वित्तीय वर्ष सुरु झाल्यानंतर एका महिन्यात औषधीची मागणी करणे आवश्यक होते. परंतु वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडून मागणी नोंदविण्यास विलंब झाल्यामुळे एकत्रित मागणी नोंदवण्यास पर्यायाने विलंब झाला होता. परंतु मागणी विलंबाने केल्याचा परिणाम आरोग्य सेवेवर झालेला नाही. कारण मागील वर्ष २००७-०८ मधील पुरेसा औषधी साठा उपलब्ध असल्यामुळे विपरीत परिणाम झालेला नाही. सोबत साठा नोंदवहीच्या छायांकित प्रत जोडली आहे. मागणी वेळेत नोंदविण्याबाबत विभाग दक्षता घेते.

सदरील औषधी सिबॉयसीस फार्मस्युटीकल्स सांगली यांचेकडून खरेदी केली. परंतु देयकासोबत टॅक्स इनव्हॉईस न जोडता प्रोफॉर्मा इन्व्हाईस जोडलेले आहे. वित्त विभागाने देयक पारित केले व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे उपविभाग (२) मधील नियम २०(अ) चे पालन न केल्यामुळे संबंधित कर्मचारी

यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी थोपविण्यात आली आहे. आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

प्रोफॉर्मा इन्व्हाईसवर देयक पारित केले असून प्रत्यक्षात औषधी प्राप्त झाली असून त्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आलेली आहे. साठा नोंदवहीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. तसेच डिलेव्हरी चलन व दर्जात्मक तपासणी अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. वरील प्रमाणे झालेल्या अनियमिततेबाबत विभाग यापुढे दक्षता घेत आहे. प्रमाणकात नमूद औषधी प्रत्यक्षात प्राप्त झाली असल्यामुळे रक्कम रुपये १,५६,५१०/ वसूल करण्याची आवश्यकता नाही. सबब हा आक्षेप क्षमापित करावा ही विनंती.

हिमालया ड्रग्ज मुंबई यांचे दोशी मेडीकल सर्व्हीसेस मुंबई यांना प्राधिकृत केल्याबाबतचे पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. यामुळे पुरवठादार अधिकृत असल्याची खात्री होते.

दोशी मेडीकल सर्व्हीसेस मुंबई यांना दिलेल्या पुरवठा आदेशा प्रमाणे प्रत्यक्षात औषधी प्राप्त झाली असून त्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये करण्यात येऊन वाटप करण्यात आले आहे. पुरवठा आदेशाची साठा नोंदवहीतील तसेच डीलेव्हरी चलनाची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. पक्के बिलानुसार देयक अदा करण्याची विभाग दक्षता घेत आहे. संबंधीत कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी थोपविण्यात आली आहे. डिलेव्हरी चलन संचिकेसोबत जोडण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, औषधींची दर्जात्मक व संख्यात्मक तपासणी कोणी व कशी केली, औषधींचा पुरवठा केव्हा झाला, गुणात्मक तपासणी अहवाल केव्हा प्राप्त झाला, सह संचालक यांचे पत्रानुसार सदर योजनेचा लाभ बिगर आदिवासी भागातील लाभार्थ्यांना द्यावयाचा होता. त्यानुसार कार्यवाही झाली आहे काय, याबाबतचे अभिलेख लेखा परीक्षणास त्याचवेळी का दर्शविण्यात आले नाहीत, असा अहवाल संचालकांना का पाठविण्यात आला नाही, ३० औषधांपैकी २३ औषधांचा दर्जात्मक तपासणी अहवाल

आलेला होता त्यामुळे ३० पैकी ३० औषधांचे पेमेंट का करण्यात आले, लेखा परीक्षणाचे वेळी ही माहिती का उपलब्ध करुन देण्यात आली नाही, दोशी मेडिकल हे प्राधिकृत केलेले डिलर होते का, औषधांचा पुरवठा केव्हा झाला, त्यांच्या तारखा काय आहेत, औषधांची केव्हा मागणी झाली, ३० औषधांपैकी ७ औषधींचा दर्जात्मक तपासणी अहवाल आला नव्हता. सदरची औषधी कंपनीला परत करण्याची कार्यवाही केली आहे काय, यात काही चुका झाल्या आहेत काय, ३० औषधांपैकी २३ औषधांचा दर्जात्मक तपासणी अहवाल आला आणि ७ औषधांचा दर्जात्मक तपासणी अहवाल आलेला नाही त्यामुळे उर्वरित ७ औषधांचे पेमेंट का केले, दोशी मेडिकल हे शासन मान्य मेडीकल होते का, औषधांसाठी किती रुपयांचे पेमेंट करण्यात आले, यावर प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, औषधी प्राप्त झाल्यानंतर बिलापोटी ८९ टक्के रक्कम, दर्जात्मक तपासणी केल्यानंतर २० टक्के रक्कम अदा करणे आवश्यक आहे. मालाची दर्जात्मक व संख्यात्मक अशी १०० टक्के एकूण रक्कम अदा करण्यात आलेली आहे. औषधे घेण्यासाठी दोशी मेडीकल प्राधिकृत केले होते त्यानुसार दिनांक २१/७/२०१० रोजी पेमेंट झालेले आहे. ३० प्रकारच्या वेगवेगळ्या औषधी आहेत. ३० औषधांचे पेमेंट केले त्यावेळी ७ औषधांचे पेमेंट झाले होते. त्यामधील तफावत कळली नाही, ही चूक झालेली आहे. १९ लाख १३ हजार ६५६ रुपयांचे पेमेंट करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की १९ लाख १३ हजार ६६७ रुपयांचे औषधांचे पेमेंट केलेले आहे. प्रो-फॉर्मा इन्व्हॉईस देयकाचा मुद्दा क्रमांक पाच आहे. प्रो-फॉर्मा इन्व्हॉईसवर देयक पारित झाले असून औषधे देखील प्राप्त झाली आहेत. त्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आली आहे. साठा नोंदवहीची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. यात झालेल्या अनियमिततेबाबत विभाग दक्षता घेत आहे. प्रमाणकात नमूद केलेली औषधे प्राप्त झाली असल्यामुळे रूपये १,५६,५१०.०० वसूल करण्याची आवश्यकता वाटत नाही. हिमालया ड्रग्ज, मुंबई यांनी दोशी मेडीकल सर्व्हीसेस, मुंबई यांना प्राधिकृत केल्याबाबतच्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. त्यामुळे पुरवठादार अधिकृत असल्याची खात्री होते. दोशी मेडीकल सर्व्हीसेस, मुंबई यांच्याकडून पुरवठा आदेशाप्रमाणे औषधे प्राप्त झाली आहेत. त्याची नोंद साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आली आहे. पक्के बिलानुसार देयक अदा करण्याची दक्षता विभाग घेत आहे. या प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली असून त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखण्यात आली आहे.

समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासन नियमाप्रमाणे जे दोषी असतील त्यांच्या विरुध्द कठोरात कठोर शिक्षा करावी. Pro-forma-invoice चे अधिकारी आहेत, त्यांच्या लक्षात ही बाब यायला पाहिजे होती. या प्रकरणी १९ लाख रुपयांचे पेमेंट केलेले आहे, त्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करावा आणि समितीला अहवाल पाठविण्यात यावा.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्दयांबाबत समितीने माहिती मागवली.**

Pro-forma-invoice वर देयक अदा करणेबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, उक्त चौकशीत काय आढळून आले? दोषी आढळून आले असल्यास संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय,

समितीच्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषद हिंगोली येथे मधुमेह, रक्तदाब या आजारांवरील औषधांचा साठा उपलब्ध नसल्याचे आढळून आले तसेच DNS/RL याची मागणी २२,००० असताना ४२,००० इतक्या बॉटल्सचा प्रचंड साठा केल्याचे आढळून आले. सदर जादा औषधे मागविण्याची कारणे काय.

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात

(१) proforma invoice वर देयक अर्थ विभागास सादर करण्यात आले आहे. परंतु चौकशीवेळी (Tax Invoice) उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित पुरवठाधारकास देयकामध्ये नमूद संपूर्ण औषधी प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष धनादेशाची अदाई करण्यात आली आहे.

(२) लेखा परिक्षणाच्या वेळी संबंधित विषयासंदर्भात दस्तऐवज दर्शविण्यात आलेले नाहीत.

३) proforma invoice वर अर्थ विभागास देयक सादर करणे याबाबतीमध्ये त्यावेळी कार्यरत असलेले श्री.एन.एल.तुंगेनवार, औषध निर्माण अधिकारी हे जबाबदार असल्याचे दिसून येते.

४) लेखा परिक्षणाच्या वेळी कार्यरत असलेले श्री.डी.एम.सेलूकर, औषध निर्माण अधिकारी यांनी लेखा परिक्षणास दस्तऐवज दर्शविले नाहीत त्यामुळे ते यास जबाबदार आहेत.

५) उक्त प्रकरणामध्ये proforma invoice वर अर्थ विभागास देयक सादर केले आहे याबाबतीमध्ये योग्य संनियंत्रण न केल्यामुळे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस.आर.रुणवाल हे सुध्दा यास जबाबदार आहेत.

६) चौकशी अंती प्रकरणामध्ये कुठल्याही प्रकारची आर्थिक अनियमितता झालेली दिसून येत नाही.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व सहाय्यक लेखा अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांच्या चौकशी समितीकडून चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीमध्ये मे. सिबॉयसिस फार्मास्युटीकल्स, सांगली या पुरवठा धारकाचे देयक pro-forma-invoice वर अर्थ विभागास सादर करण्यात आले आहे. चौकशी करते वेळी संबंधित पुरवठा धारकाचे मुळ देयक Tax-invoice भांडार शाखेकडे उपलब्ध असल्याचे आढळून आले. संबंधित पुरवठा धारकाच्या देयकामध्ये नमूद संपूर्ण औषधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष धनादेशाची अदाई करण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे. तसेच देयकामध्ये नमूद संपूर्ण औषधीचे वाटपही झाले आहे. pro-forma-invoice वर देयक सादर केल्याप्रकरणी तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश रुणवाल यांची एक वार्षिक वेतनवाढ या कार्यालयाचे आदेश क्र. जाक्र/जिपहि/आरोग्य/आस्था-१/कवि/२०६४५दि.१८.०९.२००४ व शाखा कर्मचारी श्री.एन.एन.तुंगेवार, तत्कालीन औषध निर्माण अधिकारी यांची एक वेतनवाढ एक वर्षाकरिता या कार्यालयाचे आदेश क्र. जाक्र/जिपहि/आरोग्य/आस्था-२/कवि/११४७/१५ दि. ११.०६.२०१५ अन्वये थोपविण्यात आलेली असुन सध्या शाखा सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्याने

परिपूर्ण अभिलेखे लेखा परिक्षणास न दर्शविल्यामुळे संबंधित कर्मचारी श्री.डी.एम.सेलूकर, औषध निर्माण अधिकारी यांचेकडून म.शा.ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. लेखाप-२०१३(७/१२)रु. २५,०००/- इतका दंड या कार्यालयाचे आदेश क्र.जाक्र/ जिपहि/आरोग्य/आस्था-१/कावि/२०६५/ दि. १८.०९.२०१५ अन्वये थोपविण्यात आला असून तो संबंधितांकडून वसूल करुन परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा हिंगोली या बँकेमध्ये चलान क्र. ००४३२७ दि.१८.०९.२०१५ या चलनाव्दारे शासन खाती जमा करण्यात आला आहे.

२) पंचायती राज समिती यांचे भेटीचे वेळी मधुमेह, रक्तदाब या आजारावरील साठा उपलब्ध नव्हता हिंगोली जिल्हा Noncommunicable disease control programme(NCD) या उपक्रमामध्ये समाविष्ट नसल्यामुळे मधुमेह व रक्तदाब या आजारावरील औषधी विभागास ज्या स्तरावरुन प्राप्त झालेली नव्हती परंतु ज्या औषधीचा पुरवठा जिल्हा स्तरावरुन झालेला नाही अशी आवश्यक औषधी प्र.आ.केंद्र स्तरावर रुग्णकल्याण समितीच्या उपलब्ध निधीतुन नियमाप्रमाणे खरेदी करुन रुगणांना देण्याच्या सुचना या कार्यालयामार्फत जा.क्र./२६ दि.१६/४/२०१०, जा.क्र./१६२ दि. ११/६/२०१०, जा.क्र./१०८ दि.१५.०५.२०१२ जा.क्र. १५७ दि.२४.०७.२०१३, जा.क्र./२६६ दि. २२.०७.२०१५ या पत्रान्वये वेळोवेळी जिल्ह्यातील प्रा.आ.केंद्रांना लेखी स्वरुपात देण्यात आलेल्या होत्या.

समितीच्या भेटीनंतर त्वरित जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली कडून या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र./२१७/१५ दि.०४/०७/२०१५ अन्वये मधुमेह व रक्तदाबावरील औषधी उपलब्ध करुन घेण्यात आलेली असुन मागणीप्रमाणे या औषधीचा जिल्ह्यातील प्रा.आरोग्य केंद्रांना पुरवठा करण्यासाठी उपलब्ध ठेवली आहे.

सन २०१४-१५ या वर्षासाठी विभागाने iv Ringer Locate १९७७५ बॉटल्स मागणी या कार्यालयाचे पत्र क्र५८२ दि.२४.०४.२०१४ अन्वये नोंदविली होती. परंतु सन २०१३-२०१४ या वर्षासाठी विभागाने नोंदविलेल्या मागणीच्या अनुषंगाने २०१३-१४ मध्ये देण्यात आलेल्या आरोग्य सेवा संचालनालयाच्या पुरवठा आदेशा प्रमाणे विभागास सन २०१४-२०१५ मध्ये (डिसेंबर, २०१४) ५६५७० बाटल्या IV Ringer Locate चा पुरवठा झाला. त्यापैकी ४२२३० बाटल्या IV Ringer Locate चा साठा समितीच्या भेटीच्या वेळी जिल्हास्तरावर उपलब्ध होता.

सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षात जिल्ह्यात कोठेही मोठया प्रमाणात साथरोगाची लागण न झाल्याकारणाने सदर साठा जिल्हास्तरावर शिल्लक राहीला परंतू सदरील औषधी साथरोग उद्रेक झाल्यास रुग्णांच्या उपचारासाठी अत्यंत आवश्यक असल्याकारणाने हा साठा करण्यात आलेला होता. तसेच सध्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील सर्व आरोग्य संस्थामध्ये ई-औषधी संगणकीय प्रणालीव्दारे कामकाज सुरु असल्यामुळे कमी किंवा जास्त औषधिंची देवाणघेवाण करता येत असल्यामुळे औषधी मुदतबाहय होण्याची शक्यता नव्हती.

मा.पंचायत राज समितीच्या भेटीनंतर खालीलप्रमाणे औषधीचा इतर आरोग्य संस्थांना मागणीप्रमाणे पुरवठा केला आहे.

दिनांक

| अ.क्र. | पुरवठा करण्यात आलेल्या आरोग्य संस्था | मागणी पा.क्र.व दिनांक | मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात आलेली औषधी व संख्या | पुरवठा क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा आरोग्य अधिकारी नागपुर | मा.सहसंचालक मुंबई यांचे पत्र दि. ३०.६.२०१५ | IV Ringer Locate ५२८० Bottles | जा.क्र./१६६ दि. ०३.०७.१५ |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड | जा.क्र./३९५८ दि. १९.७.१५ | १ IV Ringer Locate ८००० Bottles<br>२ IV DNS- २००० Bottles | जा.क्र./१८९ दि. १३.०७.१५ |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी परभणी | जा.क्र./५०१ दि. ७.७.१५ | १ IV Ringer Locate ७००० Bottles<br>२ IV DNS- ३००० Bottles | जा.क्र./१८८ दि. १३.०७.१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | वैद्यकीय अधिक्षक ग्रा.रु. भोकर | दि. ३.८.१५ चे मागणीपत्र | IV Ringer Locate २००० Bottles | जा.क्र./२५९ दि. ४.८.१५ |
| ५ | वैद्यकीय अधिक्षक ग्रा.रु. मुखेड | दि. १०.८.१५ चे मागणीपत्र | १ IV Ringer Locate २००० Bottles<br>२ IV DNS- ३०० Bottles | जा.क्र./२६८ दि. १०.८.१५ |

वरीलप्रमाणे IV Ringer Locate एकूण २४२८० बॉटल्सचा पुरवठा करण्यात आलेला असुन सध्या विभागाकडे नुकतेच प्राप्त १५००० बॉटल्यच्या साठयासह एकुण २७४२५ IV Ringer Locate बॉटल्स उपलब्ध आहेत. यापैकी १२४२५ बॉटल्सचा मुदतबाह्य दिनांक ऑक्टोबर, २०१६ असुन नुकत्याच प्राप्त झालेल्या १५००० बॉटल्सचा मुदतबाह्य दिनांक जुन,२०१७ आहे. त्यामुळे सदर औषधीचा वापर मुदतबाह्य दिनांकापुर्वी होणार आहे.

सन २०१४-१५ IV DNS ची विभागाची वार्षिक मागणी १५४५० बॉटल्सची होती व विभागाकडे मा.पंचयत राज समितीच्या भेटीच्या वेळी १५१२५ बॉटल्सचा साठा उपलब्ध होता. पंचायत राज समितीच्या भेटीनंतर वरीलप्रमाणे एकूण ५३०० बॉटल्स IV DNS चे वाटप करण्यात आलेले असुन सध्या विभागाकडे ८६२५ बॉटल्स शिल्लक आहेत. IV DNS या औषधीचा मुदतबाह्य दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ आहे. त्यामुळे सदर औषधीचा वापर मुदतबाह्य दिनांकापुर्वी होणार आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस स्पष्ट केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांनी प्रोफॉर्मा इन्व्हाईसवर देयक सादर केल्या प्रकरणी तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिश रुणवाल यांची एक वार्षिक वेतनवाढ दिनांक १८.९.२०१५

च्या आदेशान्वये थांबविण्यात आलेली आहे. या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांवर चौकशीअंती ही कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी श्री.एन.एन.तुंगेनवार तत्कालीन औषध निर्माण अधिकारी यांचीसुध्दा एक वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे. कारण त्यांनी देखील प्रोफॉर्मा इन्व्हाईसवर देयक सादर केले आहे. तशा प्रकारे चौकशी करुन यामध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

आरोग्य विभागाकडून सर्व संस्थांना सेंट्रल सप्लाय केला जातो. सेंट्रली प्रोक्युअरमेंट होते त्यानंतर सप्लाय होतो. मार्च, एप्रिल मध्ये सर्व जिल्ह्यांकडून डिमांड घेतो. सर्व जिल्ह्याची एकत्रित डिमांड करुन राज्यस्तरावर खरेदी प्रक्रिया होते. खरेदी प्रक्रीया एकत्रित असल्यामुळे राज्यस्तरावर ३-४ पट एवढी किंमत कमी येते. अशा प्रकारे प्रोसीजर सुरु असते पण सन २०१३-२०१४ मध्ये हिंगोली जिल्ह्याची डिमांड ६२८०० बॉटलची होती. खरेदी प्रक्रीया पूर्ण झाली होती. डिसेंबर, २०१४ मध्ये कंपनीला आदेशही दिले गेले होते. परंतु कंपनीने पुरवठा न केल्यामुळे त्यावर्षी हिंगोलीला सप्लाय केला गेला नाही. डिसेंबर, २०१४ मध्ये हिंगोलीला ५६५७० बॉटलचा सप्लाय केला गेला. तीन महिन्यात त्यांच्याकडून १४३४० बॉटल खर्ची पडल्या. उर्वरित ४२२३० बॉटल समितीची व्हिजीट झाली तेव्हा त्यांच्याकडे उपलब्ध होत्या. त्यांची डिमांड असल्यामुळे आमच्याकडून सप्लाय केला गेला आहे. सप्लाय थोडासा कमी गेला होता. आता आरोग्य विभागात नवीन औषध प्रणाली सुरु झालेली आहे. त्यावरुन कळते की, कोणत्या जिल्ह्यामध्ये औषधी साठा जास्त आहे. कोठे कमी आहे, कोणाला लागणार आहे. हे लक्षात आल्यानंतर बॉटलचा साठा इतर जिल्ह्यांना २४२८० बॉटलचा साठा दिलेला आहे. सद्यपरिस्थितीत हिंगोलीकडे १७९५० बॉटलाचा साठा उपलब्ध आहे. या बॉटलची एक्सपायरी डेट आक्टोबर, २०१६ असल्यामुळे आपल्याकडे मोठा कालावधी आहे. या कालावधीत सर्व बॉटल वापरल्या जाणार आहेत. यामध्ये शासनाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. कोणत्या जिल्ह्यात रोगाची साथ येईल हे आपणास सांगता येणार नाही. त्यामुळे आपण जास्तीचा साठा ठेवत असतो. हा सर्व साठा युटीलाईज होईल व शासनाचे कोणतेही नुकसान होणार नाही.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने दिनांक २४ जून, २०१५ रोजी हिंगोली जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली उक्त साक्षीत लेखा परिच्छेद क्र.३.६३३ "संवेदनशील आदिवासी भागात विशेष आरोग्य सेवा पुरविणेसाठी औषध साहित्य खरेदी अनियमिततेबाबत" औषधी व साहित्य खरेदीवर रक्कम रुपये १९,१३,६६७/- पुरवठा खर्च केला आहे. यामध्ये औषधी प्राप्तीनंतर बिलापोटी ८० टक्के रक्कम दर्जात्मक तपासणी केल्यानंतर २० टक्के रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नसून सह संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांच्या दिनांक २१.११.२००८ च्या पत्रान्वये ओटीएसपी उपयोजनेसाठी औषधी व साहित्य सामुग्री खरेदीसाठी रुपये ६३.५७ लक्ष अनुदानातून खर्च करण्यास मंजुरी दिली. सदरच्या योजनेचा लाभ केवळ हिंगोली जिल्ह्यातील बिगर आदिवासी भागातील आदिवासी लाभार्थ्यांना देण्यात यावा असे आहे. परंतु विभागाने याबाबतची कार्यवाही केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणात उपलब्ध करुन दिले नसून वित्तीय वर्ष सुरु झाल्यांनतर एका महिन्यात औषधी देण्याची मागणी करणे आवश्यक असताना सदरची मागणी माहे जानेवारी, २००९ मध्ये करण्यात येणे. ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली त्याच वित्तीय वर्षात त्याचा विनियोग करणे आवश्यक आहे. तथापि, वाटपाअभावी ३१ मार्च अखेर शिल्लक आहेत त्यामुळे अनावश्यक दराने इत्यादीबाबत लेखा आक्षेप उघडकीस आल्यानंतर समितीने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असून उक्त चौकशीत प्रोफॉर्मा इन्व्हॉईसवर देयक अदा करण्याबाबत दोषी आढळून आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली, तसेच मधुमेह, रक्तदाब या आजारावरील साठा उपलब्ध नसल्याचे आढळून आले तसेच DNS/RL यांची मागणी २२००० असताना ४२००० इतक्या बॉटलचा प्रचंड साठा केल्याचे आढळून आले. सदर जादा औषधी मागणीचे कारण काय, या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व सहायक लेखा अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांची चौकशी समितीकडून चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीमध्ये सिंबॉयसिस फार्मास्युटीकल्स सांगली या पुरवठाधारकाचे देयक प्रोफॉर्मा इन्व्हॉईसवर वित्त विभागास सादर करण्यात आले आहे. चौकशी करतेवेळी संबंधित पुरवठाधारकाचे मूळ देयक इन्व्हॉईस प्रोफॉर्माकडे उपलब्ध असल्याचे आढळून

आले आहे. इत्यादीबाबत समितीला लेखी आक्षेपात माहितीद्वारे अवगत करण्यात आले. या चौकशीत खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले. proforma invoice वर देयक अर्थ विभागास सादर करण्यात आले आहे. परंतु चौकशीवेळी (Tax Invoice) उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित पुरवठाधारकास देयकामध्ये नमूद संपूर्ण औषधी प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष धनादेशाची अदाई करण्यात येणे, लेखा परीक्षणाच्या वेळी संबंधित विषयासंदर्भात दस्तऐवज दर्शविण्यात आलेले नसणे, proforma invoice वर अर्थ विभागास देयक सादर करणे याबाबतीमध्ये त्यावेळी कार्यरत असलेले श्री.एन.एन.तुंगेनवार, औषध निर्माण अधिकारी हे जबाबदार असल्याचे दिसून येणे, लेखा परीक्षणाच्या वेळी कार्यरत असलेले श्री.डी.एम.सेलूकर, औषध निर्माण अधिकारी यांनी लेखा परीक्षणास दस्तऐवज दर्शविले नाहीत त्यामुळे ते यास जबाबदार असणे, उक्त प्रकरणामध्ये proforma invoice वर अर्थ विभागास देयक सादर केले आहे याबाबतीमध्ये योग्य संनियंत्रण न केल्यामुळे तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एस.आर.रुनवाल हे सुध्दा यास जबाबदार असणे, चौकशी अंती प्रकरणामध्ये कुठल्याही प्रकारची आर्थिक अनियमितता झालेली दिसून येत नसणे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता श्री.एन.एन. तुंगेनवार औषधी निर्माण अधिकारी, श्री.डी.एम.सेलूकर, औषधी निर्माण अधिकारी आणि जिल्हा मुख्य अधिकारी डॉ.एस.आर.रुणवाल हे या प्रकरणात प्रशासकीय अनियमिततेस दोषी असल्याचे दिसून येते. तथापि, या प्रकरणी कुठल्याही प्रकारची आर्थिक अनियमितता झालेली दिसून येत नाही. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्रोफॉर्मा इन्व्हॉईसवर देयक सादर केल्याप्रकरणी तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांची एक वार्षिक वेतनवाढ थांबविण्यात आलेली आहे. तसेच तत्कालीन औषधी निर्माण अधिकारी श्री.एन.एन.तुंगेनवार यांचीसुध्दा एक तात्पुरती वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे. तसेच DNS/RL या बॉटलचा हिंगोली जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे १७९५० बॉटल्सचा साठा उपलब्ध असून या बॉटल्सची एक्स्पायरी डेट ३१ ऑक्टोबर, २०१६ असल्यामुळे व पुढील कालावधी मोठा असल्यामुळे या सर्व बॉटल्स वापरल्या जाणार आहेत. तसेच यामध्ये शासनाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही. कोणत्या जिल्ह्यात रोगाची कधी साथ येईल हे सांगता येणार नाही त्यामुळे जास्तीचा साठा ठेवला आहे.

जिल्हा परिषदेने चौकशी समिती नेमून केलेली कार्यवाही ही प्रशासकीय अनियमिततेसंदर्भात असून ती रास्त आहे. Pro-forma invoice व देयक अदा करण्यास जबाबदार असणाऱ्या दोन अधिकारी/कर्मचाऱ्यांची वेतनवाढ रोखून त्यांच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद घेतल्याबद्दल समिती समाधान व्यक्त करते त्याचप्रमाणे उपलब्ध असलेल्या DNS/RL या बॉटल्सचा साठादेखील उपयोगात आणला जाणार आहे असे विभागीय सचिवांनी साक्षीत समितीला आश्वासीत केले असल्यामुळे या प्रकरणी समिती समाधान व्यक्त करते. तसेच लेखा परीक्षणाच्या वेळी जी कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत त्याबाबत मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियमाच्या कलम ७ नुसार सर्व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व या बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद हिंगोली

### ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर जिल्हा परिषद उपकरातून योजना कडबा कटर खरेदी व पुरविणे मधील रक्कम रुपये ३,९७,४६०/- अनियमितताबाबत. (परिच्छेद क्रमांक ३.८७९/३९२)(सन २००८-२००९)

समाजकल्याण विभागाने उपरोक्त योजनेसाठी केलेला खर्च रुपये ३,९७,४६०/ याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. योजना राबविण्यापूर्वी योजनेची योग्य प्रसिद्धी करुन गरजू लाभार्थीकडून अर्ज प्राप्त करुन योजनेच्या अटी व शर्ती नुसार प्राप्त लाभार्थीची निवड करण्यात आली नाही. निवड केलेल्या लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत.

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त ९ दिनांक २०/०६/२००८ मधील परिशिष्ट ई नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना पाळावयाचे वेळापत्रक व कार्यप्रणाली निश्चित केली आहे. परंतू उक्त परिपत्रकान्वये समाज कल्याण विभागाने अनुपालन केले नाही.

३. सदर योजना कृषी विभागामार्फत नेहमी राबविली जाते. परंतू समाज कल्याण विभागाने ही योजना कोणत्या प्राधिकाराने राबविली ते दर्शविलेले नाही.

४. कडबा कटरचा नमूना तपासणी अहवाल संचिकेत नाही. माल कधी प्राप्त झाला याबाबत डिलेव्हरी चलन दर्शविले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२६ प्रमाणे खरेदी व दरास मान्यता दिली नसतांनाही समाज कल्याण अधिकारी यांनी खरेदीचे आदेश दिले.

५. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.मागास १०९३/प्र.क्र.१२३९/३४/मुंबई, दिनांक ०१/०९/१९९३ च्या परिच्छेद क्र.०४ नुसार लाभार्थीची नोंदवही विवरणपत्र-अ प्रमाणे ठेवण्यात आलेले नाही. उक्त शासन निर्णय १.९.१९९३ मधील परिच्छेद क्र.१० प्रमाणे तालुक्यातील मागासवर्गीयाच्या

वर्ग निहाय लोकसंख्येनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आल्याबाबत दर्शविले नाही. तसेच उक्त शासन निर्णयातील परि.क्र.४ प्रमाणे लाभार्थीची संनियंत्रण नोंदवही पंचायत समिती हिंगोली, वसमत, कळमनुरी सदर साहित्य लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत अभिलेखे दर्शविले नाही. तर पंचायत समिती औंढा यांनी कडबा कटर १० नग वाटप न केल्याचे साठा पान क्रमांक ९९ वर शिल्लक आहेत. त्यामुळे रुपये १,१३,५६०/- एवढी रक्कम गुंतून पडली आहे.

वरील सर्व अनियमिततेमुळे योजनेचे उदिष्ट खऱ्या अर्थाने पूर्ण होत नाही.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. योजना राबविण्यापूर्वी योजनेची प्रसिद्धी जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या नोटीस बोर्डवर लावून गरजू लाभार्थ्यांकडून गट विकास अधिकारी यांच्यामार्फत प्रस्ताव प्राप्त करुन घेवून योजनेच्या अटी शर्ती प्रमाणे कागदपत्राची पूर्तता झालेनंतरच लाभार्थ्याची निवड केलेली आहे. निवड केलेल्या लाभार्थ्याचे प्रस्ताव उपलब्ध आहेत.

२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास जलसंधारण विभाग परिपत्रक दिनांक २०/०६/२००८ मधील परिशिष्ट ई मध्ये वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना वेळापत्रक नमूद केलेले आहे. योजनेस प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी ही दिनांक ०२/०३/२००९ रोजी घेतलेली असून त्यानंतर गट विकास अधिकारी यांच्याकडून लाभार्थ्याचे अर्ज प्राप्त करुन घेणे व प्राप्त प्रस्तावांमधील पात्र लाभार्थ्यांची निवड करणे या इतर बाबींमध्ये विलंब झालेला आहे. यापुढे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही होणेबाबत विभागाकडून दक्षता घेण्यात येत आहे.

३. सदर योजना कृषी विभागाकडून राबविली जाते. परंतू समाजकल्याण विभागाअंतर्गतच्या योजना या १०० टक्के अनुदानावर असल्यामुळे मागासवर्गीय लाभार्थ्यांना कोणताही हिस्सा न देता योजनेचा लाभ मिळावा म्हणून समाजकल्याण विषय समितीने ठराव क्र.१ दिनांक ०२/०६/२००८ अन्वये योजना राबविण्यासाठी मान्यता दिल्यामुळे सदर योजना समाज कल्याण विभागाकडून राबविण्यात आली आहे.

४. कडबा कटरचा गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध असून डिलीव्हरी चलन उपलब्ध आहे. मा.कृषी संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषी आयुक्तालय, म.रा.पुणे यांचे पत्र क्र.२/गुनि५/०८, दिनांक २३-१२-०८ अन्वये दर कळविल्याप्रमाणे खरेदी ही मा.विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ, नांदेड यांचेकडून केलेली आहे. खरेदी व दरास मान्यता न घेतल्यामुळे शासनास दिनांक ०६-०६-२०१५ रोजी क्षमापन सादर केलेले आहे.

५. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ०१/०९/१९९३ मधील परिच्छेद क्र.४ नुसार लाभार्थ्यांची नोंदवही ठेवण्यात येत आहे. उपरोक्त शासन निर्णयातील परि.क्र.१० प्रमाणे तालुक्यातील मागासवर्गीय यांच्या वर्गनिहाय लोकसंख्येच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. तसेच एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ मिळाला नसल्याची खात्री विभागाकडून केलेली आहे. लाभार्थ्यांची नोंदवही सुद्धा पंचायत समिती स्तरावर ठेवलेली आहे. पंचायत समिती, हिंगोली, वसमत, कळमनूरी यांच्याकडे असलेले सर्व साहित्य लाभार्थ्यांना वाटप केलेले असून वाटपाच्या नोंदवहीची प्रत उपलब्ध आहे.

लेखा परीक्षणाचे वेळी पंचायत समिती, औंढा यांचेकडे शिल्लक असलेले कडबा कटर चे १० नग वाटप झाले असून वाटपाची नोंदवही प्रत उपलब्ध आहे.

योजनेचे उदिष्ट पूर्ण झालेले असून सर्व साहित्य हे पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, योजना राबविण्यापूर्वी योजनेची पुरेशी प्रसिद्धी केली नाही, योजना विहित वेळापत्रकानुसार का राबविली नाही, तांत्रिक मान्यता मार्च, २००९ मध्ये घेण्यात आली. १ वर्ष इतक्या विलंबाने तांत्रिक मान्यता घेण्यास कोण जबाबदार आहे, योजना वेळापत्रकानुसार राबविण्यास काय अडचणी आहेत, समाजकल्याण विभागामार्फत राबवावयाच्या योजनेत कडबा कटर या साहित्याचा समावेश आहे काय, नसल्यास, समाजकल्याण संचालकांची त्यास मान्यता घेतली होती काय, नसल्यास, ही

योजना कोणत्या प्राधिकारात राबविली, ग्रामविकास विभागाच्या दिनांक, २०-१०-१९९९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कडबा कटर खरेदी करता येत नाही. तरी देखील आपण कडबा कटरची खरेदी केलेली आहे. याकरिता संचालकांची परवानगी घेण्यात आली होती काय, समाजकल्याण खात्याने काही नियम ठरवून दिलेले आहेत. त्यापलिकडे जाऊन जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव घेतले असतील तर समाजकल्याण संचालनालयाला कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा, अशी समितीची सूचना आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला असे सांगितले की, परिच्छेद क्रमांक ४ मधील अनुपालन अहवालामध्ये असे म्हटले आहे की, खरेदी करण्यासाठी मान्यता घेतली नाही. शासनाकडे दिनांक ६ जून, २०१५ रोजी क्षमापन सादर केले आहे.

समितीने असे विचारले की शासनाकडून क्षमापित केल्याचा काही निर्णय प्राप्त झालेला आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की दिनांक ६ जून, २०१५ रोजी शासनाकडे पत्र पाठविले आहे. यासंबंधी शासनाकडून अद्यापपर्यंत उत्तर आले नाही. त्यावर समितीने असे निदेश दिले की, पंचायती राज समिती जिल्हा परिषद, हिंगोली येथे येणार आहे म्हणून आपण शासनाकडे क्षमापनाचे पत्र पाठविले आहे. या प्रकरणी संबंधित जे अधिकारी दोषी असतील त्यांची चौकशी करावी आणि एक महिन्यात अहवाल समितीकडे पाठविण्यात यावा. पंचायती राज समिती येणार आहे म्हणून शासनाकडे एक महिन्यापूर्वी क्षमापन पत्र पाठविले आहे. असे किती प्रकरणांमध्ये क्षमापन पत्रे शासनाकडे पाठविली आहेत, त्याची यादी समितीला देण्यात यावी

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

प्रो-ऑडिटच्या पार्श्वभूमीवर नमूद वर्षाच्या लेखा आक्षेपाच्या संदर्भात शासनाकडे किती क्षमापन पत्रे पाठविण्यात आली आहेत, तसेच ६ जून, २०१५ रोजी या प्रकरणी पाठविण्यात आलेल्या क्षमापन पत्राबाबत शासनाचा अभिप्राय काय आहे, लाभार्थ्यांची यादी अद्यापही समितीसमोर न पाठविण्याची कारणे काय आहेत,

## चौकशी समितीचा अहवाल

पंचायत राज समिती लेखा आक्षेप क्र. ३.८७९ ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना कडबा कटर खरेदी व पुरविणे या योजनेतील अनियमिततेच्या संदर्भात चौकशी केली असून त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.—

१. योजना राबविण्यापूर्वी योजनेची प्रसिध्दी जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती स्तरावरच्या नोटीस बोर्डावर दि. ०२-०६-२००८ च्या पत्रान्वये डकविण्यात आल्याचे दिसून येत आहे. याबाबत संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेकडून खुलासा घेणे योग्य. तसेच निवड केलेल्या लाभार्थ्याचे प्रस्ताव लेखा परीक्षणास संबधीत कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करणे योग्य.

२. या योजनेसाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दि.०२ मार्च, २००९ रोजी घेतल्याचे दिसून आले. या संदर्भात शासन परिपत्रक दि. २२ जून २००८ नुसार वेळापत्रकाचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत संबधीत अधिकारी / कर्मचारी यांचेकडून खुलासा घेणे योग्य.

३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.१-१०-१९९३ मधील अनु. क्र. २३ मध्ये मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेतीचे अवजारे व चाकजोडी पूरविणे या योजनेचा समावेश असल्याने सदरील योजना विभागाकडून राबविण्यात आल्याचे दिसून येते.

४. कडबा कटरचा गुणवत्ता तपासणी अहवाल व डिलेव्हरी चालन संचिके दिसून येत आहेत. परंतु लेखा परीक्षणाच्या वेळी ते दर्शविले दिसून येते. याबाबत दंडात्मक कार्यवाही संबंधीतावर करण्यात यावी. सदर रु.५ लक्षाच्या योजनेस दरास व खर्चास महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम नुसार सक्षम प्राधीकाऱ्याची मंजुरी न घेता तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांनी पुरवठादारास पुरवठा आदेश निर्गमित केल्याचे दिसून येते. याबाबत तत्कालीन समाज कल्याण अधिकारी यांचेकडून कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचेकडून खुलासा घेणे योग्य.

५. लाभार्थ्यांची नोंदवही विवरणपत्र-अ पंचायत समिती स्तरावर ठेवलेली नव्हती. संचिकेमध्ये एकाच लाभार्थ्यांला दुबार लाभ न दिल्याचे खात्री गटविकास अधिकारी

यांनी केली असल्याचे प्रमाणपत्र दिसून येत आहे. परंतु सदर नोंदवही, लाभार्थ्यांना साहित्य वाटप नोंदवही लेखा परीक्षणास न दर्शविल्याने संबधीत कर्मचाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करणे योग्य.

६. पंचायत समिती, हिंगोली, वसमत व कळमनुरी यांनी सदर साहित्य लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत अभिलेखे उपलब्ध असल्याचे व पंचायत समिती, औंढा ना. यांनी साठा नोंदवही मध्ये शिल्लक असलेले १० नग, दि.२९-०४-२०१० ते ०२-०७-२०११ या कालावधीत वाटप झाल्याचे वाटप नोंदवही वरुन दिसून येत आहे.

परंतु समितीने अहवाल वर्षात किती क्षमापन पत्रे शासनाकडे पाठविली व त्यावरील शासनाचे अभिप्राय याची व लाभार्थ्यांची यादी याची माहिती साक्षीपर्यंत प्राप्त झाली नाही.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.—**

१) योजना राबविण्यापूर्वी योजनेची प्रसिध्दी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या स्तरावर नोटीस बोर्डावर दि. २-६-२००८ रोजीच्या पत्राअन्वये डकविण्यात आल्याचे दिसून येते. योजनेच्या अटी शर्तीनुसार निवड केलेली दिसून येते. तसेच निवड केलेल्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखा परीक्षणास दर्शविले नसल्याने तत्कालीन कनिष्ठ सहायक श्री.एस.आर.वाढवे यांचे वर रु. २५०००/- दंड थोपविण्यात आला आहे.

२) योजनेसाठी वेळापत्रकाचे पालन न केल्याने तत्कालीन संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून खुलासा घेवून पुढील कार्यवाही करणे योग्य.

३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.दि. ०१-०९-१९९३ मधील अ. क. २३ मध्ये मागासवर्गीय शेतक-यांना शेतीचे अवजारे चाक जोडी पुरविणे या योजनेचा समावेश असल्याने सदरील योजना विभागाकडून राबविण्यात आल्याचे दिसून येते.

४) साहित्याचा नमुना तपासणी अहवाल तसेच डिलेव्हरी चलन लेखा परीक्षणास दर्शविले नसल्याबाबत संबंधित कर्मचा-यावर दंडात्मक कार्यवाही करणे योग्य मजि. प. व प. स. अधिनियम, १९६१ चे कलम १२६ नुसार सक्षम प्राधिका-याची मंजुरी न घेता तत्कालीन समाजकल्याण अधिकारी यांची पुरवठाधारकास पुरवठा आदेशनिर्गमित

केल्याचे दिसून येते. याबाबत संबंधीताकडून खुलासा घेवून योग्य ती कार्यवाही प्रस्तावीत करावी.

५) सदरील योजनेसाठीचे लाभार्थी, नोंदवही, विवरणपत्र-अ पंचायत समिती स्तरावर ठेवलेले नव्हते.

६) लाभार्थ्यांना साहित्य वाटप केल्याची नोंदवही लेखा परीक्षणास न दर्शविले बाबत संबंधित कर्मचा-यांवर दंडात्मक कार्यवाही करणे योग्य, पंचायत समिती, औढा ना. यांनी शिल्लक असलेले १० नग, दि.२९-४-२०१० ते दि.२-७-२०११या कालावाधीत वाटप झाल्याचे नोंदवहीवरुन दिसून येते.

**केलेली कार्यवाही**

सदर लेखा आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे अभिलेखे लेखा परीक्षणास न दर्शविल्यामुळे संबंधित से.नि.कनिष्ठ सहायक श्री.एस.आर.वाढवे यांचेकडून मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, २०११ मधील कलम ८ अन्वये रुपये २५,०००/- एवढी दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी अभियंता ग्रा. पा. पू. जि.नांदेड यांना दि. २८-१०-२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

योजनेसाठी वेळापत्रकाचे पालन न केल्याने तत्कालीन संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटिसा देवून खुलाश्याच्या अनुषंगाने त्यांचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीकरिता प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.

कडबा कटर या योजनेसाठी दरास व खर्चास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी न घेता पुरवठादारास पुरवठा आदेश निर्गमित केल्याने याबाबत तत्कालीन समाज कल्याण अधिकारी, श्री. शिवाजी गिरी यांना कारणे दाखवा नोटीस त्यांचे खुलाशाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावीत केली आहे. तसेच याबाबत क्षमापित करणेसाठी मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म.रा., पुणे यांना या कार्यालयाचे पत्र दि. ०६-०६-२०१५, दि.४-१०-२०१५ व दि. १६-१०-२०१५ रोजी व ग्रामविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांना दि. १९-१०-२०१५ व दि. २४-१०-२०१५ रोजी सादर केलेले आहे.

उपरोक्त मुद्द्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी कलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, ऑडीट मधील नमूद लेखा आक्षेपाच्या संदर्भात शासनाकडे किती क्षमापत्र पाठविण्यात आली, दि. ६ जून, २०१५ रोजी या प्रकरणी पाठविण्यात आलेल्या क्षमापत्राबाबत शासनाचा अभिप्राय काय आहे, लाभार्थीची यादी समितीसमोर अद्याप न पाठविण्याची कारणे काय आहेत, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, लाभार्थीची यादी आता प्रस्तुत केलेली आहे. त्यावेळी दाखविण्यात आली नाही. तत्कालीन सहाय्यक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. संबंधित कर्मचाऱ्याने वेळापत्रकाचे पालन करण्याबाबत खुलासा व इतर बाबतीत सूचना करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

समितीने जिल्हा परिषदेला पाठवलेल्या अहवालामध्ये लाभार्थ्यांची यादी दिलेली नाही असा आक्षेप घेतला व  यादी का पाठवण्यात आली नाही, अशी विचारणा समितीने केली परंतु उत्तर प्राप्त झाले नाही. चौकशी अहवाल पाठवला मात्र लाभार्थ्याची यादी दिलेली नाही. समितीने प्रतिपादन केले की, प्रशासनामध्ये जमा खर्च वेळच्या वेळी लिहणे व कागदपत्रे जपणे आवश्यक असते. ऑडीटरने आक्षेप घेतला की त्यांना लाभार्थ्याची यादी दाखवली नाही. ३ वेळा संधी देऊनही यादी दाखवली नाही. समितीने यादी मागवली असता तिन्ही दिवस ती दाखवण्यात आली नाही. साक्षीकरिता ठेवल्यानंतरही टिप्पणीसोबत यादी जोडलेली नाही. आता समितीला सांगण्यात येत आहेत की, यादी आहे. कोण पारदर्शक काम करीत आहे याचा विचार झाला पाहिजे. ऑडीटरने २-३ वेळा मागणी केली. समिती येणार आहे हे ३ महिने आधी कळवण्यात आले होते. तरी यादी दिलेली नाही. साक्षीसमोर देखील यादी दिलेली नाही. लाभार्थ्याची यादी नाही, तरी देखील वाटप झालेले आहे. अपहार झाल्यासारखे आहे. २-३ वेळा संधी देऊन देखील यादी जोडली जात नसल्यास ते कारवाईस पात्र आहे. समितीचे असे मत झाले की, यादी देण्याची आज शेवटची संधी होती, तरी देखील यादी सादर केली नाही. त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना १००% अनुदानावर जिल्हा परिषद उपकरातुन कडबा कटर खरेदी व पुरविणे मधील रु.३,९७,४६०/- च्या अनियमिततेबाबत, योजना राबविण्यापूर्वी योजनेची योग्य प्रसिद्धी करुन गरजू लाभार्थीकडून अर्ज प्राप्त करुन योजनेच्या अटी व शर्ती नुसार प्राप्त लाभार्थीची निवड करण्यात आली नाही. निवड केलेल्या लाभार्थीचे प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविले नसणे, वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना पाळावयाचे वेळापत्रक व कार्यप्रणाली निश्चित केली आहे. परंतू उक्त परिपत्रकान्वये समाज कल्याण विभागाने अनुपालन केले नसणे, समाज कल्याण विभागाने ही योजना कोणत्या प्राधिकाराने राबविली ते दर्शविलेले नसणे, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२६ प्रमाणे खरेदी व दरास मान्यता दिली नसतांनाही समाज कल्याण अधिकारी यांनी खरेदीचे आदेश दिले असणे, लाभार्थीची संनियंत्रण नोंदवही पंचायत समिती हिंगोली, वसमत, कळमनुरी सदर साहित्य लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत अभिलेखे दर्शविले नसणे, या प्रकरणी समितीने योजना वेळापत्रकानुसार राबविण्यास काय अडचणी आहेत, समाजकल्याण विभागामार्फत राबवावयाच्या योजनेत कडबा कटरचा समावेश आहे काय, नसल्यास संचालक, समाजकल्याण यांची मान्यता घेतली होती काय, ग्रामविकास विभागाच्या १९९९ मधील शासन निर्णयानुसार कडबा कटर खरेदी करता येत नसतानाही कडबा कटर खरेदी करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ही योजना राबविण्याबाबत ठराव घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता घेतली आहे काय, तसेच याबाबत ६ जून, २०१५ रोजी शासन मान्यता नसल्यामुळे शासनाकडे क्षमापन पत्र सादर केले आहे त्यावर कोणता निर्णय झाला तसेच या संपूर्ण प्रकरणी दोषींविरुध्द चौकशी अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

समितीने निदेश दिल्यानुसार जिल्हा परिषदेने उक्त चौकशीनुसार जिल्हा परिषदेने लेखा परीक्षणास कागदपत्र न दाखविल्यामुळे संबंधीतांवर दंडात्मक कारवाई करण्याचे मान्य करुन त्यानुसार श्री.एस.आर.वाढवे, कनिष्ठ सहाय्यक यांचेकडून मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५०००/- रु एवढी दंडात्मक कारवाई करण्यासाठी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, नांदेड यांना दिनांक २८.१०.२०१५ रोजी कळविण्यात आले. वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी न

केल्यामुळे तत्कालीन संबंधीत कर्मचारी व अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. सक्षम प्राधिका-याची समाजकल्याण अधिकारी यांनी मंजुरी न घेता पुरवठादारास पुरवठा आदेश दिल्यामुळे त्यांनादेखील कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. लाभार्थी नोंदवही पंचायत समिती स्तरावर न ठेवणे, दुबार लाभार्थी नसल्याची खात्री गट विकास अधिका-यांनी केली नसल्याचे दिसून येत आहे तसेच साहित्याचे वाटप देखील केले असल्याचे साठा नोंदवही तपासल्यावर दिसून येते. असे समितीला पाठविलेल्या लेखी माहितीत नमूद केले आहे.

समितीला सध्या कार्यरत समाजकल्याण अधिकारी यांनी भेटीच्या वेळी लाभार्थींची यादी दाखविली नसणे, चौकशी अहवालाच्या सोबत लाभार्थ्यांची यादी जोडण्यात आली नसणे, त्याचप्रमाणे विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी देखील लाभार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यात न येणे. एकंदरच समाज कल्याण अधिकारी यांची कृती समितीला संशयास्पद वाटत आहे. तत्कालीन समाजकल्याण अधिकारी व कार्यरत समाजकल्याण अधिकारी यांनी देखील लाभार्थ्यांची यादी समितीस न दाखविणे याचाच अर्थ या प्रकरणात काहीतरी संशयास्पद घडल्याचे समितीचे मत झाले आहे म्हणुन ज्या आधारे लेखा परीक्षणाचे वेळी कागदपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिले नाही त्यासाठी त्याची जबाबदारी कनिष्ठ कर्मचा-यावर निश्चित करुन २५,०००/- रुपये दंड वसूल करण्यात येणार असल्याचे समितीला नमूद केले आहे त्यावर विभाग प्रमुखांनी जर या प्रकरणी वेळीच कार्यवाही केली असती तर यादी नक्कीच समितीला दाखविले असती परंतु त्यांनी तसे न करता कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केली. यावर समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

**एका कनिष्ठ दर्जाच्या कर्मचा-यावर कारवाई करणे योग्य नाही. समाजकल्याण अधिका-याने यादी दाखविणे आवश्यक होते. तत्कालीन अधिका-यांनी जी चूक केली तीच चूक कार्यरत अधिका-यांनी केली असल्याने दोघांवर देखील कठोर कारवाई करण्यात यावी, त्यांना सक्त ताकीद देण्यात येऊन त्याबाबतची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी अशी शिफारस समिती करित आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावा.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद हिंगोली

### मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदानातील प्रदानातील अनियमितता बाबत

### (परिच्छेद क्रमांक ३.८८३)(सन २००८-२००९)

समाज कल्याण विभागाने मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदानावर ४४ वसतीगृहांना रुपये ७४,०५,५४९/- खर्च केला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. मागासवर्गीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह अनुदान संचिकेची तपासणी केली असता, वसतीगृहातील १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा मार्च महिन्यात संपते परिक्षा संपल्यावर वर्ग १० चे वसतीगृहाचे विद्यार्थी हजेरी पटावर अनुपस्थित असतात, असे असतांना वसतीगृहांना परिपोषण अनुदान प्रति महा रु.६३०/- प्रमाणे माहे जून ते एप्रिल एकूण ७४,०५,५४९/- अदा केले जे की, १६९ विद्यार्थ्याचे एप्रिल महिन्याचे रुपये ६३०/- प्रमाणे रक्कम रुपये १,०६,४७०/- संबंधीत वसतीगृहाकडून वसूल करुन संबंधीत लेखा शिर्षात जमा करावे. सदर संचिकेची समाज कल्याण अधिकारी यांनी पाहणी/तपासणी केली असती तर जादा प्रदान झाले नसते.

२. एकुण २४ वसतीगृहाचे परिपोषण अनुदान वाटप संचिकेची तपासणी केली असता तपासणी अहवालाच्या झेरॉक्स आढळून आल्या. तसेच त्यावर सत्यप्रत म्हणून कोणाचीही सही नाही असे असतांना सबंधीत वसतीगृहाचे परिपोषण अनुदान मंजूर आवश्यक ती तपासणी अहवालाविना मंजूर केले आहे.

३. वरील वसतीगृहांना परिपोषण अनुदान वाटप केले पण संबंधीत वसतीगृहाची विद्यार्थी संख्या मान्यता दर्शविलेले नाही.

४. समाज कल्याण विभागाने ४४ मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदान वाटप केले त्याबाबत वसतीगृहाच्या बँक खात्यावर किमान रुपये १०,०००/- जमा असणे आवश्यक असतांना एकाही वसतीगृहाच्या बँक खात्यावर रुपये १०,०००/- जमा बाकी दर्शविली नाही.

५. विद्या विकास मुलींचे वसतीगृह, लाख, तालुका औंढा (ना.) च्या संचिकेची तपासणी केली असता वसतीगृहाच्या हजेरी पत्रकावर अ.क्र.२३ वरील धवसे देवी यशवंता वर्ग ११ वा ही विद्यार्थीनी ६/०७, ७/०७, ८/०७, ९/०७, १०/०७, ११/०७ या कालावधीत गैरहजर म्हणजे ६ महिने वसतीगृहात अनुपस्थित होती तर अ.क्र.५ वरील शिंदे मिरा उत्तमराव वर्ग १२ वा ही विद्यार्थीनी माहे ६/०७, ९/०७ मध्ये गैरहजर होती. म्हणजे ६+२=८ महिन्याचे ८X६३०=रु.६३००/- जादा अनुदान वाटप केले.

वरील परिच्छेद अ.क्र.१ मधील माहे एप्रिल महिन्यात जादा निर्वाह अनुदान १६९ विद्यार्थ्यांना ६३०/- प्रमाणे रुपये १०६४७०/- व वरील परिच्छेद क्रमांक ५ मधील अनुपस्थित/ गैर हजर कालावधीत जादा परिपोषण अनुदान वाटप रुपये ६३००/- असे एकूण रुपये १,१२,७७०/- संबंधीत वसतीगृहाकडून वसूल करुन योग्य त्या लेखाशिर्षात जमा करावे.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१. सचिव, सामाजिक न्याय व संस्कृती व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९८ मधील परिच्छेद क्र.६ (८) अन्वये वसतीगृह तपासणी करीता दिलेल्या भेटीमध्ये प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थी संख्येच्या सरासरी प्रमाणे अंतीम ४० टक्के अनुदानाचे अंकेक्षण करुन समायोजीत करण्यात येते. मात्र वसतीगृहातील संपूर्ण वर्षाची उपस्थिती ही सरासरी ७५ टक्के किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्येएवढे पूर्ण अनुदान मिळण्यास संख्या पात्र राहील असे नमूद केले आहे. त्यानुसार वसतीगृहामधील विद्यार्थ्यांची वार्षिक उपस्थिती ७५ टक्के पेक्षा जास्त असल्याची खात्री करुनच माहे जून ते मार्च या दहा महिन्याचे परिपोषण अनुदान मंजूर केले आहे. माहे एप्रिल चे अनुदान दिलेले नाही. सोबत वसतीगृह तपासणी अहवाल जोडण्यात आले आहे. त्यामुळे आक्षेपामधील दर्शविण्यात आलेली वसूली रक्कम रु.१,०६,४७०/- वसूल करण्यात आलेली नाही.

२. आक्षेपात नमूद केलेल्या २४ वसतीगृहाच्या तपासणी अहवालाच्या प्रती साक्षांकित करुन घेतल्या आहेत. त्या संचिकेस उपलब्ध आहेत.

३. आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे सर्व वसतीगृहाचे विद्यार्थी संख्या मान्य आदेश उपलब्ध असून ते संचिकेस जोडण्यात आलेले आहेत.

४. सचिव, सामाजिक न्याय व संस्कृती व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १६ मार्च, १९९८ मधील जोडपत्र क मध्ये संस्था आर्थिकदृष्ट्या संपन्न असण्यासाठी वसतीगृहाचे व्यवस्थापन करीता संस्थेच्या नावे बँकेत किमान रु.१०,०००/- कायम स्वरुपी जमा असणे आवश्यक आहे. कायमस्वरुपी जमा असल्याबाबतची नोंद संस्थेच्या पासबुकावरुन दिसुन येते. संबंधीत संस्थांना याबाबत अवगत केले असून त्यानुसार कार्यवाही होत आहे.

५. विद्या विकास मुलींचे वसतीगृह, लाख, ता औंढा ना.येथील वसतीगृहावरील अनु.क्र.५ व २३ वरील गैर हजर विद्यार्थ्यांच्या ठिकाणी संस्था चालकाने सदर नाव कमी करुन त्या ठिकाणी दुसऱ्या मुलीस प्रवेश दिला आहे. पूर्वीच्या सोडून गेलेल्या विद्यार्थीनीची उपस्थिती व नविन प्रवेश दिलेल्या विद्यार्थीनीची उपस्थिती गृहीत धरुनच अनुदान निर्धारण केले आहे. याबाबत वसतीगृह हजेरीची सत्यप्रत संचिकेस उपलब्ध आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदान प्रदानातील अनियमितता बाबत वसतिगृहाचे परिपोषक अनुदान मूळ तपासणी अहवाल नसताना नियमबाह्य कसे वाटप केले, वसतिगृहांच्या खात्यावर किमान १०,०००/- रु. शिल्लक असल्याची खात्री कोणी व कशी केली,वसतिगृहात ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी विद्यार्थी अनुपस्थित असतानाही परिपोषण अनुदान नियमबाह्यपणे कसे अदा केले, यावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी समितीला विदीत केले की, आक्षेपात नमूद केलेल्या २४ वसतीगृहाच्या तपासणी अहवालाच्या प्रती साक्षांकित करुन घेतल्या आहेत. मुळ तपासणी अहवाल उपलब्ध आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला याबाबत अधिक माहिती दिली की, संस्थेच्या नावे बँकेत किमान १० हजार रुपये असण्याची अट आहे. पासबुक ओरिजनल ठेवून घेता येईल.

एका बँकेच्या खात्यावर दहा हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम ठेवलेली नाही. प्रश्नावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी पासबुकांची झेरॉक्स प्रत जमा केलेली आहे.

असे सांगितले. यावर समितीने असे निदेश दिले की, संबंधित अधिकाऱ्यांनी या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात यावी व एक महिन्यात समितीकडे यासंबंधीचा अहवाल पाठवावा.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सहा महिने विद्यार्थी अनुपस्थित असताना देखील नियमबाह्य पद्धतीने अनुदान देण्यात आलेले आहे, विद्यार्थ्याला प्रवेश द्यायला हरकत नाही. तो विद्यार्थी आहे असे गृहीत धरून अनुदान कसे काय दिले, विभागाने जादा निर्वाह अनुदान रूपये १,१२,७७०.०० वसूल केले आहे काय, दुसरा विद्यार्थी घेऊन निधी माफ करता येतो काय, असा परस्पर विद्यार्थी कोणालाही ठेवता येतो काय, ठेवता येत असल्यास, त्याचे अनुदान वाटप करू शकतो काय, त्याचे अनुदान वाटप झाले असेल तर ते वसूल करता येते काय, समितीने असे मत व्यक्त केले की, हे अनुदान किती विद्यार्थ्यांचे आहे, संस्थेने आपल्या मनाने विद्यार्थी भरून शासनाचे अनुदान लाटलेले आहे. यावर समितीला अशी माहिती देण्यात आली की, ऑक्टोबरपर्यंत एक विद्यार्थी नियमित हजर होता. पण तो नंतर गैरहजर राहिल्यामुळे तेथे दुसरा विद्यार्थी घेतला आहे. तो विद्यार्थी हजर राहात नव्हता. ७५ टक्के किंवा त्यातून अधिक उपस्थिती विद्यार्थ्याची असल्यास संस्था अनुदान मिळण्यास पात्र राहील असा शासन निर्णय आहे.जादा निर्वाह अनुदान रुपये १,१२,७७०.०० वसूल केले नाहीत, तसेच हे अनुदान दोन विद्यार्थ्यांचे आहे.

समितीच्या मते संस्थेने आपल्या मनाने विद्यार्थी भरुन शासनाचे अनुदान लाटलेले आहे, तसेच या प्रकरणी समितीला समाधानकारक उत्तर मिळाले नसल्यामुळे समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणी चौकशी करुन तत्संबंधातील अहवाल समितीला पाठवून दयावा. तसेच संबंधितांकडून पैसे वसूल करुन यास जबाबदार असणा-या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी व या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्दयांबाबत समितीने माहिती मागवली.**

वसतिगृहाचे परिपोषक अनुदान मूळ तपासणी अहवाल नसताना नियमबाह्य वाटप केल्याप्रकरणी मूळ नस्ती उपलब्ध आहे काय, तसेच या प्रकरणी सर्वंकष चौकशी केली आहे काय, त्यानुसार लेखा आक्षेपाचे निराकरणझाले आहे काय, याबाबत माहिती द्यावी?

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

उपरोक्त मुद्दयासंदर्भात समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात आली असुन तत्संबंधीचा चौकशी अहवाल समितीस लेखी पाठविण्यात आला.

**उक्त चौकशी अहवालातील निष्कर्ष**

१) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.बीएसी एच १०९७/प्र.क्र.१०७/मावक १०४/मंत्रालय, मुंबई दि. १६ मार्च, १९९८ मधील परि.६(८) अन्वये वसतीगृह तपासणी करीता दिलेल्या भेटीमध्ये वसतीगृहातील संपूर्ण वर्षाची उपस्थिती ही सरासरी ७५ टक्के किंवा त्याहून अधिक असल्यास विद्यार्थी मान्य संख्येएवढे पूर्ण अनुदान मिळण्यास संख्या पात्र ठरते. त्यानुसार वसतीगृहातील विद्यार्थ्यांची वार्षिक उपस्थिती ही ७५ % पेक्षा जास्त असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वसतीगृहांना परिपोषक अनुदान हे जादा प्रदान झाल्याचे दिसून आले नाही.

२) सर्व संबंधित वसतीगृहाची तपासणी अहवाल मूळ नस्तीसह उपलब्ध असून विद्यार्थ्यांचे हजेरीपट तसेच अभिप्राय पुस्तीका यावरील नोंदविण्यात आलेले अभिप्राय व संचिकेसोबत जोडण्यात आलेल्या त्यांच्या झेरॉक्स प्रती यामध्ये कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. सदरील तपासणी अहवालाच्या आधारेच वसतीगृहांना परिपोषक अनुदान मंजूर केलेले आहे.

३) सर्व वसतिगृहांची विद्यार्थी संख्या मान्यता ही तपासणी अहवालावर नमूद आहे.

४) संस्थांच्या बँक खात्यावर रु.१००००/- पेक्षा जास्त रक्कम कायमस्वरुपी जमा ठेवत नसल्याचे आढळून आले आहे. याबाबतीत सर्व संस्थाचालकांना ताकीद पत्र देणे योग्य.

५) विद्या विकास मुलीचे वसतिगृह, लाख, ता.औंढा ना. येथील हजेरी पत्रकावरील अ.क्र.५ वरील विद्यार्थीनी कु. शिंदे मीरा उत्तमराव ही चार महिने व अनु.क्र.२३ वर कु.धवसे श्रीदेवी यशवंता ही सहा महिने वसतिगृहात अनुपस्थित असताना त्यांना प्रती महा रु.६३०/*- प्रमाणे एकूण १० महिन्याचे रु. ६,३००/- परिपोषण अनुदान अदा झाल्याचे आढळून आले. याबाबतीत संबंधीतांकडून वसूली करुन घेणे योग्य.

## केलेली कार्यवाही.

उपरोक्त चौकशी अहवालानुसार जिल्हा परिषदेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. बीएसी एच १०९७/प्र.क्र.१०७/मावक४/मंत्रालय, मुंबई, दि. १६ मार्च, १९९८ मधील परि.३(क) अन्वये संस्था आर्थिकदृष्टया संपन्न असण्यासाठी वसतीगृहाचे व्यवस्थापनाकरीता संस्थेच्या नावे बँकेत किमान १००००/- कायमस्वरुपी जमा असावे तसेच मान्यतेच्या वेळी व्यवस्थापनावर आधीचे कोणतेही दायित्व नसावे अशी तरतूद असून याबाबत सर्व संस्थांना ताकीद पत्र देण्यात आलेले आहे.

विद्या विकास मुलींचे वसतीगृह, लाख, ता. औंढा ना. येथील हजेरी पत्रकावरील अनु.क्र.५ वरील विद्यार्थीनी कु. शिंदे मीरा उत्तमराव ही चार महिने व अनु क्र.२३ वरील कु.धवसे श्रीदेवी यशवंता ही सहा महिने वसतीगृहात अनुपस्थित असतांना त्यांना प्रती महा रु.६३०/- परिपोषण अनुदान अदा झाल्यामुळे सदर वसूली दि. १४/०७/२०१५ रोजी केलेली असून ती शासन खाती भरणा केलेली आहे. चलनाची प्रत उपलब्ध आहे.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्राया संदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद हिंगोली यांनी कलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने या प्रकरणी सर्वंकष चौकशी करुन विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी चौकशी समितीचा अहवाल समितीस सादर केला. उक्त अहवालाच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गीय वसतीगृहाचे परिपोषण अनुदान मूळ तपासणी अहवाल नसतांना नियमबाहय वाटप केल्या प्रकरणी मूळ नस्ती उपलब्ध आहे काय, या प्रकरणी सर्वंकष

चौकशी केली आहे काय, त्यानुसार लेखा आक्षेपाचे निराकरण केले आहे काय, त्याबाबत काय कार्यवाही केली, त्यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विदीत केले की, ह्या विषयी सर्व संबंधित वसतीगृहाच्या तपासणीची मूळ नस्ती उपलब्ध आहे. त्याच्यात हजेरी पट व हजेरी पुस्तिका आहे. तेथे नोंद घेण्यात आलेले जे अभिप्राय होते त्याची झेरॉक्स प्रत, व त्या अभिप्रायामध्ये कोणतीही तफावत आढळून आलेली नाही. सदरील तपासणी अहवालाच्या आधारेच वसतीगृहांना परिपोषक अनुदान मंजूर केले गेले आहे. सर्व झेरॉक्स प्रतींची त्यांनी तपासणी केलेली आहे. सर्व वसतीगृहांची विद्यार्थी संख्या ती मान्यता तपासणी अहवालावर नमूद केलेली आहे. तसेच जे बँक खात्यावर रुपये दहा हजार पेक्षा जास्त रक्कम कायम स्वरुपी जमा ठेवण्याची जी तरतूद आहे. त्याप्रमाणे इन्सपेक्शनमध्ये आढळून आले की ते ठेवत नाही. त्यावर सर्व संस्था चालकांना ताकीद पत्र देणे योग्य होईल असे इन्स्पेक्शनमध्ये नमूद करण्यात आले आहे. एक मुद्दा असा निघाला विद्या विकास मुलींचे वसतीगृह औंढा नागनाथमध्ये आहे तेथे हजेरी पत्रकावरील अनुक्रमांक ५ वरील विद्यार्थीनी ही चार महिने व अनुक्रमांक २३ मधील विद्यार्थीनी ६ महिने अनुपस्थित असतांना प्रति महा ६३०/- रुपये याप्रमाणे त्यांना दहा महिन्यांचे ६३००/- रुपये अधिक अदा झाल्याचे आढळून आले. या विषयी संबंधितांकडून वसूली करुन घेतलेली आहे. शासन खात्यामध्ये भरणा केलेली आहे.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, सदरहू संदर्भात अधिकाऱ्यांवर कोणती प्रशासकीय कारवाई केली, त्यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विदीत केले की, संबंधिताना ताकीद पत्र देण्यात आलेले आहे. त्यावर समितीने तीव्र नापंसती व्यक्त केली की, ताकीद पत्र जे दिलेले आहे. ते संस्थांना दिलेले आहे. ही बाब असमाधानकारक आहे. यापेक्षा थोडी उचित कार्यवाही करणे आवश्यक होते. ताकीद म्हणजे शिक्षा नव्हे. लेखा परिक्षणात आक्षेप निघाला नसता तर गुन्हेगार सुटला असता असे मत समितीने व्यक्त केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक खुलासा करताना समितीस सांगीतले की, दहावीला जे विद्यार्थी आहेत. त्यांचे निर्वाह अनुदान एप्रिल महिन्याचे कपात करुन उर्वरित अनुदान घ्यायला पाहिजे होते. परंतु तसे न करता सरकसट १० महिन्यांचे अनुदान म्हणजे सुट्टीचे एक महिन्याचे निर्वाह अनुदान कापून घ्यायला पाहिजे होते. तसे न करता सरसकट १० महिन्याचे निर्वाह अनुदान दिले आहे असा आक्षेप आहे. असे

१६९ विद्यार्थी आहेत. प्रत्येकाला दरमहा ६३०/- रुपये प्रमाणे १,०६,४७०/- रुपयांचे अतिरिक्त अनुदान दिले गेलेले आहे असे ऑडीटच्या आक्षेपात आहे. शासन निर्णयामध्ये १० महिन्यांचे अनुदान द्यावे असे आहे. अतिरिक्त जे ६३००/- अनुदान दिलेले आहे ते वसूल केलेले आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

समाजकल्याण विभागाने मागासवर्गीय वसतीगृहांना परिपोषण अनुदानावर रु. ७४०५५४९ खर्च केला या खर्चाबाबत लेखा परिक्षकांनी असे आक्षेपीत केले की, मागासवर्गीय वसतीगृहातील १० वी मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची परिक्षा मार्च मध्ये संपल्यानंतर वर्ग १० चे विद्यार्थी हजेरीपटावर अनुपस्थित असताना संबंधीत वसतीगृहांना परिपोषण अनुदान प्रति महा प्रति विद्यार्थी रु.६३०/- प्रमाणे माहे जून ते एप्रिल या कालावधीकरिता रु. ७४,०५,५४९/- अदा केले. पैकी १६९ विद्यार्थ्याचे एप्रिल महिन्याचे ६३०/- प्रमाणे रक्कम रु.१,०६,४७०/- संबंधीत वसतीगृहाकडून वसूल करण्याबाबत समाजकल्याण अधिकारी यांनी तपासणी केली असती तर त्याचे जादा प्रदान झाले नसते. वसतीगृहांना अनुदान वाटप करताना संबंधीत वसतीगृहात एकूण मंजूर विद्यार्थी संख्या न दर्शविणे, वसतीगृहाच्या बँक खात्यावर किमान रु १०,०००/- जमा असणे आवश्यक असतानाही सदरची रक्कम जमा केलेली नसणे. विद्या विकास मुलींचे वसतीगृह, लाख, तालुका औढा च्या संचिकेची तपासणी केली असता वसतीगृहात २ विद्यार्थीनी प्रत्येकी ६+२=८ महिने अनुपस्थित असतानाही या ८ महिन्याचे रु.६३०/- प्रमाणे जादाचे अनुदान वसतीगृहांना वाटप केलेले असणे, उपरोक्त सर्व आक्षेपाबाबत जिल्हा परिषदेने होकार दर्शविला असून सर्व संबंधितांवर कारवाई केल्याचे लेखी स्वरुपातील माहितीत नमूद केलेले आहे.

या प्रकरणी तत्कालीन समाज कल्याण अधिका-यांचे अत्यंत दुर्लक्ष झाले असुन त्यांनी संस्था चालकांना मदत कशी होईल याचीच दक्षता घेतल्याचे दिसुन येते. कोणतीही तपासणी न करता कर्तव्यात कसुर केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहाच्या बँक खात्यावर रु.१०,०००/- जमा असणे आवश्यक असताना, सदरची रक्कम जमा नसणे, ६-६ महिने विद्यार्थीनी वसतीगृहात अनुपस्थित असुनही परिपोषण अनुदान वाटप होते. जिल्हा परिषदेने केवळ संस्था चालकाकडून पैसे वसुल केले परंतु कारवाई केलेली नाही ही जिल्हा परिषदेची कृती समितीला अनाकलनीय

वाटते. सर्व संस्था या खाजगी मालकीच्या असुन या ना त्या कारणाने शासनाचे अनुदान लुबाडण्याचीच त्यांची मानसिकता असते हे समितीला प्रस्तुत प्रकरणात आढळून आले. समितीच्या मते नियमांचे पालन न करणे ही बाब गंभीर असुन कुठलाही दंड न आकारणे या जिल्हा परिषदेने केलेल्या कृतीबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते.

**साक्षीच्या वेळी या प्रकरणी चूक झाल्याचे मान्य करुनही जिल्हा परिषदेने सर्व संबंधित अधिका-यांवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कोणतीही कारवाई केल्याचे आढळून येत नाही. चौकशी अहवाल समितीची दिशाभूल करणारा असुन चौकशी अधिका-याच्या कार्यतत्परतेबद्दलही समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

**या चौकशी अधिका-याने त्याच्या विभागातील समाजकल्याण अधिका-याला पाठीशी घालण्याचा प्रकार म्हणजे एक प्रकारे समितीपासुन सत्य दडवणे असुन हा समितीचा एक प्रकारे अवमान झाल्याचे वाटते. म्हणुन तत्कालीन समाज कल्याण अधिकारी व प्रकरणातील चौकशी अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार कडक स्वरुपाची कारवाई करुन त्यांना सक्त ताकीद देण्यात यावी तसेच त्यांचे सेवापुस्तकात तत्संबंधी नोंद घ्यावी अशी समिती शिफारस करते व केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस सादर करावी.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, हिंगोली

### जिल्हा परिषद उपकरातून प्लॅस्टीक मॅट खरेदी मधील अनियमिततेबाबत.

**(परिच्छेद क्रमांक ३.११७) (सन २००९-२०१०)**

जिल्हा परिषद हिंगोली,सन २००९-१० (परिच्छेद क्र.२) शिक्षण विभाग, जि.प.हिंगोली यांनी सन २००९-१० वित्तीय वर्षात दरकरारानुसार क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांना प्लॅस्टीक मॅट ५५१९ नग दर रुपये ९०.५८/- प्रमाणे खरेदी करण्याकरिता आदेश क्र. १०५६/१० दि.३०.०३.२०१० रोजी दिले असुन त्याकरता रुपये ४, ४९,९२०/- इतका खर्च केला आहे. याबाबत लेखापरिक्षकांचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) पंचायत समितीकडुन शाळा निहाय प्लॅस्टिक मॅटची मागणी घेऊन खरेदी केली नाही. यापूर्वी सन २००४-०५, २००६-०७, २००७-०८ व २००८-०९ मध्ये बस्कर पट्टया खरेदी केल्या असल्याने प्लॅस्टीक मॅटच्या आवश्यकतेची खात्री पटत नाही.

२) प्लॅस्टीक मॅटचा चाचणी अहवाल नसल्यामुळे सदर साहित्य चांगल्या दर्जाचे प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

३) साहित्य प्राप्त डिलेव्हरी चलनावर प्राप्त दिनांक नमूद न केल्यामुळे साहित्य कधी प्राप्त झाले याची खात्री करता आली नाही.

४) के.प्रा.शा.ने प्रा.शाळांना प्लॅस्टीक मॅट वाटप केलेले अभिलेखे दर्शविले नाही.

५) लेखा परिक्षणात अर्धसमास पत्र क्र. १ दि. १९/०१/२०११ अन्वये गट शिक्षणाधिकारी कळमनुरी, सेनगाव, औढा ना. साठा नोंदवहीची मागणी करुनही दर्शविले नाही. त्यामुळे सदर साहित्य कधी प्राप्त व वाटप केले त्याची खात्री करता आली नाही.

६) पंचायत समिती हिंगोली अंतर्गत गट शिक्षण अधिकारी यांना ११०५ नग प्लॅस्टिक मॅट पुरवठा केला. त्यापैकी त्यांनी ११०० नग वाटप केले व ०५ नग कोणाला वाटप केले दर्शविले नाही.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करेपर्यंत रु. ४४९९२०/-ले.प. आक्षेपाधीन ठेवण्यात येते. आक्षेपाधीन रु. ४४९९२०/-

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८२ प्रमाणे गट शिक्षणाधिकारी यांचे मासिक बैठकीत जिल्ह्यातील एकूण शाळांची संख्या विचारात घेऊन मागणी निश्चित केलेली आहे. सदर प्रकरणी अनावश्यक प्लॅस्टीक मॅट घेतलेल्या नाहीत. गट शिक्षणाधिकारी यांचेकडून लेखी मागणी घेतलेली आहे. मागणी उपलब्ध आहे.

२) प्लॅस्टीक मॅटची चाचणी अहवाल घेण्यात आलेला नाही परंतु सदर एजन्सीकडून गट शिक्षणाधिकारी कार्यालयास पुरवठा करुन पोच पावतीवर, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ८३ (३) नुसार गट शिक्षणाधिकारी यांनी तपासणी करुन उत्तम स्थितीत मॅट प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र दिलेले आहे. आज पावेतो सदर मॅट वापरात असून उत्तम स्थितीत आहेत.

३) गट शिक्षणाधिकारी स्तरावर सदरील साहित्याचा पुरवठा केला असुन डिलेव्हरी चलनावर साहित्य प्राप्त दिनांक व साठा नोंदवहीवर नोंद घेतल्याची नोंद आहे. सदर डिलेव्हरी चलन लेखा परिक्षणास उपलब्ध आहे.

४) के.प्रा.शा.स्तरावरुन अंतर्गत प्रा.शाळांना प्लॅस्टिक मॅट वाटप केलेले अभिलेखे उपलब्ध आहेत.

५) गट शिक्षणाधिकारी कळमनुरी, सेनगाव,औढा ना. यांची साहित्य वाटप केल्याची नोंदवही या कार्यालयाकडे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहे.

६) पंचायत समिती हिंगोली अंतर्गत गट शिक्षण अधिकारी यांना ११०५ नग प्लॅस्टीक मॅट पुरवठा केला. त्यापैकी त्यांनी एकूण ११ के.प्रा.शा.यांना प्रत्येकी ८५ नग याप्रमाणे ९३५ व एका के.प्रा.शा.ला ९० याप्रमाणे ११०५ नगाचे वाटप करण्यात आले. त्याची नोंद साठा नोंद वही पान क्र. २० वर घेतली आहे. वाटप केले आहे. अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीकडून शाळा निहाय प्लॅस्टिक मॅटची मागणी प्राप्त झाली होती तर मागणी तसेच प्लास्टीक मॅटचा चाचणी अहवाल लेखा परीक्षणास का उपलब्ध करून देण्यात आला नाही, केंद्र प्राथमिक शाळेने प्राथमिक शाळांना प्लॅस्टीक मॅट वाटप केल्याचे अभिलेखे व लेखापरीक्षण अर्धसमास पत्र क्र.१, दिनांक १९.१.२०११ नुसार पंचायत समिती कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ अंतर्गत गट शिक्षण अधिकारी यांची साठा नोंदवही मागणी करूनही लेखा परीक्षणास का उपलब्ध करून देण्यात आले नाहीत, यास कोण जबाबदार आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, बस्कर पट्टया खरेदी केल्या असल्याने प्लास्टीक मॅटच्या आवश्यकतेची खात्री पटत नाही असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. शिक्षणाधिकारी यांच्या मासिक बैठकीत जिल्ह्यातील एकूण शाळांची संख्या विचारात घेऊन मागणी निश्चित केलेली आहे. या प्रकरणी अनावश्यक प्लास्टीक मॅट घेतलेल्या नाहीत. गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून आम्ही लेखी मागणी घेतलेली आहे. प्लॅस्टिक मॅटचा चाचणी अहवाल घेण्यात आला नसला तरी शिक्षणाधिकारी यांनी पुरवठा झाल्याची पोच दिलेली आहे. तसेच, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ च्या नियम ८३ (३) अनुसार गट शिक्षणाधिकारी यांनी प्लॅस्टिक मॅटची तपासणी करून त्या उत्तम स्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्या मॅट अद्यापपावेतो चांगल्या स्थितीत आहेत. तसेच, डिलिव्हरी चलनावर साहित्य प्राप्त झाल्यासंबंधातील नोंद घेण्यात आली आहे. यासंबंधातील सर्व अभिलेख सादर करण्यासाठी उपलब्ध आहेत.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध करून दिले पाहिजेत. ते जर उपलब्ध करून दिले नाही तर शासनाने दंडात्मक तरतूद देखील केली आहे. यासंबंधात शासनाने दिनांक १८.२.२०१४ रोजी शासन निर्णय देखील निर्गमित केली आहे. त्यात त्यांनी रूपये २५ हजार इतकी दंडात्मक तरतूद केली आहे. यावर समितीच्या असे निदर्शनास आले की, जवळ जवळ ५० टक्के प्रश्नांना जिल्हा परिषदांकडून उत्तरे येत नाही. एवढेच नव्हे तर परीक्षणाच्या वेळी अभिलेखे

देखील सादर केलेले नाहीत. अभिलेखे सादर करण्याची मागणी करूनही ज्या अधिकाऱ्यांनी अभिलेखे सादर केलेले नाहीत त्यांच्यावर आपण दंडात्मक कारवाई करावी. नियमानुसार जो दंड आहे तो संबंधितांकडून वसूल करावा, असे निदेश समितीने दिले.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

लेखापरिक्षणाच्या वेळी ज्या अधिकाऱ्यांनी लेखा परीक्षकांना अभिलेख उपलब्ध करुन दिले नाहीत त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केली आहे काय, असल्यास कोणत्या शासन निर्णयानुसार व किती रकमेची.

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात प्रस्तुत प्रकरणात समितीच्या निदेशानुसार केलेल्या चौकशीचा अहवाल समितीस सादर करण्यात आला. सदर प्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी, कळमनुरी, सेनगाव व औढा नां. यांनी लेखा परिक्षणावेळेस लेखा परिक्षकास प्लॅस्टीक मॅट पुरवठा झाल्याबाबत अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिले नसल्याने संबंधीताकडून शासन परिपत्रक दि. ११/०२/२०१३ अन्वये त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन लेखाशिर्ष ००७० इतर प्रशा.सेवा, ८०० गौण संकीर्ण इतर जमा, ००७०११६/१७ या लेखा शिर्षकात दंड भरणे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

लेखा परिक्षणाच्यावेळी ज्या संबंधीत तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी तपासणीकरिता अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

सदरील दंडात्मक कार्यवाही शासन परिपत्रक लेखाप/२०१२(७-१३) वित्त-८मंत्रालय, मुंबई, दि. ११/०२/२०१३ नुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षण अधिनियम, १९३० चा सुधारणा अधिनियम, २०११ चे कलम ८ अन्वये रु. २५,०००/- एवढा दंड ठोठावणेबाबत नमूद असल्याने या प्रकरणात दोषी असलेले तत्कालीन तीन गट शिक्षणाधिकारी पैकी

एक गट शिक्षणाधिकारी श्री.गायकवाड, टी.जी.,ग.शि.अ. हे दिनांक ३०/६/२०११ रोजी सेवा निवृत्त झालेले असल्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. तसेच उर्वरित दोन गट शिक्षणाधिकारी श्री. मुकाडे, एम.आर व श्री.वाटोडे, के.डी.यांचेकडून प्रत्येकी रु.२५,०००/- एवढा दंडवसूल करुन चलन क्र.३८, दि.७/१०/२०१५ व चलन क्र.१९, दि. ०८/१०/२०१५ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा हिंगोली मध्ये भरणा केलेला असून चलनाच्या प्रती उपलब्ध आहेत.

उपरोक्त मुद्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वकश चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला. उक्त अहवालास समितीने सहमती दिली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी लेखापरीक्षणाच्या वेळी ज्या अधिका-यांनी लेखा परीक्षकांना अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केली आहे काय, असल्यास कोणत्या शासन निर्णयानुसार व किती रकमेची, अशी समितीने विचारणा केली असता यावर असे अभिप्राय आलेले आहेत की, लेखा परीक्षणाच्या वेळी ज्या संबंधित तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांनी तपासणीकरिता अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केलेली आहे. सदरील दंडात्मक कार्यवाही शासन परिपत्रक लेखाप/ २०१२७-१३ वित्त-८, मंत्रालय, मुंबई नुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षण अधिनियम, १९३० चा सुधारणा अधिनियम, २०११ चे कलम ८ अन्वये रुपये २५,०००एवढा दंड ठोठावणेबाबत नमूद असल्याने या प्रकरणात दोषी असलेले तत्कालीन तीन गट शिक्षणाधिकारी पैकी एक गट शिक्षणाधिकारी श्री.गायकवाड, टी.जी., गट शिक्षण अधिकारी हे दिनांक ३० जून, २०११ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही तसेच उर्वरित दोन गट शिक्षणाधिकारी श्री.मुकाडे, एम.आर.व

श्री.वाटोडे, के.डी.यांचेकडून प्रत्येकी २५,००० एवढा दंड वसूल करुन चलन क्रमांक ३८, दिनांक ७.१०.२०१५ व चलन क्रमांक १९, दिनांक ८.१०.२०१५ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा हिंगोली मध्ये भरणा केलेली आहेत. चलनाच्या प्रती उपलब्ध आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस स्पष्ट केले.

समितीच्या मते, लेखापरीक्षणाकरिता हिशेब व संबंधित अहवाल न दाखविण्यासंदर्भात २५ हजार रुपयांच्या दंडाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कोटी रुपयांच्या हिशेबांसंबंधीच्या कागदपत्रांची पूर्तता न करण्याकरिता केवळ २५ हजार रुपयांचा दंड कोणीही भरुन अप्रत्यक्षरित्या अनियमितता न केल्याचे प्रमाणपत्र मिळवेल. ही बाब जणू अनियमितता न केल्याच्या प्रमाणपत्रासारखीच आहे. समितीला दंड वसूल करण्यापेक्षा अनियमितता किंवा हिशेबासंबंधीची खरी कागदपत्रे लेखापरीक्षणाकरिता दाखविली गेली पाहिजे यामध्ये रस आहे. कागदपत्रे का दाखविली गेलेली नाही, हा येथे मूळ मुद्दा आहे. ऑडिट करतेवेळी योग्य ती कागदपत्रांची पूर्तता होणे आवश्यक आहे. समितीने असे मत प्रतिपादन केल्यावर अति. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणामध्ये दंड केलेला असून मूळ कागदपत्रे आपल्याकडे उपलब्ध असल्याचे समितीस विदीत केले.

समितीच्या मते, आक्षेपाप्रमाणे जर संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता होऊन दंडाची कारवाई झाली असेल तर मग याचा स्पष्ट उल्लेख यामध्ये असणे अपेक्षित होते. कारवाई आणि कार्यवाही यामधील फरक स्पष्टपणे येणे आवश्यक होते. यावर अति. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, यासंदर्भातील अभिलेखे उपलब्ध असून कार्यवाही पूर्ण झालेली आहे. यासंदर्भातील माहिती उपलब्ध असून संपुर्ण खरेदीही पूर्ण झालेली आहे. परंतू समितीने विभागाने दिलेल्या लेखी उत्तरामध्ये हे स्पष्टपणे नमूद झाले पाहिजे, असा आग्रह धरला.

त्यावर विभागीय सचिवांनी पुन्हा स्पष्ट केले की, या संदर्भात आक्षेप आल्यानंतर विभागीय पातळीवर दंडात्मक कारवाई व योग्य ती कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

समितीच्या मते जोपर्यंत ऑडिट पूर्ण होत नाही, तोपर्यंत त्यासंबंधीची मूळ कागदपत्रे दाखवून तो आक्षेप बाजूला केला जाऊ शकत नाही. या आक्षेपासंदर्भातील सर्व कार्यवाही पूर्ण करुन, कागदपत्रांची पुर्तता करुन आक्षेप बाजूला सारणे आवश्यक आहे. पंचायती राज समितीने ज्यावेळी लोकल फंड्संबंधी चेकिंग चालू केले, तेव्हापासून शासनाचा

खूप फायदा झालेला आहे. कारण समिती कोणत्याही ठिकाणी दौ-याला जायच्या आधी दोन दिवस संबंधित अखर्चित निधी ट्रेझरीमध्ये भरलेला असतो. विभागीय सचिवांनी राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेणे आवश्यक आहे.
राज्यातील ३५ जिल्हा परिषदांना भेट देण्याचा समितीचा मानस आहे. यामुळे शासनाचा आर्थिक फायदा होत आहे.

विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, शासनाने गेल्या चार - पाच वर्षातील लोकल फंड ऑडिट करण्यासंबंधी आढावा बैठक घेण्याचे आयोजन केलले आहे. त्याप्रमाणे पत्र गेलेले आहे. विकास परिषद, औरंगाबाद येथे जात असतांना तेथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची एक बैठक घेण्यात आली होती.

**अभिप्राय व शिफारशी**

जिल्हा परिषद, हिंगोली सन २००९-१० या वित्तीय वर्षात दरकरारानुसार क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांना प्लॅस्टीक मॅट ५५१९ नग दर रुपये ९०.५८/- प्रमाणे खरेदी करण्याकरिता आदेश क्र.१०५६/१०, दि.३०.३.२०१० रोजी दिले असून त्याकरिता रुपये ४,४९,९२०/- इतका खर्च केला आहे आणि या खर्चाबाबत लेखापरिक्षकांनी मॅटचा चाचणी अहवाल सादर न करणे, शाळा निहाय प्लॅस्टीक मॅटची मागणी घेऊन खरेदी केलेली नसणे, साहित्य प्राप्त डिलेव्हरी चलनावर प्राप्त दिनांक नमूद न केल्यामुळे साहित्य कधी प्राप्त झाले याची खात्री नसणे आणि या सर्व संबंधित खरेदी प्रकरणात लेखा परिक्षकांस लेखा परिक्षणाचे वेळी कागदपत्रे उपलब्ध न करुन देण्याबाबत समितीने तीव्र आक्षेप नोंदवून या प्रकरणी चौकशी करुन सर्व संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबत तसेच मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३२ च्या कलम ७ नुसार सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले.

समितीने निदेश दिल्यानुसार या प्रकरणात तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, कळमनुरी, सेनगाव, औंढा यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांना शासकीय लेखा शीर्षात दंड भरण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार श्री.एम.आर.मुकाडे व श्री.के.डी.वाटोडे या दोन्ही गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्रत्येकी रुपये २५,०००/- एवढा दंड वसूल करुन तो शासन खाती दिनांक ७.१०.२०१५ व ८.१०.२०१५ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा हिंगोली येथे भरणा केला असून त्याबाबत चलनाच्या पावत्या चौकशी

अहवालासोबत जोडलेल्या आहेत. तसेच या प्रकरणात दोषी असलेले तत्कालीन गट शिक्षणाधिकारी, श्री.टी.जी.गायकवाड हे दिनांक ३०-६-२०११ रोजी सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली नाही, असे उक्त चौकशी अहवालाद्वारे समितीला कळविण्यात आले आहे.

**जिल्हा परिषद, हिंगोली यांनी लेखापरीक्षणाच्या वेळी लेखा परीक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून न देणे या बाबी संदर्भात तत्कालीन गट शिक्षणाधिकारी यांच्यावर केलेल्या दंडात्मक कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करीत असताना समितीला असे प्रकर्षाने वाटते की केवळ दंडात्मक कार्यवाही करून या प्रकरणी अधिनियमाचा आधार घेऊन कार्यवाही होणे उचित असले तरी प्रशासकीयदृष्ट्या कागदपत्रे उपलब्ध करून न देणे ही बाब म्हणजे शंकेस वाव देण्यासारखी आहे. अशा बाबीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी जिल्हा परिषदेने त्यांच्या सर्व संबंधितांस परिपत्रक निर्गमित करून संबंधित योजनेतील कागदपत्रे लेखापरीक्षणाचे वेळी उपलब्ध करून देण्याबाबत सतर्क राहण्याबाबत कळविण्यात यावे तसेच अंतर्गत ऑडिट लेखापरीक्षणाबाबत जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने अत्यंत दक्ष राहून या प्रकरणी सर्व संबंधित विभागाकडून लेखापरीक्षणास विहित वेळेत कागदपत्रे कशी उपलब्ध होतील याबाबत सतर्क राहून सर्व संबंधित विभागाकडून लेखापरीक्षण आक्षेपात नमूद त्रुटींची पूर्तता करण्याबाबत पाठपुरावा करून आक्षेपीय बाबींची माहिती लेखा परीक्षणात विहित वेळेत उपब्ध करून देण्याबाबत कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, हिंगोली

### सिमेंट रस्ता व नाली बांधकाम, मौ.वरखेडा, ता.सेंनगाव

### (परिच्छेद क्रमांक ३.३१७) (सन २००९-२०१०)

मौज वरखेडा, ता.सेंनगाव येथे सी.सी.रोड व नालीच्या कामास दिनांक ०१/०७/२००९ ला तांत्रिक मान्यता घेवून निविदा बोलावून दिनांक ०७/०८/२००९ ला कामाचे आदेश अंदाजित दराने देवून रक्कम रुपये २,५५,६७९/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सदर कामाची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ नुसार प्रशासकीय मान्यता न घेता नियमबाह्य खर्च केलेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १५३ नुसार मंजूर अंदाजपत्राकाप्रमाणे काम करणे बंधनकारक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम व आरोग्य विभाग निर्णय क्र.सी.एस.टी १२६८/५९३८२/लघु, दि. १४/३/१९७४ व करारनाम्यातील अट क्र. ३८(१) नुसार बाबवार खर्चात मूळ प्राकलनापेक्षा २५ टक्के किंवा रक्कम रुपये ५०००/- पेक्षा जास्त खर्च सक्षम प्राधिका-यांच्या मंजुरीशिवाय अनुज्ञेय नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ नुसार जादा कामासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतू सदरील कामामध्ये मान्यता न घेता रक्कम रु. ६०,८०१/- जादा खर्च केला आहे. जादा खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करून रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

मोजमाप पुस्तिकेनुसार दबाई करण्यात आलेली नसल्याने कामाचा दर्जा योग्य असल्याबाबत खात्री पटत नाही.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

जि.प.सर्वसाधारण सभा दि.१६/०२/०९ अन्वये ठराव क्र. ८८ जि.प.स्तरावरील बाराव्या

वित्त आयोगाच्या टप्पा क्र. ६ मधील मंजूर निधी मधून करावयाच्या कामास जि.प.सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. प्रशासकीय मान्यता आदेश स्वतंत्रपणे काढण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

सदरील काम गावांतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम घेण्यात आलेले होते. प्रत्यक्ष काम करते वेळी कमी रुंदीच्या गल्लीमध्ये रोलर जात नसल्यामुळे त्याचप्रमाणे प्रस्तावित रस्त्यावरील खडीकरणाचे काम इतर योजनेत झालेले असल्यामुळे खडीकरण आवश्यक नसल्यामुळे त्या बाबीच्या होणाऱ्या बचतीच्या रकमेमधून सिमेंट कॉंक्रिटचे रस्त्याचे अतिरिक्त काम करून घेण्यात आलेले आहे व किती अधिकचे कामास सक्षम अधिकारी यांची तुलनात्मक तत्वावर मंजुरी घेण्यात आलेली आहे. मंजूर निधीच्या अधिन राहून काम पूर्ण करुन घेण्यात आलेले आहे. सदर वसुली क्षमापित करून परिच्छेद अनुपालन मान्य करण्यात यावा ही विनंती.

सदरील काम हे ग्रामीण भागातील गावांतर्गत लहान गल्लीमध्ये असल्यामुळे रोलर कामावर नेता आले नाही. सदरील दबाईची बाब ही मनुष्यबळाद्वारे योग्य प्रकारे पाणी टाकून धुम्मस करूनच दबाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे काम निष्कृष्ट दर्जाचे झालेले नसून दर्जेदार काम करून घेण्यात आलेले आहे. सदरील कामास सक्षम अधिकारी यांनी तपासणी करूनच कामाचे देयक अदाई करण्यात आलेले आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेचा आदेश का काढला नाही, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चा नियम १५३ नुसार मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम का केले नाही, मूळ प्राकलनापेक्षा २५ टक्के जास्त रक्कम खर्च होत असल्यास सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही का केली नाही, जादा झालेल्या खर्चास कोण जबाबदार आहे व सदर रकमेच्या वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे यावर कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद यांनी समितीस अशी माहिती दिली की, गावांतर्गत सिमेंट रस्त्याचे काम होते. प्रत्यक्ष काम करतेवेळी कमी रुंदीच्या

गल्लीमध्ये रोलर जात नव्हते. प्रस्तावित रस्त्यावरील खडीकरणाचे काम इतर योजनेत झालेले असल्यामुळे खडीकरण आवश्यक नव्हते. या बचतीच्या रकमेमधून सिमेंट कॉंक्रिटचे रस्त्याचे अतिरिक्त काम करून घेण्यात आलेले आहे व कमी अधिकचे कामास सक्षम अधिकारी यांची तुलनात्मक तक्त्यावर मंजुरी घेण्यात आलेली आहे. मंजूर निधीच्या अधिन राहून काम पूर्ण करून घेण्यात आलेले आहे. सदर वसुली क्षमापित केलेली आहे.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कामांसाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी घेतली जाते. ज्यावेळेला कामास विलंब होतो त्यामुळे २५ टक्के जास्त रक्कम खर्च होत असल्यास मान्यता का घेण्यात आली नाही, तसेच एस्टिमेट बघता या सर्व गोष्टी करणे आवश्यक आहेत, परंतु कोणतेही कारण नमूद न करता जादा झालेल्या खर्चाच्या कामांवर स्वाक्षरी कशी केली, पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्यांची कामे पूर्ण झाली पाहिजेत. कामाची तातडी असतानाही बाकीच्या सर्व कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. खर्चात मूळ प्राकलनापेक्षा २५ टक्के पेक्षा जास्त रक्कम द्यावयाची आहे त्यामुळे त्याला प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते. सिमेंट रस्ता व नाली बांधकामासाठी २५ टक्के पेक्षा जास्त खच झालेला आहे, परंतु प्रशासकीय मान्यता न घेता काम केलेले आहे. यावर समितीला अशी माहिती देण्यात आली की, सेव्हींग आणि एक्सेस त्यामुळे रकमेमध्ये काहीही फरक झालेला नाही. प्रत्यक्ष काम झाल्यानंतर सेव्हींग आणि एक्सेस झालेले आहे, जिल्हा परिषदेची मान्यता घेतलेली आहे.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, एखाद्या कामावर बचत झाली असेल तर तो निधी दुसरीकडे आपणाला वापरता येतो काय, आपण बचत झालेली निधी दुसऱ्या कामावर परस्पर कसा काय वापरला आहे, नियम १२० असे सांगतो की, बचत झाली असेल तर तो निधी सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय दुसऱ्या कामावर किंवा बाबीवर वापरता येत नाही, शासकीय मान्यतेशिवाय काम करणे चुकीचे आहे. जिल्हा परिषदेची मान्यता घेतली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. असे करणे चुकीचे आहे. आपण जो बदल केला आहे त्याला सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. समितीने असे निदेश दिले की, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी. ज्यांनी चुकीचे काम केले आहे त्यांच्यावर शासन मॅन्युअलनुसार कार्यवाही करावी. या

प्रकरणी ज्यांनी प्रशासकीय मान्यता न घेता अनियमितता केली आहे त्यांची चौकशी करून ते जर दोषी आढळून आले तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये त्याची नोंद करून घ्यावी.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

या प्रकरणी प्रशासकीय मान्यता न घेताच कामे करण्यात आली असून शासन निर्णयानुसार मूळ प्राकलनापेक्षा २५ टक्केपेक्षा जास्त रक्कम खर्च होत असल्यास सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता कार्यवाही करण्यात आली आहे. या बाबीचा विचार करता समितीने चौकशी करण्याचे निदेश दिले होते. त्या अनुषंगाने या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास, उक्त चौकशीत कोण दोषी आढळून आले व त्यांचेविरुध्द कोणती कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करून अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात प्रस्तुत प्रकरणी सदर कामाची मंजुरी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. १६/०२/०९ अन्वये ठराव क्र.८८ जि.प.स्तरावरील बाराव्या वित्त आयोगाचा टप्पा क्र.६ मधील मंजूर निधी मधून करावयाच्या कामास मंजुरी घेण्यात आलेली आहे. सदर मंजुरी असताना ही वेगळ्याने प्रशासकीय मान्यता आदेश प्रारुप काढणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.श्याम किवळेकर यांचेवर शिस्त व अपील नियमाप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांचेकडे विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी या कामाचे शाखा अभियंता, श्री.व्हि.के.गव्हाणे यांना या कार्यालयाचे नोटीस क्र.२०९७, दिनांक ०३/०९/२०१५ रोजी नोटीस बजावण्यात आली असून त्यांचा खुलासा दिनांक ०५/०९/२०१५ अन्वये प्राप्त आहे व तो अंशतः समाधानकारक असल्याचे त्यांची एक वर्षाची वार्षिक वेतन वाढ तात्पुरत्या स्वरुपात या कार्यालयाचे पत्र क्र. २३४५, दिनांक ७/१०/२०१५ अन्वये थोपविण्यात आलेले आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) जि.प.सर्वसाधारण सभा दि. १६/२/२००९ अन्वये ठराव क्र.८८ जि.प.स्तरावरील बाराव्या वित्त आयोगाच्या टप्पा क्र.६ मधील मंजूर निधी मधून करावयाच्या कामास जि.प. सर्वसाधारणसभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. परंतु सदर कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश प्रारुप काढण्यात आलेले नाहीत. तथापि, सदरचे काम पूण झाल्यामुळे कामाचे सद्यस्थितीत कार्योतर प्रशासकीय मान्यता आदेश क्र. ३१९, दिनांक ०७/१०/२०१५ अन्वये रु. २,५५,०००/-रकमेस कार्योत्तर प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

(२) सदर कामास दिनांक ०१/०७/२००९ रोजी रु. २,५४,८८६/- रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

(३) सदरील कामावर मोजमाप पुस्तिका क्र.८४२, पान क्र.८ नुसार रु.२,५५,०००/- एवढा खर्च झालेला आहे.

(४) सदर कामावर झालेला खर्च रु.२,५५,०००/- झालेला असून मूळ अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा रु.११४/- जास्त खर्च झालेला आहे. त्यामुळे सदरील कामावरील खर्च हा ०.०४५% एवढा जादा झालेला आहे.

तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १२४ नुसार निरीक्षण टिप्पणी दि.८/८/२००९ व्दारे खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

(a) ज्या ठिकाणी रस्त्याच्या पृष्ठभागावर इतर योजनेतून खडीकरणाचे काम झाले आहे ते वगळता उर्वरित लांबीमध्ये खडीकरणाचे काम करण्यात यावे.

(b) तसेच कमी रुंदीच्या गल्लीमध्ये रोलर जात नसल्यामुळे दबाईची बाब ही मनुष्यबळाद्वारे योग्य प्रकारे पाणी टाकून धुम्मस करुन घेण्यात यावे.

(c) खडीकरण व दबाईच्या कामातील होणाऱ्या बचतीच्या रकमेमधून सिमेंट रस्त्याचे अतिरिक्त काम करून घ्यावे.

(५) सदर कामाच्या रस्त्याच्या कॉँक्रिटच्या बाबी सिमेंट कॉंक्रिट १४.८, रु.२८६५७/- व सिमेंट कॉंक्रिट १:२:४, रु. ३२१४४/- या जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांनी निरीक्षण टिप्पणीप्रमाणे प्रत्यक्षात केलेल्या कामानुसार (Work Done Estimate) अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी, कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक सर्वसाधारण मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदरचा खर्च हा मंजूर रक्कम रुपये २,५५,०००/-रकमेच्या मर्यादेतच झालेला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ (१) नुसार तुलनात्मक तक्त्याद्वारे कमी-अधिक बाबीच्या होणाऱ्या परिणामास व झालेल्या कामाचे अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांची तांत्रिक सर्वसाधारण मान्यता घेण्यात आली आहे. असे अभिलेख्यावरून दिसून येते.

सद्यस्थितीत कामाची प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर रस्त्याचे काम सुस्थितीत आहे व सद्यस्थितीत रस्ता वापरात आहे.

## केलेली कार्यवाही

प्रशासकीय मान्यता न घेता काम केल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.श्याम किवळेकर हे दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेवर शिस्त व अपील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. २५१७, दि. ३०/१०/२०१५ नुसार सादर करण्यात आला आहे.

सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे मौ.वरखेडा या कामाची कार्योत्तर प्रशासकीय मान्यता आदेश क्र. ३१९, दि.०७/१०/२०१५ नुसार रु. २,५५,०००/- रकमेस प्रदान केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी या कामाचे शाखा अभियंता, श्री.व्हि.के.गव्हाणे यांची एक वार्षिक वेतन वाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद त्यांचे सेवा-पुस्तकात घेण्यात आली आहे.

उपरोक्त मुद्द्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वंकश चौकशी करून विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला. उक्त अहवालास समितीने सहमती दिली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी या प्रकरणी प्रशासकीय मान्यता न घेताच कामे करण्यात आली असून शासन निर्णयानुसार मूळ प्राकलनापेक्षा २५ टक्के पेक्षा जास्त रक्कम खर्च होत असल्यास सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी न घेता कार्यवाही करण्यात आली आहे. या बाबीचा विचार करता समितीने चौकशी करणेचे निदेश दिले होते. त्या अनुषंगाने या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, उक्त चौकशीत कोण दोषी आढळून आले व त्यांचेविरुध्द कोणती कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली, नसल्यास,विलंबाची कारणे काय, अशी विचारणा केली यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की जिल्हा परिषद स्तरावरील आयोगाच्या टप्पा क्रमांक ६ मधील मंजूर निधी म्हणून करावयाच्या कामास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. परंतु सदरहू कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश प्रारुप काढण्यात आलेले नाहीत. सदर कामास दिनांक १-७-२००९ रोजी रुपये २,५४,८८६ रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील कामावर मोजमाप पुस्तिका क्रमांक ८४२, पान क्रमांक ८ नुसार २,५५,०००/- एवढा खर्च आलेला आहे. सदर कामावर झालेला खर्च रुपये २,५५,००० /- झालेला असून मूळ अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा रुपये ११४ रुपये जास्त खर्च झालेला आहे. सदरील कामावरील खर्च ४५ टक्के एवढा जादा झालेला आहे. तसेच, तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १२४ नुसार निरीक्षण टिप्पणी ज्या ठिकाणी रस्त्याच्या पृष्ठभागावर इतर योजनेतून खडीकरणाचे काम झाले आहे ते वगळता उर्वरित लांबीमध्ये खडीकरणाचे काम करण्यात यावे. तसेच कमी रुंदीच्या गल्लीमध्ये रोलर जात नसल्यामुळे दबाईची बाब ही मनुष्यबळाद्वारे योग्यप्रकारे पाणी टाकून धुम्मस करून घेण्यात यावे. खडीकरण व दबाईच्या कामातील होणाऱ्या बचतीच्या रकमेमधून सिमेंट रस्त्याचे अतिरिक्त काम करून द्यावे, अशा सूचना दिलेल्या आहेत. सदर कामाच्या रस्त्याच्या कॉंक्रिटच्या बाबी सिमेंट कॉंक्रीट १:४:८ रुपये २८६५७/-

व सिमेंट कॉक्रिट १:२:४ रुपये ३२१४४ /- जादा खर्च झालेला आहे. सदर जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांनी निरीक्षण टिप्पणी प्रमाणे प्रत्यक्षात केलेल्या कामानुसार अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी कार्यकारी अभियंता यांची तांत्रिक सर्वसाधारण मान्यता घेण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ११८ (१) नुसार तुलनात्मक तक्त्याद्वारे कमी-अधिक बाबीच्या होणाऱ्या परिणामास व झालेल्या कामाचे अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, बांधकाम यांची तांत्रिक सर्वसाधारण मान्यता घेण्यात आलेली आहे, असे अभिलेख्यावरुन दिसून येते.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, यासंबंधीच्या चौकशी अहवालामध्ये कोणत्या प्रकारचे निष्कर्ष बाहेर आलेले आहेत, त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, प्रशासकीय मान्यता न घेतल्यामुळे काम सुरू केल्यामुळे तसे आढळून आलेले आहे. प्रशासकीय मान्यता न घेता काम केल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.शाम किवळेकर हे दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेवर शिस्त व अपील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक २५१७, दिनांक ३०-१०-२०१५ नुसार रुपये २,५५,०००/- प्रदान केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी या कामाचे शाखा अभियंता, श्री.व्ही.के.गव्हाणे यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

मौजे वरखेडा, ता.सेंनगाव येथे सी.सी.रोड व नालीच्या कामास दिनांक १-७-२००९ ला तांत्रिक मान्यता घेवून निविदा बोलावून दिनांक ७-८-२००९ ला कामाचे आदेश अंदाजित दराने देवून रक्कम रुपये २,५५,६७९/- प्रदान केली आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समितीने साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी सदर कामाचा प्रशासकीय मान्यतेचा आदेश का काढला नाही, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या नियम १५३ नुसार मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे काम केले नाही तसेच मूळ प्रमाणापेक्षा २५% जास्त रक्कम खर्च होत असल्यास सदर खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेणे आवश्यक असताना ती का घेण्यात आली नाही, इत्यादीबाबत समितीने विचारणा केली असता समितीला असे सांगितले की, सदरचे काम हे गावांतर्गत सिमेंट रस्त्याचे काम असून प्रत्यक्ष काम करतेवेळी कमी रुंदीच्या गल्लीमध्ये रोड रोलर

जात नसल्यामुळे प्रत्यक्षात रस्त्यावरील खडीकरणाचे काम इतर योजनेत झालेले असल्यामुळे खडीकरण आवश्यक नव्हते. या बचतीच्या रकमेमधून सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्याचे अतिरिक्त काम करून घेण्यात आले आहे आणि अधिकच्या कामात सक्षम अधिकारी यांची तुलनात्मक तत्वावर मंजुरी घेण्यात आलेली आहे. तसेच मंजूर निधीच्या अधीन राहून कामे पूर्ण करून घेण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. याबाबत समितीचे समाधान न झाल्याने समिती या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून सर्व संबंधित जबाबदार व दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी व या कार्यवाहीचा चौकशी अहवाल समितीला पाठविण्यात यावा असे निदेश दिले.

समितीने निदेश दिले त्यानुसार जिल्हा परिषदेने या प्रकरणी चौकशी केली असून सदर चौकशीमध्ये जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभा दिनांक १६-२-२००९ अन्वये ठराव क्र.८८ जिल्हा परिषद स्तरावर बाराव्या वित्त आयोगाच्या टप्पा क्र.६ मधील मंजूर निधीमधून करावयाच्या कामास जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्यात आलेली आहे. परंतु सदर कामाचे प्रशासकीय मान्यता आदेश प्रारुप काढण्यात आलेले नाहीत. या कामाच्या कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेस दिनांक ७-१०-२०१५ रोजी रुपये २,५५,०००/- इतक्या रकमेस मान्यता घेण्यात आलेली आहे व तांत्रिक मान्यतेस दिनांक १-७-२००९ रोजी २,५४,८८६/- इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या कामावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा केवळ रु.११४/- इतका जादा खर्च झाल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी प्रशासकीय मान्यता न घेतल्यामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता हे दोषी आढळून येत आहेत. त्यामुळे त्यांचेवर शासन नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना विभागीय चौकशीचा प्रस्ताव दिनांक ३०-१०-२०१५ रोजी सादर केलेला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी या कामास संबंधित शाखा अभियंता यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवण्यात आल्याचे सदर चौकशी अहवालात नमूद केले आहे.

**जिल्हा परिषदेने चौकशी करून केलेल्या कार्यवाहीस समिती सहमती दर्शवित असताना तत्कालीन कार्यकारी अभियंता व तत्कालीन शाखा अभियंता यांचेविरुध्द कार्यवाही केली असल्याने समाधान व्यक्त करते. तथापि, जिल्हा परिषदेने दिनांक ३०-१०-२०१५ नुसार तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचेविरुध्द पाठविलेली विभागीय चौकशी बाबतची कार्यवाही त्वरेने करून सदरचे प्रकरण तीन महिन्यात निकाली काढण्यात यावे व त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, हिंगोली

### लिडच्या ठिकाणात फेरबदल केल्याने झालेल्या नुकसानीबाबत.
### (परिच्छेद क्रमांक ३.३२१) (सन २००९-२०१०)

बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने विविध कामाचे अंदाजपत्रक तयार करताना कामासाठी लागणारे साहित्याचे ठिकाण बदलून दूरचे ठिकाण दर्शवून लिड दिलेली आहे. सविस्तर तपशील मूळ परिच्छेदात जोडला आहे. त्यामुळे खालील कामामध्ये लिडपोटी रक्कम रुपये ४, २५,८२९/- चे जादा प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

(१) वाहन चालकासाठी विश्रामगृह बांधकामामध्ये विटासाठी लिड हिंगोली येथून न देता नांदेड येथून दिल्यामुळे रक्कम रुपये २५,५६५/- चे जादा प्रदान झाले आहे.

(२) पशुवैद्यकीय दवाखाना, आरळ च्या कामामध्ये विटा व टाईल्ससाठी वसमत येथील लिड न देता नांदेड येथून दिली आहे. त्यामुळे रक्कम रुपये ७८८३/- चे जादा प्रदान झाले आहे.

(३) माळहिवरा-सिरसम-डिग्रस राष्ट्रीय महामार्गासाठी मेटलसाठी स्थानिक ठिकाण न दर्शवता ३२.५० कि.मी. ची लिड दर्शवून प्रदान केले आहे. त्यामुळे १२२३.०२ घनमीटरचे रक्कम रुपये ३२०.८३ प्रमाणे रक्कम रुपये ३,९२,३८१/- चे जादा प्रदान झाले आहे. जादा प्रदानाची रक्कम रुपये ४,२५,८२९/- वसूल होणे आवश्यक आहे.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) वसूलपात्र रक्कम रु. २५,५६५/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आली आहे. चलन उपलब्ध आहे.

(२) वसूलपात्र रक्कम रु. ७८८३/- संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आली आहे. चलन उपलब्ध आहे.

(३) सदर परिच्छेदानुसार कामाची मोजमाप पुस्तिका व अंदाजपत्रकातील

दर पृथ:करणाची पाहणी केली असता सदर कामाचे लेखा आक्षेपात नमूद केलेल्या पृथ:करणानुसार सदर रस्त्याच्या कामाचे खडीसाठी दिलेल्या दरांमधून दगडासाठी दिलेले वाहतूक दर पूर्णत: वगळून फरकाची रक्कम निश्चित केल्याचे दिसून येते. पंरतु लेखा आक्षेपानुसार सवना येथील वाहतूक दर न घेता माळहिवरा येथील खदानीवरुन वाहतूक दर देणे आवश्यक असल्यानुसार तांत्रिकदृष्ट्या खालीलप्रमाणे वाहतूक दर पृथ:करण येते.

(i) लेखा आक्षेपानुसार व अंदाजपत्रकातील सवना खदानातील खडीचे वाहतुक तक्त्यानुसार सरासरी ३२.०० कि.मी.चा वाहतुक दर = रु. ३२०.८३/घमी.

(ii) लेखा आक्षेपानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दर सूचीनुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणापासून माळहिवरा येथील खदानीचे सरासरी ६.०० कि.मी. अंतराचा वाहतूक दर =(-) रु.११६.४२/घमी.

लेखा आक्षेपानुसार वाहतुकीसाठी जादा प्रदान दर रु. २०४.४१/घमी.

म्हणुन लेखा आक्षेपानुसार वाहतुक दरापोटी झालेले जादा प्रदान = १२२३.०२X२०४.४१= रु.२, ४९,९९८/-एवढे होतात.

त्यापैकी संबंधित कंत्राटदाराच्या या कामाच्या सुरक्षा अनामत रकमेतून रा. १,२२,०४०.०० वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

उर्वरित रक्कम रु. १,२७,९५८.०० संबंधीत कंत्राटदाराचे जिल्हा परिषदेमार्फत चालू असलेल्या माध्यमिक शाळा बांधकाम मौ. डौंगरकडा, ता.कळमनुरी या कामाच्या अंतिम देयकातून वसूल करण्यात आली असून शासनखाती जमा करण्यात आली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी कंत्राटदाराकडून जादा प्रदानाची रु. ३३,४४८/- वसूल करून शासन खाती चलनाने केव्हा भरणा केली आहे, झालेल्या अनियमिततेस कोण जबाबदार आहे, माळहिरवा येथील खदानीच्या ठिकाणी स्टोन क्रशर प्लान्ट अस्तित्वात नसलेबाबतचे तहसीलदार, हिंगोली यांच्या पत्राचा दिनांक कोणता, सदर पत्र लेखापरीक्षणास का दर्शविले नाही, कंत्राटदाराकडून रु. ३३,४४८/- कोणत्या नियमानुसार वसूल केले आहे, अशी विचारणा

समितीने केली यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, कंत्राटदाराकडून दिनांक, १२ जून २०१५ रोजी रु. २५,५६५/- वसूल करून शासनाखाती भरणा केलेले आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, सदरहू काम केव्हा पूर्ण करण्यात आले, हे प्रकरण २००९-२०१० या वर्षाचे आहे. सदरहू रक्कम ७ वर्षानंतर वसूल करण्याची कारणे काय आहेत, पंचायत राज समिती भेटीसाठी येणार असल्याचे कळल्यावर सदरहू रक्कम वसूल करण्यात आली, हे खरे आहे काय, याचा अर्थ असा होतो की, पंचायती राज समिती येणार असल्यामुळे सदरहू रक्कम वसूल करण्यात आली आहे. यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सदरहू काम २०१० मध्ये पूर्ण झालेले आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, सदरहू काम २०१० मध्ये पूर्ण झाले असेल तर २००९-२०१० या वर्षाच्या ऑडीटमध्ये कसे आले, लेखा परीक्षण सुरू असताना कामाची सुरुवात झाली असेल. समितीला ३३,४४८/- रुपये वसूल करण्यात आले काय, परंतु २५,५६५/- रुपये वसूल करण्यात आल्याचे सदरहू अधिकारी सांगत आहेत. कंत्राटदाराकडून संपूर्ण वसूल करावयाचे ३३,४४८/- रुपये का वसूल करण्यात आले नाही, या कामामध्ये एकूण ४, २५,८२९/- रुपयांचे जादा प्रदान झाले असून त्यापैकी २५,५६५/- रुपये वसूल झाल्याचे दाखविलेले आहे. यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, ही एकूण तीन कामे आहेत. त्यामध्ये वाहन चालकासाठी विश्रामगृहाचे बांधकाम, पशुवैद्यकीय दवाखाना, आरळ व माळहिरवा-सिरसम-डिग्रस राष्ट्रीय महामार्गावरील काम अशी तीन कामे आहेत. माळहिवरा-सिरसम-डिग्रस या राष्ट्रीय महामार्गासंदर्भातील रक्कम ३, ९२,३८१/- रुपये जादा प्रदान झाले आहेत. सवना खदानीतील खडीचे वाहतूक तक्त्यानुसार सरासरी ३२.०० कि.मी. चा वाहतूक दर रु. ३२०.८३ घन मीटर होता. लेखा आक्षेपानुसार जिल्हा दर सूचीनुसार कामाच्या ठिकाणापासून माळहिवरा रस्ता व खदानीचे अंतर ६ कि. मी. होते. त्यामुळे ६ कि. मी. लीड देणे गरजेचे होते.

या विषयाबाबत संबंधित कार्यकारी अभियंता योग्य ती माहिती देत नाही. समितीला चुकीची माहिती देणे व योग्य माहिती न देणे हे समितीच्या लक्षात आले आहे. त्यामुळे समितीने असे निदेश दिले की, या विषयाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करावी व समितीला यासंदर्भातील अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

या कामामध्ये रकमेची ३३,४४८/- रकमेची वसुली करण्याबाबत तसेच माळहिरवा येथील खदानीच्या ठिकाणी स्टोन क्रशर प्लान्ट अस्तित्वात नसल्याबाबतची चौकशी पूर्ण झाली आहे काय? तसेच या प्रकरणी समितीने आदेशित करूनही चौकशी अहवाल एक महिन्यात समितीला का पाठविला नाही.

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद, हिंगोली यांनी चौकशी करून अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात प्रस्तुत प्रकरणी चौकशीचे निष्कर्ष आणि केलेली कार्यवाही संक्षिप्त स्वरुपात खालील परिच्छेदात उध्दृत केलेली असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याकरिता येथे देण्यात आलेली नाही.

उपरोक्त मुद्द्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वकष चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला. उक्त अहवालास समितीने संमती दिली.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) वाहन चालकासाठी विश्रामगृह बांधकामामध्ये विटासाठी लिड हिंगोली येथून न देता नांदेड येथून दिल्यामुळे रक्कम रुपये २५५६५/- चे जादा प्रदान झाले आहे.

(२) पशुवैद्यकिय दवाखाना, आरळ च्या कामामध्ये विटा व टाईल्स साठी वसमत येथील लिड न देता नांदेड येथून दिली आहे. त्यामुळे रक्कम रुपये ७८८३/- जादा प्रदान झाले आहे.

(३) माळहिवरा-सिसम-डिग्रस रस्ता सुधारणा करणे या कामाच्या परिच्छेदानुसार कामाची मोजमाप पुस्तिका व अंदाजपत्रकातील दर पृथ:करणाची पाहणी केली असता सदर कामाचे लेखा आक्षेपात नमूद केलेल्या पृथ:करणानुसार सदर रस्त्याच्या कामाचे खडीसाठी दिलेल्या दरामधून, दगडासाठी दिलेल्या दरामधून दगडासाठी दिलेले वाहतूक दर पूर्णत: वगळून फरकाची रक्कम निश्चित केल्याचे दिसून येते. परंतु लेखा आक्षेपानुसार सवना येथील वाहतूक दर न घेता माळहिवरा येथील खदानीवरील वाहतूक दर देणे आवश्यक असल्यानुसार तांत्रिकदृष्ट्या खालीलप्रमाणे वाहतुक दर पृथ:क्करण येते.

(१) लेखा आक्षेपानुसार व अंदाजपत्रकातील सवना खदानातील खडीचे वाहतूक तक्त्यानुसार सरासरी ३२.०० कि.मी.चा वाहतुक दर = रु.३२०.८३/घमी.

(२) लेखा आक्षेपानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे जिल्हा दर सूचीनुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणापासून माळहिवरा येथील खदानीचे सरासरी ६.००कि.मी. अंतराचा वाहतूक दर ११६.४२/-घमी

(३) लेखा आक्षेपानुसार वाहतुकीसाठी जादा प्रदान दर= रु.२०४.४१/-घमी म्हणून लेखा आक्षेपानुसार वाहतूक दरापोटी झालेले जादा प्रदान = १२२३.०२X२०४.४१= रु. २,४९,९९८/-एवढे होतात.

**केलेली कार्यवाही**

(१) वाहन चालकासाठी विश्रामगृह बांधकामामध्ये विटासाठी लिड हिंगोली येथून न देता नांदेड येथून दिल्यामुळे रक्कम रु. २,५५,५६५/- चे जादा प्रदान झाले आहे. ती वसूल करून शासनखाती भरणा करण्यात आलेली आहे. या कामाचे तत्कालीन उप अभियंता, श्री. एस.आर.बिरादार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच शाखा अभियंता, श्री.एस.जी.पदमणे यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद त्यांचे मूळ सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे.

(२) पशुवैद्यकीय दवाखाना, आरळ च्या कामामध्ये विटा टाईल्ससाठी वसमत येथील लिड न देता नांदेड येथून दिली आहे. त्यामुळे रक्कम रुपये ७,८८३/- चे जादा प्रदान झाले आहे. ती वसूल करून शासन खाती जमा करण्यात आली आहे.

या कामाचे तत्कालीन उप अभियंता श्री.बी.जी. पवार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच शाखा अभियंता श्री.ए.आर.पडोळे यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद त्याचे मूळ सेवा पुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे.

३. माळहिवरा सिरसम रस्ता सुधारणा करणे या कामामधील लिडच्या जादाबाबत वसूल पात्र रक्कम रु.२,४९,९९८/-संबंधीताकडून वसूल करुन शासनखाती भरणा करण्यात आलेली आहे. या कामाचे तत्कालीन अभियंता, श्री.एस.जी पदमणे यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद त्यांचे मूळ सेवा पुस्तिकेमध्ये घेण्यात आली आहे.

तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.श्याम किवळेकर यांचेवर विभागीय चौकशी बाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ३०-१०-२०१५ अन्वये सादर करण्यात आला आहे. संबंधित कामाची चौकशी करुन रक्कम वसूल करण्यास उशीर झाल्यामुळे अहवाल १ महिन्याच्या आत सादर करता आला नाही.

उपरोक्त मुद्दयासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्राया संदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी कलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानूसार जिल्हा परिषदेने सर्वंकष चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला. उक्त अहवालास समितीने सहमती दिली.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी या कामामध्ये रकमेची ३३,४४८ वसुली करण्याबाबत तसेच माळहिवरा येथील खदानी च्या ठिकाणी स्टोन क्रशर प्लांट अस्तित्वात नसल्याबाबतची चौकशी पूर्ण झाली आहे काय तसेच या प्रकरणी समितीने आदेशित करुनही चौकशी अहवाल एक महिन्यात या समितीला का पाठविला नाही,

अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वाहन चालकासाठी विश्रामगृह बांधकामामध्ये विटासाठी लिड हिंगोली येथून न देता नांदेड येथून दिल्यामुळे रक्कम रुपये २५,५६५/- चे जादा प्रदान झाले आहे ती वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. या कामाचे तत्कालीन उप अभियंता श्री.एस आर बिरादार यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. त्याची नोंद मूळ सेवा पुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली आहे.

पशु वैद्यकीय दवाखाना आरळ च्या कामामध्ये विटा व टाईल्स साठी वसमत येथील लिड न देता नांदेड येथून दिली आहे. त्यामुळे रक्कम रुपये ७,८८३/- चे जादा प्रदान झाले आहे. ती वसूल करुन शासन खाती जमा करण्यात आली आहे. या कामाचे तत्कालीन उप अभियंता श्री.बी.जी.पवार यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. तसेच शाखा अभियंता श्री.ए.आर.पडोळे यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे. त्याची नोंद मूळ सेवा पुस्तिकेमध्ये घेण्यात आलेली आहे.

माळहिवरा सिरसम रस्ता सुधारणा करणे या कामामधील लिडच्या जादा बाबत वसूल पात्र रक्कम रुपये २,४९,९९८ संबंधितांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे. या कामाचे तत्कालीन उप अभियंता श्री.एस.आर.बिरादार यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात आलेली आहे. तसेच शाखा श्री.एस.जी.पदमणे यांची एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी रोखून धरण्यात आलेली आहे.

यावर समितीने मत प्रतिपादन केले की, या सगळ्या अनियमिततेच्या संदर्भात तुम्हाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. कामाच्या चाचण्यांचा अहवाल वेळेवर न आल्यामुळे या अनियमितता दिसून येतात. चाचणी अहवाल वेगळया विभागाकडून जिल्हा परिषंदाना घ्यावा लागतो. गुणवत्ता ठरविणारी यंत्रणा जिल्हा परिषदांकडे नाही. जिल्हा परिषदांसाठी राज्य पातळीवर गुणवत्ता ठरविणारी यंत्रणा उभी करावी लागेल. वेळेवर चाचणी अहवाल उपलब्ध झाले तर ऑडिट आक्षेप देखील येणार नाहीत. सध्या चाचणी अहवाल देणाऱ्यांकडे कामाचा प्रचंड ओघ असल्यामुळे ते तुमच्याकडे दुर्लक्ष करतात. म्हणून चाचणी अहवालाचा निपटारा जलद होऊन पारदर्शक कारभार होण्यासाठी विभागाची यंत्रणा निर्माण करण्याबाबत समितीने शासनास शिफारस करावी.

समितीने अमरावती आणि इतर जिल्हा परिषदांना भेटी दिल्या. बांधकाम विभागाशी संबंधित चाचणी अहवालाचा विषय ऑडिट पॅरामध्ये उपस्थित झाल्याचे दिसून येते. ज्या ज्या जिल्ह्यामध्ये क्वालिटी कंट्रोलचे युनिट नाही त्यामुळे ही बाब घडते.प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये असे युनिट असावे. जिल्हा परिषदेमार्फत बांधकामावर कोट्यवधी रुपये खर्च होतो.चाचणी अहवालाअभावी निधी वितरित केला जातो. चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पेमेंट केले तर भविष्यात ऑडिट आक्षेप येणार नाहीत. जिल्हा परिषदेमध्ये स्वत:चे क्वालिटी कंट्रोल युनिट असावे, जेणेकरुन कामे सुरळीत व वेगाने होतील.

विभागीय सचिव समितीच्या मताशी पूर्णपणे सहमत झाले. जिल्हा परिषदेचे पॅटर्न हे १९६०-७० साली त्या काळातील आवश्यकतेनुसार तयार झालेले आहे. कार्यकारी अभियंता या पदापेक्षा मोठे पद नाही. तांत्रिकदृष्ट्या तपासणी करणारी क्वालिटी कंट्रोल यंत्रणा स्टेट सेक्टरकडे आहे. कारवाई करावयाची झाली तर पॅरेंट डिपार्टमेंटकडे जावे लागते. नवीन पदे कशी निर्माण करायची याचा विचार करीत आहोत. संबंधित जिल्हा परिषद ज्या विभागीय आयुक्तांच्या अखत्यारित आहे त्या विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली अशी यंत्रणा असणे व्यावहारिक होईल. जिल्हा परिषदेच्या देखरेखीखाली क्वालिटी कंट्रोल किंवा व्हीजिलन्स होईल का हा मुद्दा आहे. ६ डिव्हीजनच्या विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली अशी यंत्रणा ठेवली तर तक्रार आली तरी दखल घेतली जाऊ शकते. विभागीय सचिवांनी समितीला विनंती केली की, समितीने याबाबत शिफारस केली तर योग्य होईल.

समितीच्या मते याबाबत शिफारस करता येईल परंतु जिल्हा परिषदेच्या पॅटर्नमध्ये किंवा ॲक्टमध्ये शासनाने तरतूद करावी ग्राम विकास विभाग मंत्री महोदयांकडे प्रस्ताव पाठवून ॲक्टमध्ये दुरुस्ती करुन घ्यावी त्यासाठी सचिवांनी आपल्या स्तरावर पाठपुरावा करावा असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने लेखा परिच्छेद क्रमांक ३.३२१ (सन २००९-१०) लिडच्या ठिकाणात फेरबदल केल्याने झालेल्या नुकसानीबाबत या लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपावर जिल्हा परिषद हिंगोली (बांधकाम विभाग) यांनी विविध कामाचे अंदाजपत्रक तयार करताना कामासाठी लागणाऱ्या साहित्याचे ठिकाण बदलून दूरचे ठिकाण दर्शवून लिड दिलेले

आहे. या प्रकरणात लिड हिंगोलीतून न देता नांदेड येथून दिल्यामुळे रक्कम रु.२५,५६५/-चे प्रदान होणे, पशुवैद्यकीय दवाखाना आरळ च्या कामामध्ये रु. ७,८८३ चे जादा प्रदान होणे, त्याचप्रमाणे माळहिवरा-सिरसम-डिग्रस या कामासाठी रु. ४,२५,८२९/- वसूल करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हा परिषद लेखी माहिती सादर करीत असताना वसुलपात्र रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करुन शासन खात्यात जमा केली असल्याचे समितीला लेखी माहितीत पाठविले आहे. त्याचप्रमाणे साक्षीच्या वेळी सदरची रक्कम विलंबाने वसूल होणेबाबत समितीने नापसंती दर्शविली. समितीला या प्रकरणी सखोल व सर्वंकष चौकशी करणे आवश्यक वाटल्याने समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या प्रकरणी सर्वंकष चौकशी करुन सर्व संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणेबाबत निदेश दिले. त्याप्रमाणे विभागाने चौकशी करुन आक्षेपात नमूद असलेल्या बाबींबाबत रक्कम वसूल करुन सर्व सबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय स्वरुपाची कार्यवाही केली असल्याचे लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत दिसून येते. **तथापि, सदरची वसुली केलेली रक्कम ही व्याजासहीत वसूल केल्याचे दिसून येत नाही. म्हणून सदरची रक्कम ही व्याजासहीत वसूल करावी अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी व्याजासहीत रक्कम वसूल केल्याबाबतची चलनासह माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद हिंगोली

**ॲस्कॅड योजने अंतर्गत पशुधनासाठी लाळखुरकत लस व हत्यारे औजारे उपकरणे खरेदी मधील अनियमितता (परिच्छेद क्रमांक ३.७८६) (सन २००९-२०१०)**

पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, हिंगोली ने ॲस्कॅड योजनंतर्गत एकूण १३ प्रमाणकाअन्वये औषधी व उपकरणे शासन दर करारानुसार खरेदीवर रक्कम रुपये ३२,६२,५८७/- इतका खर्च केला आहे या बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.·····

(१) दर करारातील अटीनुसार पुरवठा आदेश निर्गमित केल्याच्या ३० दिवसांच्या आत औषधी व साहित्य उपकरणे पुरविणे औषध असताना मे. विरीम फार्मा, पुणे यांनी औषधीचा ३ महिन्यांनी उशिरा पुरवठा केला. दरकरारातील अटीनुसार सदर कंपनीकडून रक्कम रुपये १२,३४३/- दंडाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(२) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ११७० दिनांक १८-८-२००९ व पत्र क्र.१०४९,१०५१ दिनांक २२-७-२००९ मधील अट क्रमांक ९ नुसार औषध/साहित्यांचे पार्सल कार्यालय प्रमुखाने स्वतःच्या उपस्थितीत इतर दोन अधिकाऱ्यांच्या समोर उघडून मागणी प्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याचे खात्री केली नाही.

(३) प्रमाणक क्रमांक ८१४,८१५,८१८,८६२,८२१ चे डिलेव्हरी चलनावर स्टोअरकिपर यांची साहित्य प्राप्त झाल्याचे दिनांकात स्वाक्षरी नसल्याचे साहित्य विहित वेळेत प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

(४) प्रमाणक क्रमांक ८१६,८०५,८१०,८११,८१२,८१३,८१९,८२० प्रमाणे खरेदी केलेल्या साहित्याचे डिलेव्हरी चलन दर्शविले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष साहित्य प्राप्त झाल्याबाबत खात्री करता येत नाही.

(५) प्रमाणक क्रमांक ८०५-८१३-८१४-८१५-८१८-८६१ अन्वये खरेदी केलेल्या औषधीचा इन्व्हाईस/बिलावर उत्पादक तिथी व बॅच नंबर नमूद नसल्याने सदर औषधीचे

कालबाह्य तिथी कळू न शकल्याने सदर औषधी वापरा योग्य असल्याची याबाबत खात्री पटत नाही.

(६) प्रमाणक क्रमांक ८१४,८१५ अन्वये खरेदी केलेला खर्च रक्कम रुपये १,१२,५००/- चे पुरवठा आदेश व साहित्य पुरवठा एकाच दिवशी दिनांक ३१-३-२०१० रोजी झालेली आहे.

७) प्रमाणक क्रमांक ८१६,८१०,८१२,८८२,८१९,८२० नुसार केलेला रक्कम रुपये २२,८८,४९४/- चा साधन सामुग्रीवरील खर्चावर शासन दर करार दिनांक २२-७-२००९ मधील अटीनुसार व आयकर अधिनियम, १९६१ चे कलम १९४(क) नुसार २.२४ टक्के दराने टीडीएस रक्कम रुपये ५१,२६२/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक.

(८) खरेदी साहित्य तपासणी अहवाल दर्शविला नाही.

(९) रक्कमा पुरवठादारांना प्रदान केल्याच्या पोचपावत्या लेखा परिक्षणास दर्शविल्या नाही.

(१०) प्रमाणक क्रमांक ८११ चा पुरवठा आदेश क्रमांक ३७४, दिनांक ३१-३-२०१० मध्ये औषधीची ९३० नगाची मागणी नोंदवलेली असताना इन्व्हाईस क्रमांक एसएस/०८४, दिनांक ३१-३-२०१० अन्वये १२४० नगाचा पुरवठा केला आहे.

(११) लस, हत्यारे व औजारे खरेदीस एकूण ३२,८३,०००/- प्राप्त अनुदानापैकी रक्कम रुपये २०,४१३/- अखर्चित अनुदान शासनास परत करणे आवश्यक आहे.

**वरील आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, हिंगोली यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.-----**

१) दर करारामध्ये पुरवठा आदेश निर्गमित केल्यापासून ३० दिवसांच्या आत पुरवठा करावा असे नमूद नाही. पुरवठादारास ३१-३-२०१० रोजी आदेश निर्गमित केले असून पुरवठादाराने ३.५.२०१० रोजी पुरवठा केलेला आहे. म्हणजे ३३ दिवसांत पुरवठा करण्यात आलेला असल्याने दराची रक्कम वसूल करणे योग्य होणार नाही अशी विभाग प्रमुखांची धारणा आहे.

(२) कार्यालय प्रमुखाने स्वत:च्या उपस्थित इतर दोन अधिकाऱ्याच्या समोर उघडून मागणीप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याचे खात्री केली आहे.सोबत प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात आली आहे.

(३) खरेदी केलेल्या साहित्याचे डिलेव्हरी चलन सोबत जोडण्यात आले आहे.

(४) खरेदी केलेल्या साहित्याचे डिलेव्हरी चलन सोबत जोडण्यात आले आहे.

(५) संबंधीत प्रमाणकान्वये केलेली खरेदी ही औषधीची नसून उपकरणाची आहे, त्यामुळे

उत्पादक निधी व बॅच नंबर देयकावर नमूद करण्यात आलेली नाही. सदरील उपकरणे असल्याने कालबाह्य होत नाहीत. Stock book उपलब्ध आहे.

(६) प्राप्त झालेल्या रुपये १,१२,५००/- चे पुरवठा दि. ३१-३-२०१० रोजी निर्गमित केलेले व ३१-३-२०१० रोजी नोंद घेऊन देयक सादर करण्यात आलेली आहे. त्यामुळे देयकावर ३१-३-२०१० ही तारीख आहे.

(७) प्रमाणक क्रमांक ८१६,८१०,८१२,८६२,८१९,८२०नुसार केलेल्या रक्कम रुपये २२,८८,४९४/- बाबत दरकरारात नमूद नाही करीता टीडीएस कपात करण्यात आलेला नाही. दर कराराची छायांकित प्रत जोडली आहे. TDS कपात करण्यात येऊ नये याबाबत पत्राची छायांकीत प्रत उपलब्ध आहे.

(८) खरेदी केलेले उपकरणे syringe, gloves, needles असल्याने त्याचा तपासणी अहवाल घेणेबाबत दर करारात नमूद नाही.

(९) रक्कमा पुरवठादारांना प्रदान केल्याच्या पोचपावत्या अवलोकनार्थ सादर.

(१०) आदेश क्रमांक दि. ३१-३-२०१० अन्वये १२४० नगाचे मागणी असून टिप्पणीमध्ये १२४० नगाचीच मान्यता घेण्यात आली आहे व मंजूर टिप्पणीची प्रत सोबत जोडली आहे. आदेशाची प्रत उपलब्ध आहे.

(११) शासन निर्णय ८/६/२००८ अन्वये तरतूद लगतच्या वर्षात खर्चास परवानगी असल्याने पुढील वर्षी खर्च करण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सामितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारण केली की, दर करारामध्ये ३० दिवसांच्या आत पुरवठा करावा ही बाब नमूद नाही म्हणून ४३ दिवसांनी औषधांसारख्या अत्यावश्यक बाबींचा पुरवठा करण्याचे समर्थन करणे योग्य आहे काय, कारण ३० दिवसांच्या आत औषंधाचा पुरवठा करावा अशी दरकरारामध्ये अट नाही, असे लेखी उत्तर दिलेले आहे. त्यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी उत्तर दिले की, दर करारामध्ये पुरवठा आदेश निर्गमित केल्या पासून ३० दिवसाच्या आत पुरवठा करावा असे नमूद नाही, असे उत्तरामध्ये दिलेले आहे.

समितीच्या मते दरकरारामध्ये पुरवठा करण्याची मुदत नसेल तर स्वतंत्र करारनामा करुन पुरवठ्याची मुदत ठरविणे आवश्यक होते. औषधांचा पुरवठा केव्हाही केलेला चालत नाही. या प्रकरणामध्ये चूक झालेली आहे, त्याबद्दल समितीने खुलासा मागीतला यावर जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी यांनी दिनांक ३१-३-२०१० राजी पुरवठा आदेश दिलेले आहेत आणि दंडाची रक्कम वसूल केलेली आहे. हा खुलासा समितीने अमान्य केला.

सदरहू प्रश्नाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिले. त्यानुसार जिल्हा परिषदेने चौकशी केली असून उक्त चौकशीतील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

**समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीसंदर्भात साक्षीच्या अनुषंगाने खालील मुद्द्यांबाबत समितीने माहिती मागवली.**

अस्कॅड योजनेअंतर्गत पशुधनासाठी लाळखुरकत लस व हत्यारे, औजारे उपकरणे खरेदी मधील अनियमिततेबाबत. दरकरारात ३० दिवसांच्या आत पुरवठा करावा ही बाब नमूद नाही. सुमारे ४३ दिवसांनी औषधासारख्या आवश्यक बाबीचा पुरवठा व लेखा परिक्षकानी घेतलेल्या आक्षेपाची पुर्तता करण्याबाबत चौकशी पुर्ण झाली काय, उक्त चौकशीत काय आढळून आले आहे. व त्यानुसार दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.--**

आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. व्हीईटी/२४३/१४४३/२००९ पं.स. १२, दि. ३०-६-२०१० कालावधीपर्यंत करण्यात आलेल्या भावबंद दरकरारान्वये, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे कार्यालयीन पत्र दि. ३१-३-२०१० अन्वये आस्कॅड या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत लाळखुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जनावराच्या लसीकरणासाठी आवश्यक असलेल्या पॉलीप्रिपिलीन आटोक्लोव्हेबर १० मि.ली. क्षमतेच्या एकूण ११,९२६ सिरिजेस पुरवठा करण्याचे आदेश मे. विरिम ११७ सदाशिव पेठ, पुणे, यांना दिलेले होते. प्रती सिरिंज सर्व करासहित किंमत रु. १३.८०/- या प्रमाणे एकूण देयकाची रक्कम रु. १,६४,५७९/- एवढी होती त्यामुळे या प्रकरणी लसीची किंवा औषधीची खरेदी झालेली नाही हे दिसून येते.

मे.विरिम यांनी सादर सिरिंजेस पुरवठा दिनांक ३-५-२०१० रोजी म्हणजे मागणी नोंदविलेल्या दिनांकापासून ३३ दिवसांनी केलेला आहे. आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या भावबंध दरकरारामध्ये मागणीप्रमाणे वस्तुचा पुरवठा ३० दिवसांच्या आत करावा, ही बाब नमूद नसली तरीही, आयुक्त पशुसंवर्धन यांनी मे.विरिम यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यामध्ये The seller shall at proper costs(Rate Contract Cost Charges) Provide,furnish and deliver the goods, within Stipulated period mentioned in supply order and if not mentioned a period of 21 days failure to do so will the seller has failed to deliver afore said for each week अशी तरतूद असल्याने या प्रकरणी पुरवठा दि. ०३-०५-२०१० रोजी झाल्याने १२ दिवसांचा विलंब झालेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सदर प्रकरणी चौकशी केलेली असुन आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या करारनाम्यान्वये मागणी वस्तुचा पुरवठा १२ दिवसाच्या विलंबाने झाल्यामुळे एकूण मागणी रक्कमेच्या प्रती आठवडा ०.५ टक्के या प्रमाणे पुरवठादाराकडून दंड वसुलकरावयाचा होता. त्यामुळे एकूण देयकाची रक्कम रु. १,६४,५७९/- यावर उपरोक्त प्रमाणे दंड आकारुन

रु.१६४६/- ची वसुली संबंधीत पुरवठादाराकडून दि. १०-९-२०१५ रोजी करण्यात येवून ती कोषागार हिंगोली येथे जमा करण्यात आली होती.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वक्षम चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला. उक्त अहवालास समितीने संमती दिली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दर करारात ३० दिवसांच्या आत पुरवठा करावा ही बाब नमूद नाही. सुमारे ४३ दिवसांनी औषधासारख्या आवश्यक बाबीचा पुरवठा, लेखा परिक्षणामध्ये घेतलेला आक्षेप पुर्तता करण्याबाबत चौकशी पूर्ण झाली आहे काय, उक्त चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली आहे, त्यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, ही योजना अस्कॅड म्हणजे असिस्टंस् टू स्टेटस् फॉर कंट्रोल ऑफ ॲनिमल डिसीसेस ही १०० टक्के केंद्र शासनाची योजना आहे. लसीकरण फुट ॲण्ड माऊथ डिसीस चे लसीकरण आपण या योजनेतंर्गत करतो. यामध्ये सर आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने दर करार केलेला होता. तो या कालावधीमध्ये व्हॅलिड होता. त्या दर करारानुसार दिनांक ३१-३-२०१० मध्ये आदेश दिले होते. ११९२६ सिरिंजीसची मागणी केली होती. इंजेक्शन देण्यासाठी वापरण्यात येणा-या एका सिरिंजची किंमत रुपये १३.८० पैसे आहे. त्या रु. १,६४,५९७/- इतक्या रकमेचा आदेश दिला होता. २१ दिवसांच्या आत पुरवठा करायला पाहिजे होता. प्रथम मुद्दा असा आहे की, दर करारामध्ये जी मुदत आहे ती दिलेली नाही, हे खरे आहे. परंतु दर करारासोबत जे ॲग्रीमेंट केलेले आहे. त्यामध्ये २१ दिवसांची मुदत दिलेली आहे. त्या मुदतीच्या बाहेर हा पुरवठा झाला. प्रत्यक्षात पुरवठा दि. ३-५-२०१० मध्ये झाला. म्हणजे ३३ दिवसांनी केला. २१ दिवसांऐवजी १२ दिवस जादाचा विलंब लावला. त्यामुळे दर कराराचे जे ॲग्रीमेंट होते. त्या करार नाम्यानुसार ०.५ टक्के प्रत्येक आवठडयाला दंड वसूल करणे अपेक्षित होते. त्या हिशोबाने १ टक्का म्हणजे रुपये १,६४,५९७/- चा १ टक्का म्हणजे १६४६/- रुपये वसूल करणे अपेक्षित होते. ती १६४६/- रुपयांची वसूली त्या पुरवठादाराकडून करण्यात आलेली आहे. त्यामुळे विलंबाने झालेला जो पुरवठा आहे. त्याची चौकशी मुख्य कार्यकारी

अधिकारी यांनी केली. दि.१०-९-२०१५ मध्ये ही वसूली करण्यात आलेली आहे. यामध्ये अनियमितता नाही, विलंब झाला होता. सिरिंज होते त्यामुळे मुदतबाहय सुध्दा नाही. तसेच लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे दाखविले नाही म्हणून प्रत्येकी रु. २५०००/- दंड सुध्दा शासनाच्या खात्यामध्ये भरणा केला आहे. त्याच्या पावत्या आपल्याकडे आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

अस्कॅड योजने अंतर्गत पशुधनासाठी लाळखुरकत लस व हत्यारे औजारे उपकरणे खरेदीतील अनियमिततेबाबत दर करार ३० दिवसांच्या आत पुरवठा करावा ही बाब नमूद नाही सुमारे ४३ दिवसांनी औषधासारख्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्याबाबत चौकशी पूर्ण झाली आहे काय आणि उक्त चौकशीत काय आढळून आले आहे अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला असे सांगितले की, आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन त्याचे कार्यालयीन पत्र क्र. व्हीईटी/२४३/१४४३/२००९ पंस १२, दि.३०-६-२०१० कालावधीपर्यंत करण्यात आलेल्या भावबंद दरकरारान्वये, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि.३१-३-२०१० अन्वये ॲस्कड या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत लाळखुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जनावराच्या लसीकरणासाठी आवश्यक असलेल्या पॉलीप्रिपिलीन आटोक्लोव्हेबर १० मि.ली. क्षमतेच्या एकूण ११,९२६ सिरिजेस पुरवठा करण्याचे आदेश मे. विरिम ११७ सदाशिव पेठ, पुणे, यांना दिलेले होते. प्रती सिरिंज सर्व करासहित किंमत रु.१३.८०/- या प्रमाणे एकूण देयकाची रक्कम रु.१,६४,५७९/- एवढी होती. त्यामुळे या प्रकरणी लसीची किंवा औषधीची खरेदी झालेली नाही, हे दिसून येते. तसेच आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या करारनाम्यान्वये मागणी बाबतचा पुरवठा १२ दिवसांच्या विलंबाने झाल्याने एकूण मागणी रकमेच्या प्रती आठवडा ०.५ टक्के याप्रमाणे पुरवठादाराकडून दंड वसूल करावयाचा होता. **त्यामुळे एकूण देयकाची रक्कम रु.१,६४,५७९/- यावर उपरोक्त प्रमाणे दंड आकारुन रु.१६४६/- वसुली संबंधित पुरवठादाराकडून दिनांक १०-९-२०१५ रोजी वसुली करण्यात येऊन जिल्हा कोषागार, हिंगोली येथे जमा करण्यात आली.समितीने निदेशीत केल्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केली असल्यामुळे समिती या प्रकरणी समाधान व्यक्त करते.**

# परिशिष्ट " अ "

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## बुधवार, दिनांक २४ जून, २०१५

## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली

**उपस्थिती**

१ .श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख..
२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
४. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
५. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
८. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
९. श्री.अमित झनक, वि.स.स.
१०. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
११. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना.रा.थिटे, उप सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, हिंगोली**

श्री. राहूल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.,हिंगोली

श्री. विलास जाधव, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., हिंगोली

श्री. एस.डी.कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

श्रीमती तृप्ती रामकृष्ण ढेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, म.बा.वि.

श्रीमती. एस. आर. पवार, मुख्य लेखा वित्त अधिकारी

डॉ. एस. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.हिंगोली

श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी

डॉ. राहुल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. पी.एच. कच्छवे, कृषी विकास अधिकारी

श्री. ए.बी. कुंभारगावे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

श्री. एस.बी. वराडे, कार्यकारी अभियंता, बां.जि.प.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २५ जून, २०१५**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख

२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

४. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

५. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

६. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

८. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१०. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११. श्री.अमित झनक, वि.स.स.

१२. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.

१३. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.ना.रा.थिटे, उप सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, हिंगोली**

श्री. राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. विलास जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

डॉ. ए. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

डॉ. राहुल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. ए. बी. कुंभारगावे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

श्री. पी. ए. कच्छवे, कृषि विकास अधिकारी

श्रीमती एस. आर. पवार, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अर्थ विभाग

श्री. एस. डी. कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशास विभाग

श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

मोहम्मद फैय्याज, कार्यकारी अभियंता, लघु सिंचन

श्री. जी. एस. यंबडवार, कार्यकारी अभियंता (प्र) पाणी पुरवठा

श्री. अ. ज. भोसले, कार्यकारी अभियंता प्र.ग्रा.स.यो.

श्री. आर. ए. चंदाले, उप.का.अ.(बांधकाम)

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २६ जून, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

५. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

६. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

८. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१०. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

११. श्री. अमित झनक, वि.स.स.

१२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.ना.रा.थिटे, उप सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, हिंगोली**

श्री. राहूल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.,हिंगोली

श्री. विलास जाधव, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., हिंगोली

श्री. एस.डी.कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

श्रीमती तृप्ती रामकृष्ण ढेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, म.बा.वि.

श्रीमती. एस. आर. पवार, मुख्य लेखा वित्त अधिकारी

डॉ. एस. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.हिंगोली

श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी

डॉ. राहुल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. पी.एच. कच्छवे, कृषी विकास अधिकारी

श्री. ए.बी. कुंभारगावे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

श्री. एस.बी. वराडे, कार्यकारी अभियंता, बां.जि.प.

श्री. मोहम्मद फैयाज, कार्यकारी अभियंता, सिंचन.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.तथा कार्यकारी समिती प्रमुख.

२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

४. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

५. श्री.राजेंद्र नजरधाने, वि.स.स.

६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री.अमित झनक, वि.स.स.

९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

११. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रदीप सखाराम मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. स.भ.तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,

डॉ. साधना तायडे,सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,

**हिंगोली जिल्हा परिषद**

श्री. मधुकर राजे अर्दड, मुख्य कार्यकारी अधिकारी हिंगोली

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

५. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

६. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

७. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.

८. श्री.अमित झनक, वि.स.स.

९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

११. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रदीप सखाराम मयेकर, अवर सचिव (समिती)

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग

**हिंगोली जिल्हा परिषद**

श्री. विलास जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

४. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

५. श्री. राजेंद्र नजरधाने, वि.स.स.

६. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

९. श्री. अमित झनक, वि.स.स.

१०. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

११. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१२. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१३. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

१४. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.विलास आठवले, उप सचिव

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत तिसऱ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शासकीय मुद्रणालय, नागपूर